# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा
## कार्यपत्रिका क्रमांक – ४९
## सभावृत्तांत

दिनांक – ०६.१०.२०२० वेळ – दुपारी १.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑक्टोबर -२०२० ची मासिक मा.महापालिका सभा मंगळवार दिनांक ०६/१०/२०२० रोजी दुपारी १.४५ वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.कुंदन अंबादास गायकवाड

३) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

४) मा.साधना अंकुश मळेकर

५) मा.अश्विनी संतोष जाधव

६) मा.सारीका शिवाजी सस्ते

७) मा.राहुल गुलाब जाधव

८) मा.वसंत प्रभाकर बोराटे

९) मा.बुर्डे सुवर्णा विकास

१०) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

११) मा.गायकवाड निर्मला मनोज

१२) मा.गोफणे अनुराधा देविदास

१३) मा.बारसे प्रियांका प्रविण

१४) मा.अजित दामोदर गव्हाणे

१५) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

१६)	मा.लांडगे सारिका संतोष

१७)	मा.लांडगे रवि लक्ष्मण

१८)	मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१९)	मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२०)	मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२१)	मा.सावळे सिमा रविंद्र

२२)	मा.लोंढे नम्रता योगेश

२३)	मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२४)	मा.गीता सुशिल मंचरकर

२५)	मा.राहुल हनुमंतराव भोसले

२६)	मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२७)	मा.अनुराधा गणपत गोरखे

२८)	मा.केशव हनुमंत घोळवे

२९)	मा.मंगला अशोक कदम

३०)	मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३१)	मा.संजय बबन नेवाळे

३२)	मा.एकनाथ रावसाहेब पवार

३३)	मा.भालेकर प्रविण महादेव

३४)	मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३५)	मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३६)	मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३७)	मा.घोलप कमल अनिल

३८)	मा.उत्तम प्रकाश केंदळे

३९)	मा.चिखले सचिन तुकाराम

४०)	मा.यादव मीनल विशाल

४१)	मा.वैशाली जालिंदर काळभोर

४२)	मा.प्रमोद कुटे

४३)	मा.राजू मिसाळ

४४) मा.शैलजा अविनाश मोरे

४५) मा.बाबर शर्मिला राजू

४६) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४७) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४८) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४९) मा.ढाके नामदेव जनार्दन

५०) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५१) मा.करुणा शेखर चिंचवडे

५२) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

५३) मा.अपर्णा निलेश डोके

५४) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५५) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५६) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

५७) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५८) मा.सुलक्षणा राजू धर

५९) मा.शाम गणपतराव लांडे

६०) मा.सुजाता सुनिल पालांडे

६१) मा.कदम निकीता अर्जुन

६२) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६३) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६४) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

६५) मा.नढे विनोद जयवंत

६६) मा.पाडाळे निता विलास

६७) मा.काळे उषा दिलीप

६८) मा.कोकणे संतोष अंकुश

६९) मा.पवार मनिषा प्रमोद

७०) मा.बारणे अर्चना तानाजी

७१) मा.अभिषेक गोविंद बारणे

७२) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७३) मा.बारणे माया संतोष

७४) मा.निलेश हिरामण बारणे

७५) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

७६) मा.दर्शले रेखा राजेश

७७) मा.कलाटे राहुल तानाजी

७८) मा.ममता विनायक गायकवाड

७९) मा.कामठे तुषार गजानन

८०) मा.चोंधे आरती सुरेश

८१) मा.कस्पटे संदिप अरुण

८२) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८३) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८४) मा.चंद्रकांत बारकु नखाते

८५) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८६) मा.कुटे निर्मला संजय

८७) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

८८) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

८९) मा.आंगोळकर सागर सुनिल

९०) मा.मुंढे उषा अंकुश

९१) मा.कदम शशिकांत गणपत

९२) मा.लोखंडे चंदा राजू

९३) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

९४) मा.आशा धायगुडे-शेंडगे

९५) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९६) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

९७) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

९८) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

९९) मा.नवनाथ दत्तू जगताप

१००) मा.संतोष बबन कांबळे

१०१) मा.सोनवणे शारदा हिरेन

१०२) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१०३) मा. संजय मल्हारराव वाबळे

१०४) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

१०५) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१०६) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१०७) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-महापालिका आयुक्त, मा.अजित पवार-मा.अतिरिक्त आयुक्त (२), मा.प्रविण तुपे - मा.अतिरिक्त आयुक्त (३), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.बोदडे-सहा.आयुक्त, मा.मुंढे-प्र.शिक्षणाधिकारी, मा.गायकवाड-जनता संपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त,सन्मा.सभागृह खालील मान्यवरांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी. लक्ष्मण उंडे – पिंपरी चिंचवड महानगरपालिका भाजपाचे नगरसेवक व माजी स्थायी समिती सदस्य यांचे निधन, पोपटराव फुगे – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका भिमाताई फुगे यांचे पती यांचे निधन, जसवंतसिंह- भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री यांचे निधन,सुरेश अंगडी- भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेते व केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री यांचे निधन,रामदास बोकड -पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक यांचे निधन,शकुंतला साठे- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका यांचे निधन,आशालता वाबगावकर-जेष्ठ चित्रपट,नाटय अभिनेत्री यांचे निधन,भाऊ लोखंडे– जेष्ठ आंबेडकरवादी विचारवंत यांचे निधन,डॉ.शेखर बसु – प्रख्यात अणुशास्त्रज्ञ व अणुउर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष यांचे निधन, उमराव बडोले–जम्मु-काश्मिरच्या बडगाल जिल्ह्यात दहशतवादी हल्ल्यात सीआरपीएफचे सहा.उपनिरीक्षक शहीद,एस.पी.बालसुब्रम्हण्यम–जेष्ठ गायक

यांचे निधन,वा.ना.उत्पात – प्रसिध्द भागवताचार्य,कट्टर हिंदुत्ववादी विचारवंत यांचे निधन, मनिषा – हाथरस अत्याचारामध्ये निधन,प्रदीप गायकवाड – सा.का.व रा.व्यापारी सेलचे अध्यक्ष यांचे निधन, सुरेश गंगाराम कवडे–पीएमपीएलचे कर्मचारी यांचे निधन, वसंत वाणी – भारतीय जनता पक्षाचे माजी नगरसेवक यांचे निधन,प्रभाकर मल्हारी कुटे – सामाजिक कार्यकर्ते, प्रमोद कुटे नगरसदस्य यांचे वडील,पुष्पा मानव कांबळे – सामाजिक कार्यकर्त्या मानव कांबळे यांच्या पत्नी,रमेश विठ्ठल नढे - सामाजिक कार्यकर्ते, आनंद पुजारी – सामाजिक कार्यकर्ते,साहेबराव खरात – माजी नगरसेवक यांचे निधन

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** – श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.भाऊसाहेब भोईर –** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, आपण सर्व मान्यवरांना याठिकाणी श्रध्दांजली अर्पण केलेली आहे. याठिकाणी सर्व देशामध्ये एक तर कोरोनाच्या माध्यमातून संपुर्ण जगावर संकट आहे. अशा परिस्थितीमध्ये देशभरात निर्भयासारखी घटना घडलेली आहे. अतिरेकी असेल किंवा गुन्हा करणारी मंडळी असेल, परिस्थिती कोणती आहे हे पाहुन गुन्हे करीत नसतात एक प्रवृत्ती या समाजामध्ये वाढलेली आहे. भारताची कन्या हीचा ज्या पध्दतीने अंत झालेला आहे. खरंतर अशा वारंवार घटना घडत असताना देशभर याचे पडसाद उमटलेले आहेत. प्रत्येक जण आपआपल्या पध्दतीने निषेध व्यक्त करीत आहेत.मी याठिकाणी राजकीय भाष्य करण्याची ही जागा नाही. प्रश्न असा असतो की, जी मुलगी असते ती पहिलं भारताची कन्या असते,नंतर ती गावाची असते,नंतर ती तिच्या घरची कन्या असते. परंतु आपण या गोष्टीला वारंवार सामोरे जात असताना एक मोठी महानगरपालिका म्हणुन आपली देखील भावना व्यक्त करणं अत्यंत गरजेचं असतं कारण त्याचे पडसाद संपुर्ण देशभर उमटले जातात.कदाचित आपल्या भावना व्यक्त करण्यानं त्याला एक चांगल मुहूर्त  स्वरुप सुध्दा मिळू शकतं. एक कार्यकर्ता म्हणुन  पंतप्रधानांना पत्र लिहून समाधान होत असेल तर मला वाटतं आपल्या सभागृहाच्या वतीने अशा घटना घडु नये याकरिता कठोर कारवाई किंवा कठोर शिक्षा होण्याच्या दृष्टीकोनातून पाऊल टाकणं गरजेचं आहे. आणि महापौर या नात्यानं आपण पत्रव्यवहार करावा कारण तुमच्या नावामध्ये माई आहे. मा.शरदचंद्रजी पवार यांनी महिलांना ५० टक्के आरक्षण दिल्यानंतर तुम्ही महापौर पदावर आहात तुमच्या कालखंडामध्ये हे सर्व चित्र आपल्यासमोर येत असताना

आपली नैतिक जबाबदारी काय आहे आणि भविष्यामध्ये अशा घटना होऊ नये खरं तर मला नेहमी असं वाटतयं की, आपण सर्वजण योगायोगाने दुबईला जातो, इकडे जातो, तिकडे जातो  तिथं अशा घटना का?  होत नाहीत. आपल्याकडे लोकांना भितीच राहीलेली नाही. बेंगलोर मध्ये जी घटना घडली होती त्यांच मी अभिनंदन करतो हे माझे व्यक्तीगत मत आहे. आपल्या पिंपरी चिंचवड शहरातील शाळा,कॉलेज मध्ये घटना घडल्यानंतरच भाषण करण्यापेक्षा, आपण आपल्या शहराची काय काळजी घेऊ शकतो यावर आपण महापौर या नात्याने आयुक्तांबरोबर चर्चा करुन काही उपाययोजना  करावी. पण ब-याच शाळा,कॉलेजमधनं मुलींना बाहेर पडता येत नाही अशी परिस्थिती आहे. ब-याच मुली घरी का सांगत नाहीत तर मी जर का घरी वारंवार सांगितलं तर मला शाळा,कॉलेजमधनं काढून घरी बसवतील आणि लग्न करुन टाकतील अशी त्यांना भिती असते. कारण माझ्याकडे अशी घटना झालेली आहे. माई मी माझं कौतुक करुन घेत नाही पण माझी शाळा ही झोपडपट्टीतील मुलींसाठी चालवतो त्या मुली मला सांगतात की, मी जर घरी सांगितलं तर माझे आई वडील हे शाळा बंद करुन माझं लग्नचं करुन टाकतील अशी त्यांना भिती असते. नको तिथं ठेकेदार चो-यामा-या करतात परंतु मुलींच्या संरक्षणासाठी जो काही खर्च करायचा आहे तो इथं करा. कोरोनाने सर्व माणसानी कशा प्रकारे  जगावं कसं माणुस माणसांसाठी किती महत्वाचा आहे हे यानिमीत्ताने सांगितलं आहे. आणि ही आपल्याला फार मोठी शिकवण दिलेली आहे. कदाचित निसर्गाचा आपल्यावरती  राग होता म्हणुन त्यांनी यानिमीत्ताने व्यक्त केलेला आहे. तर मला वाटतं या शहराच्या आणि सभागृहाच्या वतीनं आपण श्रध्दांजली तर अर्पण केलेली आहेच पण या गोष्टीचा  निषेध तर कमीच आहे अशा व्यक्तींना कोर्टात न जाता सरळ बेंगलोर पॅटर्न राबविणेत यावा. परंतु या सगळया गोष्टीचे पडसाद आपल्यामध्ये सुध्दा उमटलेले आहेत हे दाखवण्यासाठी मा. महापौर साहेब,आपण मा.पंतप्रधान,मा.गृहमंत्री,मा.मुख्यमंत्री यांना रितसर  पत्रव्यवहार करावा. त्यांच्या भाषेत तयार करुन ते तातडीने त्यांच्याकडे पाठवावा. अशी मी मागणी करतो आणि या घटनेचा मी निषेध व्यक्त  करतो. आणि पक्षनेत्यांनी या गोष्टीचा निषेध व्यक्त करण्यासाठी पाठींबा देणेत यावा अशी मी मागणी करतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह,आताच भाऊसाहेब भोईर यांनी जो विषय मांडला आहे त्याला खरोखरचं अनुमोदन द्यायलाच पाहिजे. कारण ही खुप मोठी काळाची गरज आहे. आज मी ज्या वॉर्डाची प्रतिनिधीत्व करते त्या वॉर्डातील महिलांची काळजी आम्हांला असते. माझा प्रभाग

हा इंजिनियरींग कॉलेज असेल,मेडीकल कॉलेज असेल अशा सगळया कॉलेजसमध्ये बाहेरुन आलेली मुलं असतील अशी बरीचशी मुलं/मुली आमच्या प्रभागातील अनेक घरामध्ये रहातात.माई विषय असा आहे की, हाथरसचा बलात्कार झाला पण त्याच्या आगोदर बरेच बलात्कार झाले प्रत्येक वेळेला वेगळा विषय,प्रत्येक वेळेला वेगळी पध्दत असते. एकीकडे आपण उपाययोजना करीत असताना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या लेवलवर आपल्या नगरसेविकांच्या मार्फत मी मागे सुध्दा म्हटलं होतं की, अशीच घटना आपल्या महाराष्ट्रामध्ये घडली होती. त्यावेळेला तुम्ही आमच्या नगरसेविकांची शांतता कमिटी असेल, सुरक्षा कमिटी असेल प्रत्येक प्रभागामध्ये महिला या काम करीत असतातच महिलांचे कुठलेही प्रश्न असतील तर ते महिलापर्यंतच जास्त पोहचत असतात. आणि भाऊसाहेब, बलात्कार हा फक्त बलात्कार झाल्यानंतरच होत नसतो. त्याच्या खालच्या पण स्टेजेस आहेत. आज काही मुलींची छेडछाड होत असते, तिला शिट्टया मारल्या जातात,कॉलेजमधुन मुलगी बाहेर येते त्यावेळेस अश्लील बोलले जाते. मला वाटतं हा शब्दीक का होईना हा बलात्काराच आहे. त्याला आळा घालण्यासाठी आपल्याला काय करावं लागेल,ही विचार करण्यासाठी आपल्याकडे परत एकदा संधी आपल्याकडे आली आहे. मी केंद्र सरकार किंवा महाराष्ट्र सरकार बद्दलही बोलणार नाही. पण मला पिंपरी चिंचवड महापालिकेबद्दल बोलताना माझा प्रभाग क्र.२० हा कसा सुरक्षित राहील यासाठी मला नेहमी काळजी असते. एका ४ वर्षाच्या मुलींपासून ते ८२ वर्षाच्या म्हाता-या बाईवर जेंव्हा आत्याचार होत असतात तेंव्हा आपण का गप्प बसतो. आज माझी कमिशनर साहेब,आणि मा.महापौरांना मागणी आहे की,आपल्या पिंपरी चिंचवड शहराचे पोलिस आयुक्त यांच्या बरोबर आमची एक बैठक लावा. मला वाटतं गेल्या ५/६ महिन्यापुर्वी मी हेच सांगितलं होतं आणि त्याला सर्वांनी अनुमोदन दिलं होतं. पण आजपर्यंत अशी बैठकच झालेली नाही. आमच्या प्रभागातील विषय काय असतात हे आम्हांला माहित असतात. कारण प्रत्येक प्रभागातील महिलांचा विषय काही वेळेला वेगळा असु शकतो. बलात्कार होईपर्यंत थांबायचं का? छेडछाडी होईपर्यंत थांबायचं का? आणि जोपर्यंत मुली घरी सांगत नाहीत की,आई मला हा त्रास देतो,मावशी हा मला त्रास देतो पण जेंव्हा एखादी नगरसेविका किंवा सामाजिक कार्यकर्ती आपल्या प्रभागामध्ये काम करते तेंव्हा ती त्या प्रभागाची आई बनते त्यामुळे मुली तिला सांगत असतात की,आई मला हा त्रास होतो. मा.महापौर आपल्याला विनंती आहे की, आज महाराष्ट्रामधले विषय बघीतले तर प्रत्येक प्रभागामध्ये वेगवेगळे विषय आहेत. आणि प्रत्येक विषय हाताळताना आम्हांला

सुध्दा त्रास होतो. कमिशनरसाहेब आम्हाला तुमची साथ पाहिजे. आणि महापौर आमच्यापेक्षा तुमचा जास्त वचक आहे.सत्तारुढ पक्षनेते तुमचा जास्त वचक आहे. पोलिस कमिशनर सोबत आमची एक मिटींग लावुन द्या. आमच्या वॉर्डातील जे,जे विषय आहेत ते त्या पोलीस चौकीपर्यंत पोहचतील. आणि आम्हाला हाताळण्यासाठी आम्हांला एक नवीन संधी मिळेल. हे जे नराधम आहेत त्यांना फक्त फाशीची शिक्षा नाही तर जसं बेंगलोर पॅटर्न झाला तसा पॅटर्न हा राबवलाच पाहिजे. मग तो माणुस कुठल्याही जाती धर्माचा असो पण मला वाटतयं आपण हे फक्त बोलतोय,हे बोलण्यासाठी त्याची अंमलबजावणी करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेकडुन आपल्याला काय करता येईल यासाठी तुम्हां सगळयांना मिळून यासाठी आपल्याला प्रयत्न नाही तर उपाययोजनाच करावी लागेल.प्रत्येक मुलगी घरांमधुन जेंव्हा शाळेमध्ये जाते भाजी आणायला जाते,कामाला जाते,घरातुन बाहेर जाते मला वाटतं प्रत्येक मुलगी ही पहिल्या वर्षापासून कुठल्या ना कुठल्या बलात्काराला सामोरे गेलेली असते. शब्दीक बलात्कार असतील बलात्कार म्हणजे तोच विषय नसतो की,त्याच वेळेला बलात्कार झाला. माई तुम्ही खरोखरचं आमच्या माई आहात महापौर नंतर पण बाई म्हणुन ज्यावेळेस तुम्ही या व्यासपीठावर बसलेले आहात त्यावेळेस तुम्हांला हा विषय घ्यावाच लागेल. कारण ही या काळाची खुप मोठी गरज आहे. यासाठी तुम्हांला उपाययोजनेसाठी तुम्हांला जे काही करता येईल ते तुम्ही करा. मी सुध्दा माझ्या प्रभागाच्या वतीनं मी या हाथरस घटनेचा निषेध नोंदवते यासाठी काही तरी ठोस उपाययोजना झाली पाहिजे. याच्यापुढे बोलताना आम्ही काय करायचं,काय अंमलबजावणी करायची एवढं न बोलता याच्यावर आपण काय केलयं याच्याबद्दल पुढच्या वेळेला काय सांगता आलं तर सांगावे. आयुक्त साहेब, आपण पोलीस कमिशनर बरोबर एक मिटींग लावून द्या. एवढीच विनंती करते,जयहिंद,जय महाराष्ट्र.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, आता जो ठराव मांडला आहे त्यामध्ये ज्या मुलीची मयत झालेली आहे तिला श्रध्दांजली अर्पण केली आहे.माझ्या वतीने आणि राष्ट्रवादी पक्षाच्या वतीनं श्रध्दांजली अर्पण करते.हाथरसची जी घटना आहे गेली ५/६ दिवस टी.व्ही.लावला की, खरोखरचं इतकी वाईट परिस्थिती आज बघायला मिळते आहे. तिथेच बघायला मिळते अशातला भाग नाही याच्यामध्ये महाराष्ट्र सुध्दा काही कमी नाही. फक्त एवढंच आहे की, बोलायचं तर कसं बोलायचं इकडे सत्ता कोणाची,तिकडे सत्ता कोणाची मगाशी भगिनींनी सांगितलं आहे की, मला महाराष्ट्र सरकार किंवा केंद्र सरकार बद्दलही

बोलायचं नाही. आम्हांल बोलायचं आहे ते फक्त एक महिला म्हणुन बोलायचं आहे. कुठल्याही सरकार बद्दल बोलायचं म्हणल तर ताट एकच आहे फक्त वाटया वेगवेगळया आहेत. अशी परिस्थिती सगळयाच ठिकाणी झालेली आहे. कोणाला बोलावं तर अडचणीच अडचणी निर्माण होतात.त्यापेक्षा या विषयाकडे आम्ही एक महिला म्हणुन बघतोय. महाराष्ट्रामध्ये सुध्दा भरपूर घटना घडलेल्या आहेत. कोविड सेंटरमध्ये ६/७ घटना घडलेल्या आहेत. पुण्यामध्ये तर डॉक्टर महिलांवरच घटना घडली आहे. हे घडत असताना कुठे तरी पुरुषांची मानसिकता बदलली गेली पाहिजे. आणि पुरुषांनी महिलांच्या पाठीमागे खंबीरपणे उभं राहीलं पाहिजे. असं मला या प्रसंगी वाटतं. जसं आता माझ्या काही बांधवांनी सांगितलं की, खुप मोठी कडक शिक्षा झाली पाहिजे. मी तर म्हणते आपण सगळयांनी मिळून माणुस म्हणुन आणि हे प्रत्येक व्यक्तींनी अशी घटना कुठे घडली तर त्याच्याकडे आपल्याला दुर्लक्षित करुन चालणार नाही. कॉलेज,गार्डन कुठेही असेल ज्यावेळेला आमच्याकडे बर्ड व्हॅली गार्डनला ९.३० वाजता उडी मारुन एक मुलगी किंवा मुलगा ज्यावेळेला आतमध्ये जातो ती घटना तिथल्या दत्तनगरमधलीच होती. आणि ती मुलगी वयाने लहान होती आणि ती प्रेग्नंट होती. म्हणजे अशा घटना घडूनही आई-वडील गुन्हा दाखल करीत नाहीत. आता असं काही झाल्या,झाल्या गुन्हा दाखल करतात, ॲबोरशन केलं जातं, तिला कस्टडीत ठेवलं जातं. परंतु या घटना समाजामध्ये वारंवार घडत असतात. अशा भावनीक घटना घडत असताना त्या आई-वडीलांना,पत्रकारांना,सामाजिक कार्यकर्त्यांना, PM सुध्दा सामाजिक कार्यकर्तेच आहेत नां परंतु त्यांच्यापर्यंत जाऊ न देण्याची तिथली पोलीस फौज असेल किंवा तिथल्या यंत्रणेची मानसिकता सुध्दा नव्हती. कुठल्याही घरामध्ये एखादी मयत झाली तर आपल्याला त्यादिवशी जाता आलं नाही तर दुस-या दिवशी तिथं जाऊन त्यांच सांत्वन करुन येतो. परंतु तिथली परिस्थिती बघीतली तर फार भयानक होती. मग त्या सरकारला तिथं काय करायचं होतं. पहिल्यांदा म्हणले बलात्कार झाला नंतर त्यांच्या कुटूंबातील लोकांनी सांगितल्यानंतर हे सगळं उघडकीस आलं.माई समाजामध्ये खुप अवघड परिस्थिती आहे. त्यासाठी प्रत्येक मुलीला सक्षम केलं पाहिजे. इथे दुसरं-तिसरं करुन काही चालणार नाही. या प्रत्येक मुलीला आपण ताकद दिली गेली पाहिजे, प्रत्येक मुलगी ही भक्कम झाली पाहिजे.महिलांना आपण कोर्सेस देणार पण कोर्सेस मध्ये तिला कराटेचं प्रशिक्षण,शिक्षणाच्या बाबतीत कोर्सेस दिलेले आहेत का? प्रत्येक प्रभागामध्ये महिला नगरसेविका आहेत त्यांनी आपआपल्या प्रभागामध्ये या गोष्टीवर वचक ठेवला पाहिजे.आपण उत्तर प्रदेश सोडून

द्या आपण पिंपरी चिंचवड मधील सर्व नगरसेवक,नगरसेविका आहेत यांनाही वाटतयं असं कुठंही घडु नये म्हणुन आपण इथे सगळयांनी हा विचार केला गेला पाहिजे.मागच्या वेळेस मी म्हणले होते की, एखादा प्रोजेक्ट तुम्ही करु नका पण कॅमेरे बसवा. झालं का? काही झालं नाही. आपण फक्त इथे सभागृहामध्ये बोलतो पण त्याची अंमलबजावणी होत नाही. आता या सगळया गोष्टींचा कंटाळा आला आहे. माई, मी मागच्या वेळेस तर तुम्हांला सांगितले होते की, माझ्या वार्डातील नवीन काही प्रोजेक्ट करु नका पण संपुर्ण पिंपरी चिंचवड शहरामध्ये प्रत्येक ठिकाणी कॅमेरे बसले पाहिजेत. पण आपण तसे केले नाही. मग काय उपयोग आहे इथे बोलून याठिकाणी आपण श्रध्दांजली वाहणार आणि घरी जाणार कोणी कुठल्या सरकार बद्दल बोलायचं म्हणलं तर कोण बोलणार नांव ठेवायची नाहीत. म्हणजे घटनेबद्दल बोलायचं आपण काय करायचं माई याच्यावर तर आपण आपलं पिंपरी चिंचवड सांभाळलं पाहिजे,आपला वॉर्ड सांभाळला पाहिजे. आणि याच्यासाठी उपाययोजना शोधल्या पाहिजेत. सुजाता भक्कम आहे कमिशनर साहेबांनी पोलिस कमिशनर बरोबर मिटींग लावली नाही तर ती पोलीस स्टेशनमध्ये घुसेल. तिथल्या पी.आय.ला बसवेल याची मला गॅरंटी आहे.परंतु हे कशासाठी त्यांच्यावर दबावतंत्र आलं पाहिजे की, पिंपरी चिंचवड मध्ये कुठे काही घडलं नाही पाहिजे. नवीन आलेल्या पोलीस कमिशनर साहेबांनी सगळयांना नंबर पाठवले आहेत पण नंबर पाठविल्याने सगळीकडे तशी परिस्थिती आहे का? त्यांनाच सांगू द्या सगळीकडे अलबेल आहे म्हणुन पण महापौर म्हणुन आपण त्यांच्या बरोबर एखादी मिटींग लावली तर त्यांच्यावर थोडासा वचक राहील. नाही तर इथे निवडुन आलेली प्रत्येक व्यक्ती सक्षम आहे आणि प्रत्येक व्यक्ती तिथे जाऊन भांडू शकते. भांडण कुठल्या पध्दतीने करायची हे त्यांना माहित आहे. अधिकारी कसा आहे त्या पध्दतीने वागू शकतो. परंतु याठिकाणी भांडण करुन चालणार नाही. तर आपल्याला या मुळ गोष्टी समजायला पाहिजेत. आणि म्हणुन कमिशनर साहेब,खरंच तुम्हांला या गोष्टीमध्ये पडायचं असेल तर पिंपरी चिंचवड शहरामध्ये नुसतं खोदकाम करुन केबलवाल्याला देवुन टाका. पण त्याच्या बरोबर कॅमे-याचे केबल आहेत की नाही हे बघा मी तुम्हांला त्यावेळेस सुध्दा सांगितले होते. हे बघुन घ्या आणि प्रत्येक ठिकाणी आपला कॅमेरा बसला पाहिजे. परंतु हे कुठेही होणार नाही सभागृहात या ओरडा आणि निघुन जा याच्यामध्ये कोणाची मानसिकता आहे काम करण्याची असं म्हणल तर काय म्हणायचं प्रशासनाची नाही का? आता इथं आलेल्या शासनाच्या लोकांची नाही. या सभागृहामध्ये सिनियर लोक बोलल्यानंतर सुध्दा कॅमेरे का?

बसवले नाहीत. मी कॅमेरे हे माझ्या घरी लावावेत असं सांगितल नाही. या सभागृहात बोलल्यानंतर काहीही होत नाही. आणि म्हणुन मी सर्व नगरसेवक आणि नगरसेविकांनाही सांगेन की,तुम्ही तुमचा प्रभाग सांभाळा प्रत्येक सदस्याला माहिती आहे की,आपली मुले/मुली असतील मी म्हणत नाही की,यामध्ये मुलांचाच दोष आहे, याच्यामध्ये काही अंशी ज्यावेळेस मी माझ्या डोळयांनी बघीतलं आहे की, ९.३० वाजता बर्ड व्हॅली मध्ये एक मुलगा आणि मुलगी आत मध्ये जाते याचा अर्थ ती मुलगी पण दोषी आहे. फक्त मुलगाच दोषी नाही.प्रत्येक वॉर्डामध्ये आपण आपल्या कार्यकर्त्यांची कमिटी असावी. आणि त्या पध्दतीने पिंपरी चिंचवड शहरामध्ये काम व्हावं. तरचं ती खरी श्रध्दांजली ठरेल असं मला वाटत माई. तेंव्हा कमिशनर साहेब,बघा तुम्ही अजुनही फिट आहात जर जमलं तर बघा. आमची अजुनही इच्छा आहे की, आपण इथंच रहावं आणि त्या इच्छेमध्ये तुम्ही चांगल काही काम करावं अशीच तुम्हांला नम्र विनंती करते आणि थांबते.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे-** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, आज याठिकाणी खरंतर भाऊसाहेबांनी ज्या विषयाला सुरुवात केली सगळयांच्याच मनामध्ये विषय होता की,आज आपण या विषयावर बोललं पाहिजे. आणि जे काही आमच्या मनामध्ये किंवा भाऊसाहेबांच्या मनामध्ये जे काही असेल ते या सगळयांच म्हणणं होतं की,बोलल्यानंतर देशात काय होतं,राज्यात काय होतं यापेक्षा आम्ही ज्या शहराचं नेतृत्व करतो त्या शहरामध्ये अशी घटना होऊ नये. यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. आजही मला आठवतयं की, २०१२ मध्ये माझ्या प्रभागात एक वाईट घटना घडली होती. एक छोटसं बाळ होत त्या बाळावर अत्याचार झाले होते. याबाबतीत आंदोलनं झाली,चर्चा झाली पण पुढे काही सोल्युशन नाही. रिंकु पाटील नावाची एक मुलगी होती तिच्यावर देखील ॲसिड फेकले होते. परंतु अशा घटनेला आजपर्यंत पूर्णविराम मिळाला नाही. ही मात्र अत्यंत शोकांतिका आहे,दु:ख आहे. ५० टक्के आरक्षण महिलांना मिळालं तरी आपण काय केलं. असा प्रश्न निर्माण होतो आणि मनात विचार येतो की, आपण याच्यामधनं काय केलं. परंतु हे करीत असताना माई आपल्याला आवर्जुन सांगावसं वाटतयं की, आपल्या शहरासाठी आपण नुसत न बोलता पुढच्या ४ दिवसामध्ये आपल्यामार्फत एक परिपत्रक निघालं पाहिजे की, आपण आपल्या शहरासाठी काय कृती तयार करणार आहोत त्याच एक पत्रक आपण काढलं पाहिजे. पिंपरी चिंचवडचे पोलिस आयुक्त हे शहरामध्ये पेट्रोलिंग करीत असतात.चार टवाळखोर पळून जातात आणि चौकात जाऊन थांबलेले असतात. एकदा आपण पुढे गेलो तर

मागे काय घडतं याची शहानिशा केली पाहिजे. आपल्या सगळयांच्या व्यापामुळे वेळ नसतो आणि आणि ही घटना आपल्याला शेवटची ठरवायची असेल तर आपण निश्चितपणे ख-या अर्थानी इम्पलीमेंट करणं,काम करणं,कृतीमध्ये एखादा विषय आणणं ही काळाची गरज आहे.कारण येथुन पुढे या सभागृहाला श्रध्दांजली वाहण्याचा सुध्दा हक्क आपला नाही. कारण आपण सर्व १३३ जण आणि सन्मा.आयुक्त साहेब आहेत,महापौर आमच्या समोर असताना जर आपण आपलं शहरात अशा घटना थांबवु शकलो नाही तर या सभागृहात येऊन काय उपयोग आहे. ही घटना दुस-या राज्यातील असली तरी ती एक स्त्री आहे तिच्याबद्दल आपण दु:ख व्यक्त करतोय पण त्याच बरोबर माझ्या शहरात अशी घटना घडणार नाही याची खात्री सुध्दा मा.आयुक्त यांनी दिली पाहिजे.आणि ही खात्री देण्यासाठी काय उपाययोजना केली पाहिजे. याचं एक नियोजन आपण केलं पाहिजे. तरचं ख-या अर्थानं आजची श्रध्दांजली अर्पण केल्यासारखं होणार आहे.पुन्हा एकदा आमचं जे बोलणं आहे ते सभावृत्तांत नांव येईल, पेपरला नांव येईल आणि संपल असं कृपया यापुढे होऊ नये अशी विनंती आहे. ख-या अर्थाने तिला श्रध्दांजली अर्पण करायची असेल तर मला वाटतयं की, प्रत्येक व्यक्तीला तिच्यावर अत्याचार झाले तर चौका चौकात मेणबत्त्या पेटवायचं आणि घरी जायचं त्यापेक्षा तसं होऊच नये यासाठी काय पाऊले टाकली पाहिजेत ते करा. आणि आपल्या शहराचा विकास करीत असताना कुठं तरी माझी बहीण,मुलगी,माझी मैत्रिण ही या शहरामध्ये सुरक्षित आहे का? आणि ख-या अर्थानं आपण एक महिला महापौर असताना आपण या शहरातील महिलांसाठी काय,काय केले आहे आणि सगळयात महत्वाची आपल्या शहराची जी नस आहे. ती नस कुठे दाबली आहे आणि ती दाबल्यामुळे शहरातील कोणत्याही नागरीकांना त्याची वेदना होणार नाही यादृष्टीकोनातून आपण निश्चितपणे पाऊले उचलली तर या मुलीच्या बाबतीत जी घटना घडलेली आहे तशी घटना आपल्या शहरात घडणार नाही. आणि हाथरसमधील घटनेमध्ये बळी पडलेल्या मनिषाला माझ्या वतीने श्रध्दांजली अर्पण करते जयहिंद,जयमहाराष्ट्र.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. " इतिहास के पन्ने फिर न दोहराएंगे शस्त्र उठालो द्रौपदी अब गौरी न आएंगे " खैरांजलीला झालेला महीलावरती अत्याचार असेल, आई आणि मुलीवरचा त्यातले सगळे आरोपी निर्दोष सुटले. कोपर्डीतले आजही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. दिल्लीच निर्भयाकांड झाल्यानंतर आपण सगळयानी या सभागृहात असलेल्या प्रत्येकानी संवेदना व्यक्त

केल्या. न्याय मिळायला सहा वर्षे लागले. आता आशाताईनी सांगीतल की, २०१२ ला, मला वाटत डॉ.निलम गो-हेच्या नेतृत्वामध्ये आम्ही महानगरपालिकेपासून तर असिस्टंट पोलीस कमीशनरांपर्यंत आम्ही मानवी साखळी केली होती आणि न्यायासाठी आम्ही  सलग अनेक दिवस पोलीसांबरोबर फिरत होतो. आरोपी कोण आहे, तीन वर्षाच बाळ अत्याचार करुन रेल्वेरुळावर टाकल होतं. तीचे आई-वडील इथन निघुन गेले. निगडीतल्या छोटया मुलीला आपल्या सगळयानाच ज्ञात आहे, मंगलाताई तुमच्या लक्षात असेल, गोदडीमध्ये सात वर्षाची मुलगी सापडली, आजही आरोपी सापडत नाही आणि कालचा हाथरस मधला, खैरंजलीचा मागासवर्गीय, कोपर्डीचा मागासवर्गीय, मनिषा तोच विषय असं काही नाही की मी जात म्हणून बघते त्या विषयाकडे. पण स्त्रिजातीवरती होणारे अत्याचार त्यातन होणारी आमची मुस्कटदाबी, श्रध्दांजली वाहायची म्हणल तरी पक्षाची बंधन. मला वाटत आपण किमान ज्या ज्या स्त्रिया आहोत आणि या समाजामध्ये आपण जर का पन्नास टक्के आरक्षण घेत असू तर आपल्याला कुठल्याही पक्षाच किमान स्वत:च्या अस्तित्वाचं.  आज मनिषा मेली नाही, आज भोतमांगले कुटूंबातील कुठल्या आई-भगीनीवर अत्याचार झाले नाही  त्या तीथ बळीपडल्या नाहीत, निर्भया बळी पडली नाहीतर या सभागृहात असणारी आणि तुमच्या आमच्या घरात असणारी प्रत्येक स्त्री त्याठिकाणी बळी पडलेली आहे. आमच्यासाठी, न्यायदानासाठी आम्हांला दारोदार फिराव लागत असेल तर आणि कुणाचा दबाव असेल,कोणाच्या  दबावाला बळी पडाव लागत असेल तर मी पाळत नाही तसली कुठील बंधन  आणि माननार पण नाही. काय करायचं माई,तुम्ही महापौर आहात,स्त्रीच आहात आपण प्रत्येकाच्या घरी पुरुषाला जन्म देणारी स्त्रीच आणि मला न्याय मागण्यासाठी मी बंधन पाळायची, का?  कुठल्या एका शहरात,कुठल्या एका राज्यात, कुठल्या तरी  ठिकाणी कोणाचं तरी सरकार आहे. देशभरामध्ये बघा,कोणाचं तरी सरकार आहे.सगळीकडे अशीच परिस्थिती आहे. बाकीचं मला माहिती नाही पण महिलांवरचे अत्याचार नक्कीच  कमी होत नाहीत.गर्व्हमेंट कुठलंही असलं तरी, आणि ही घटना होत असताना इथं काय केंद्रसरकार माझं आहे म्हणुन गप्प बसायचं, देशभरामध्ये वेगवेगळया ठिकाणी  माझी सत्ता आहे म्हणुन मी गप्प बसायचं. गेली ती पोरगी होती हो  कोणाची तरी,आत्याचार झाला आहे,पाठीचे मणके तोडले,जीभेला इजा केली,कापली बोलू नये म्हणुन खैरलांजीपेक्षा भयानक प्रकार केला होता. सभागृहात सांगताही येत नाही आणि बोलताही येत नाही. आणि हे सांगताना शरीर असं थरथरतं समोरच्यांना असं वाटतं की,काही तरी वेगळयाच गोष्टी  घडत जातात.

युध्द पेटलेलं आहे म्हणुन. आणि म्हणुन माई, मागच्या वेळेस आपण संभाजीनगरच्या गार्डनमध्ये जो प्रकार घडला होता त्यावेळेस आम्ही तुम्हांला सांगितलं होत की, शहरामध्ये ज्या,ज्याठिकाणी गार्डन्स आहेत,ज्याठिकाणी अनेक लोक एकत्र येतात त्याठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवा. आपण बसवतचं नाही, आपण बघतचं नाही, आणि मग आत्याचार झाला की मग आपल्याला काहीच मिळत नाही. आपण येतो श्रध्दांजली अर्पण करतो, आपल्याला काय बोलायचं ते बोलतो आणि निघुन जातो. मला वाटत की,एखादया महिलेवर अत्याचार झाला तर त्याच्यावर राजकीय परिस्थिती काय आहे. याच्यावर बोलण्यापेक्षा सामाजिक परिस्थिती काय आहे.समाजामध्ये एखादा वर्ग का इतका दाबला जातोय. खरंच त्या बिच्चा-याची बोलण्याची  ताकद नाही का? आणि म्हणुन त्यांना दाबलं जातयं का? हा सुध्दा खुप फरक होतोय साहेब, संविधानामध्ये सांगितल आहे की,माणसांनी माणसाला  माणसासारखं वागायचं  पण नाही वागवत. मग आक्रोश करायचा नाही, रडायचं नाही,भांडायचं नाही, कसं चालणार ? आणि आपल्यासारख्या महिलेला आपण ज्या समाजाचं प्रतिनिधीत्व करतो आपण त्या समाजाचं नाही तर संपुर्ण शहराचं  प्रतिनिधीत्व करणा-याला मनमानी म्हणत असु तर मला वाटतं प्रत्येकीनी आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. मा.महापौर साहेब,मागच्या वेळेस आपलं ठरलं आहे की,प्रत्येक शाळेच्या बाहेर असेल,कॉलेजच्या बाहेर असेल,पोलीस बसवा,त्यांची डयुटी लावा, आज तुम्ही जर गेलात तर म्हणजे आपण बोललो आणि त्याठिकाणी महिनाभरामध्ये त्याठिकाणी सगळं आलबेल सुरु झालं अनेक कॉलेज असे आहेत की, त्या कॉलेजमधनं मुलींना बाहेर येण्यास भिती वाटते. इथं जर का आम्ही लोकप्रतिनिधी म्हणुन बोलायला गेलो तर आपणच टारगेट होऊ म्हणुन पोलिसांची मदत घ्यायची. पोलिसाची दक्षता कमिटी असते तिची तुम्ही माहिती घ्या. कमिशनर साहेब, तुम्ही महानगरपालिकेचे कमिशनर आहात,पोलिस कमिशनर नाहीत. पोलिस कमिशनर साहेबांना आपण याठिकाणी ज्या प्रकारच्या सुविधा दिलेल्या आहेत. मग आम्हाला असं वाटल होतं की,या शहरामध्ये पोलिस कमिशनर आल्यानंतर जी काही गुन्हेगारी आहे ती कमी होईल. मला वाटत वारंवार तुमच्याकडे मीच तुमच्याकडे तक्रार करीत होते.आमच्यापेक्षा इतर लोकांना पोलिसांकडे गेल्यावर कशी वागणुक दिली जाते ते बघा. स्थानिक पोलिस स्टेशननी कुठल्याही प्रभागातील नगरसेवक असेल तर त्याला विश्वासात घेतलं पाहिजे. पण त्यांना विश्वासात घेतलं जात नाही. त्यांची कधी बैठक होत नाही. साहेब,आपल्या महापालिकेमध्ये एका महिला क्लार्कने तुमच्याकडे तक्रार दाखल केली होती. तुम्ही

कमिशनर आहात तुम्ही त्याला संशयित कधी करणार, तुम्हांला आढळला तर तोपर्यंत अनेक प्रकारचे दबाव तुमच्यावरती येतात. पहिलं त्याला घरी पाठवलं पाहिजे आणि मग त्याची चौकशी केली पाहिजे. पण आपण लेटच करतो आणि जिच्यावर अत्याचार झाली तिने तुमच्याकडे यायचं हो,अमक्या,अमक्यांनी माझ्याकडं बघीतलं होतं मला तिथं लज्जा निर्माण झाली आणि मग तुमचा निर्णय ठरणार मग त्यामध्ये पुरुष कोण आहे,महिला कोण आहे सगळयांची आळीमिळी गुपचिळी आहे. का? होतं साहेब,असं तक्रार आल्यानंतर पहिलं त्या आरोप घरी बसवायचं आणि मग चौकशी करायची, कोणी सांगितलं का गुन्हेगारांना हिंम्मत लागते साहेब,लक्षात घ्या तुम्ही, आता आमच्या भगिनी मंगलाताई म्हणाल्या मी ऐकलं,पाहिलं आहे. सुजाताताई म्हणाल्या बलात्कार हा शारीरीक नाही तर तो बघण्याने सुध्दा होतो. आम्हांला तुमच्याकडे न्यायासाठी भिक मागावी लागते. आणि आम्ही काही करु शकत नाही. आपण का करत नाही साहेब, तुमच्याकडे एखादयाबद्दल तक्रार आली असेल तर त्याला संधी दिली पाहिजे. पण याठिकाणी काय होतं माझी जर का तक्रार असेल तर मलाच आरोपीच्या कठडयात उभं केलं जातं. मी कुठल्या विषयावर बोलते हे तुम्हांला चांगलचं माहिती आहे. मला त्या विषयाचा याठिकाणी उल्लेख करायचा नाही. पण तुम्ही जर काळजी घेणार नसाल तर या महानगरपालिकेमध्ये आमच्या अनेक महिला भगिनी आहेत त्या वारंवार तुमच्याकडे तक्रार करतात त्यांच्या तक्रारीवर जर का आपण काळजी घेणार नसाल तर आपण आयुक्त आहात,आपण पालक आहात. मा.महापौर साहेब, मगाशी जसं भाऊसाहेबांनी सांगितलं की, आपण पत्र लिहा, पत्र तर लिहाच पण त्याचबरोबर आपल्या शहरातील प्रत्येक प्रभागामध्ये महिलांचे नेतृत्व मोठया प्रमाणात आहे.आपल्याबरोबर जेवढे पुरुष नगरसेवक आहेत सगळया जणांचे स्वभाव आपण पाहिलेला आहे. गेली १५ वर्ष या सभागृहात मी पण येते. सगळयांची मानसिकता, सगळयांच एकंदर बोलणं चालणं पाहतो त्यामुळे फार वेळ लागत नाही माणसं ओळखायला यांच्याबरोबर आपण एक कमिटी तयार करुन आपण दबावतंत्र शासनावरती वाढवलं पाहिजे. निर्भया प्रकरणानंतर असं वाटलं होतं की, बाबा आता ठिक आहे एवढा मोठा विषय झाला संपुर्ण देश पेटून उठला होता. आणि आता आम्ही सुरक्षित राहू गाव,खेडयात,गल्ली,मोहल्ल्यात कुठं ना कुठं हा प्रकार चालूच असतो. कुठं चुकतयं, संस्था कमी पडतात,समाजाचा दबाव कमी पडतो, काय केलं पाहिजे. पास्को ऑर्डर आल्यानंतर इतका स्ट्राँग कायदा आला की,मला असं वाटलं की, आता तरी लहान मुलीवरचे अत्याचार थांबतील. पण आपल्या शहरामध्ये ७

वर्षाच्या मुलीवर बलात्कार होतो,९ वर्षाच्या मुलीवर बलात्कार होतो. काय करायचं? अरे,तो निष्पाप जीव आहे तिला काहीच कळत नाही. काय होतंय स्वत:ला ते ही तिला कळत नाही. विरोधी पक्षनेते ससुन हॉस्पिटलला आले होते आणि आम्ही निलम गो-हेताई बरोबर आम्ही ससुन हॉस्पिटलला गेलो होतो. तिथे ८/९ वर्षाच्या मुलीवर झालेला अत्याचार त्या बाळाला कळतचं नव्हतं. ही घटना खुप जवळून पाहिलेली आहे. स्लममधले विषय तर बाहेर पण येत नाहीत हो, यांना तर काय वागणुक मिळते हे आम्ही डोळयांनी बघतो. हातापाया पडून गुन्हे दाखल करावे लागतात. म्हणुन माई,आपण सगळयांनी यासंदर्भातील खरंतर साहेब,आम्ही म्हणजे तुम्ही जसं म्हणता की, महिलांना प्रशिक्षण देतो पण नेमकं कशाचं प्रशिक्षण देता. मी स्टँडींग कमिटीची चेअरमन असताना मी ज्युडो कराटेचं ट्रेनिंग मुलींना वाडयावाडयात द्या,खाजगी शाळा,महापालिकेच्या शाळामध्ये द्या, कॉलेजमध्ये पण द्या. आपण हजारो कोटी रुपये आपण विकास कामावर उडवले आहेत.तुम्ही जर का याचा हिशोब काढला ना साहेब, त्याच्या .००००१% सुध्दा खर्च आपण या महिलांवर केलेला नाही. मानसिक सक्षमीकरण आणि शारीरीक सक्षमीकरण याच्या संदर्भात आपण काय करणार आहात. आम्ही सांगितलं की यांना ज्युडो कराटेचं ट्रेनिंग द्या आजपर्यंत आपण यावर काहीच केलेलं नाही. निर्भया प्रकरणानंतर सुध्दा आम्हांला वाटलं होतं आम्ही वारंवार पाठपुरावा केला होता पण आपण केलं नाही. महिलांना जसं ट्रेनिंग देता त्यांची आर्थीक उन्नती व्हावी म्हणुन त्याचप्रमाणे त्यांचे मानसिक सक्षमीकरण करणंही गरजेचं आहे. समोरच्यांनी नुसता पाय आपटला तरी महिलांच्या हातापायांना घाम फुटतो.या महिलांच सक्षमीकरण कोण करणार, त्याच्याकडं आपल लक्ष का नाही, महिला सक्षमीकरण झालं पाहिजे आणि त्यासाठी नवीन चांगले कायदे केले पाहिजे.त्यांचे आर्थीक सक्षमीकरण तर आपण करतोच मानसिकवरती पण करा आणि शारीरीकवरती पण करा.ज्युडो कराटे आले पाहिजे हे उद्याचं भविष्य आहे. उद्याचं भविष्य आहे हे आणि ते भविष्य आजच पुसलं जातयं. मागच्या वेळेस मला निनावी पत्र आलं होतं त्यावर शेवटपर्यंत कार्यवाही काही झाली नाही. मग काय त्या शिक्षकांची आपआपसा भांडणं ठिक आहे. त्या पुरुष शिक्षकाची ट्रान्सफर करा,६ महिने घरी बसवा, सस्पेंड करा, थर्ड पार्टीची एखादी कमिटी नेमा हे आपण नाही केलं. जे छोटे विषय आहेत सहजपणे आपण हाताळू शकतो. त्याच्याकडे दुर्लक्ष होतं आणि मग एकदा एक चोरी पचली की, माणुस मोठी चोरी करायला जातो. मा.महापौर साहेब,आपल्याला विनंती आहे की, आपण कमिशनर साहेबांना आदेश द्यावेत की, महिलांच्या आर्थीक सक्षमीकरणांकडे जसं

आपण जास्त लक्ष देतो तसं महिलांच मानसिक सक्षमीकरण आणि त्यांच शारीरीक जे आहे त्यामध्ये मुली असतील,महिला असतील महिलांना अनेक गोष्टी येतात तर त्यांच्याकडे शिकलं पाहिजे. मध्यंतरी आपण फेसबुकला व्हीडीओ पाहिला असेल,८० वर्षाच्या आजी खुप सुंदर लाठी-काठी फिरवत होत्या ते शस्त्र खुप चांगल आहे ते आत्मसात करता आलं पाहिजे. शिकता आलं पाहिजे.मुलींना जर अशा नाविन्यपुर्ण गोष्टी शिकवल्या आणि मला माझं स्वत:च जरी संरक्षण करता आल तरी समाजामध्ये ज्या वाईट घटना घडत असतात त्याला काही अंशी तरी पायबंद घालू शकतो आणि या लेकीचा तुम्हा-आम्हांला आशिर्वाद लागणार आहे. आणि तो आशिर्वाद आपण आपल्या पदरात कसा घ्यायचा तो निश्चितपणे मा.महापौर साहेब,आपण ठरवावं त्याच बरोबर पोलिस कमिशनर साहेबांबरोबर एक मिटींग आयोजित करावी. आयुक्त साहेब,१५ ऑक्टोबर पासून काही शाळा चालू होणार आहेत पण तुम्ही चालू करता की नाही हे आम्हांला माहिती नाही. जर आज शाळा चालू नसतील तर आता तुम्हांला अभ्यासाला खुप वेळ आहे. कमिशनर साहेब,यामध्ये फक्त मुलीच बळी पडतात असे नाही ८ ते ९ वर्षाचा कवळा पोरगा तुमच्या बंगल्याच्या थोडं पुढं गेलो आणि साईड मार्जीनच्या रस्त्याने टर्न मारला त्याठिकाणी त्याच्यावर अनैसर्गीक अत्याचार झाले होते. तो उभ्यानी रक्ताने नहालेला होता. हा सुध्दा प्रकार समाजामध्ये घडतोय. तर याच्यावर कसा पायबंद घालायचा त्या कोवळया जीवांना जर आपण आतापासून चांगल शिक्षण दिलं,चांगले आचार-विचार,संस्कार त्यांच्यावर दिले तर निश्चितपणे या गोष्टीवर आपण पायबंद घालू शकतो. परत एकदा याठिकाणी या सगळया अत्याचारीत ब-याच बळी पडलेल्या माझ्या भगिनी आहेत यामध्ये कोणाची मुलगी असेल,कालपरवा गेलेली मनिषा असेल तिला मी याठिकाणी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करते. आणि परत एकदा मा.महापौर,मा. कमिशनर साहेब आपल्याला विनंती करते की, स्मार्ट सिटीमध्ये आपण या,या ठिकाणी कॅमेरे बसविणार आहोत तुपे साहेबांना माहिती आहे की,आम्ही अनेक वर्षापासून याची मागणी करीत आहोत. सर्व गार्डन, पाणीपुरवठा, प्रभाग आणि मध्यंतरी पोलिस आणि शासनाने काही आदेश दिलेले आहेत प्रभागातील चौका,चौकामध्ये कॅमेरे बसविण्यात यावे. म्हणुन आम्ही तुम्हांला मागच्या वेळेस विनंती पण केली होती की, आपले जे मॉनिटरींग सेंटर आहे ते आपल्या बिल्डींगमध्ये असलं पाहिजे. आणि हे सेंटर टिळक चौकात गेलंल आहे. तिथं आपला कंट्रोल राहणार नाही. आज तुम्ही याठिकाणी कमिशनर आहात उद्या दुसरेच कमिशनर येणार आहेत. तर ज्याठिकाणी वॉर रुम केला असेल, वरचा

मजला असेल किंवा आपल्याला राज्य शासनाचे फार काही नियम लागु नाहीत. अनेक ठिकाणी आपल्याकडनं नियमांची पायमल्ली होतच असते. जर का तुम्हांला हजार/दोन हजार स्के.फुटाची जागा लागत असेल तर ती या महानगरपालिकेच्या आवारात असली पाहिजे. आणि त्यावर महानगरपालिकेचा कंट्रोल पाहिजे. कारण चौकात लावलेल्या कॅमे-यापैकी अनेक कॅमेरे बंद आहेत. आणि तुम्ही परत स्मार्ट सिटीमध्ये जे कॅमेरे लावणार आहात ते चौकातच असणार आहेत. त्यातनं फार काही फायदा आम्हाला होणार नाही. म्हणजे महानगरपालिकेने स्वतंत्र म्हणजे नगरसेवक सांगतील त्याठिकाणी आणि मला जर विचारलं, सिमाताई तुम्हांला कॅमेरा बसवलेला आवडेल तर मी सांगेन बालाजीनगर लावा, ज्या ज्याठिकाणी अंधार आहे त्या,त्याठिकाणी मला कॅमेरे लावून द्या. कारण त्याठिकाणी अनेक वाईट प्रकार घडतात. तेंव्हा आम्ही तुम्हांला विनंती करतो की, खरंच याठिकाणी कॅमे-याची खुप गरज आहे कारण अत्याचारीत आम्हीच असतो आणि आम्हालाच न्याय मागण्यासाठी रस्त्यावर यावं लागतयं आमच्या बरोबर आमच्या भगिनी असतील आम्ही तुम्हांला मागणी करतो की, कॅमे-याची लवकरात लवकर व्यवस्था करावी आणि पोलिस कमिसशनर साहेबां बरोबर आपण मिटींग घेताना सर्वपक्षीय सदस्यांना बोलवून याच सभागृहामध्ये घेतली तर जास्त चांगले होईल. कोरोनाचा प्रादुर्भाव हळुहळु कमी होत आहे. परंतु अत्याचार थांबत नाहीत त्यामुळं त्याला प्रभागवाईज मिटींग तुम्हांला घेत नाही तर नवीन पोलिस कमिशनर साहेब आलेले आहेत ते डॅशिंग आहेत,अनेक नगरसेवकाबरोबर,सामाजिक कार्यकर्त्याबरोबर मी त्यांचे फोटोग्राफ्स पाहिलेले आहेत. एकंदरीत ठिक वाटतयं पण काम करतील तेंव्हा या शहरातील गुन्हेगारी,आत्याचार कमी करावेत त्यासाठी पोलिस कमिशनर साहेबांबरोबर एक मिटींग आयोजित करावी त्याच बरोबर प्रत्येक पोलिस स्टेशनचा पी.आय. आणि त्यांच्या हाताखालचे रायटर त्या त्या पोलिस स्टेशनच्या अंडर किती महिलांवरती आत्याचार झाले,विनयभंग असेल,बलात्कार असेल,छेडछाड असेल या प्रकरणात किती गुन्हे दाखल आहेत याचा लेखाजोखा घेऊन आपण बोलवावे आणि ख-या अर्थान आपण होणा-या गुन्हेगारीला आळा घालणार आहोत एवढंच मी आपल्याला याठिकाणी सांगते त्याचप्रमाणे सगळया अत्याचारीत महिलांना मी श्रध्दांजली वाहते आणि देवा परमेश्वरा त्या ज्याठिकाणी असतील त्याठिकाणी त्यांच्या आत्म्याला शांती लाभो धन्यवाद.

**मा.संगिता (नानी) ताम्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आज मी माझ्या कुटूंबातर्फे या मुलीला श्रध्दांजली वाहते. माझ्या प्रभागामध्ये संपुर्ण

झोपडपट्टी आहे. तर त्याठिकाणी कॅमेरे बसविण्यात यावे. कॅमेरे बसविल्यानंतर त्याठिकाणी कोणी महिलांची छेडछाड केली तर बघता येईल. मी पाठीमागे पण आयुक्तांना म्हणलं होतं की, आमच्या प्रभागामध्ये केबल टाकतात पण ते कशासाठी टाकतात पुर्ण लाईन खोदुन पण झालेली आहे. याबाबतीत मी त्यांना फोन पण केलेला होता. तर त्यांनी सांगितले होते की,आपण त्यांच्यावर कारवाई करु पण आजपर्यंत त्यांच्यावर काहीच कारवाई झालेली नाही.खोदलेलं काम तसंच आहे. फक्त त्यांनी केबल गाडलेली आहे. ही केबल कशासाठी गाडलेली आहे.त्यामध्ये कॅमेरे बसविले असते तर आम्ही म्हणले असते की,ही कॅमे-यासाठी खोदलेलं आहे.पण आम्हांला त्याची थोडी सुध्दा माहिती दिलेली नाही. प्रभागामध्ये जर अशा काही वाईट घटना घडल्या तर समजा आपण त्याठिकाणी कॅमेरे बसविले असते तर आपल्याला समजले असते. टॉवरलाईनचा विषय असो, त्रिवेणीनगर मधील चौकाचा विषय असु द्या,शिवाजी चौक याठिकाणाहून ज्या महिला कामाला जातात संध्याकाळी ९ ते १० च्या दरम्यान मुले महिलांची छेडछाड करतात त्याच ठिकाणी कॅमेरा असता तर कोणी छेडछाड केली आहे हे समजले असते. माझ्या प्रभागामध्ये एक अशी घटना घडली होती की, एक महिला पायी जात होती आणि काही मुले हे टु व्हीलर गाडीहून जात होते. आणि तिची छेड काढली होती. आता सिमाताईंनी जे सांगितल आहे तशी टोलवाटोलवी करु नका, ज्याठिकाणी केबल टाकलेली आहे त्याठिकाणी कॅमेरे तरी बसवा नां कॅमेरे बसविल्यानंतर कुठे गुन्हा घडतो हे पण आपल्याला समजेल. माझ्या प्रभागातील शाळेतील मुलींवर अत्याचार झाला होता यासंदर्भात मी आयुक्तांना पण पत्र दिलेलं होतं. त्यावेळेस रुपीनगरच्या डिपार्टमेंटनी मला सांगितलं होतं की, ताई,कुठे काय होतंय ते आम्हांला सांगा आम्ही त्याठिकाणी थांबून त्या मुलांवर कारवाई करतो. तुम्ही जर त्याठिकाणी कॅमेरे बसविले असते तर डिपार्टमेंटला सांगण्याची गरज पडली नसती नां, या मुलींच्या बाबतीत जी घटना घडलेली आहे तशी घटना आपल्या शहरामध्ये घडू नये एवढीच माझी इच्छा आहे. आणि प्रत्येक चौकात कॅमेरे बसविण्यात यावे. स्मार्ट सिटीच्या योजनेमध्ये बसणार आहेत म्हणुन सांगताय पण आतापर्यंत कुठंच कॅमेरे बसलेले नाहीत. ते कॅमेरे बसविण्यात यावे एवढंच सांगते आणि थांबते.

**मा.सचिन चिखले** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह हाथरस मध्ये जी घटना घडली आहे त्या घटनेचा मी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आणि पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने तसेच सर्व नगरसेवक,नगरसेविका यांच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. त्याचप्रमाणे माझे आदरणीय नगरसेवक

लक्ष्मणकाका ठंडे,दत्ताकाका साने,त्याचप्रमाणे जावेदभाई शेख यांनाही भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. सर्वपक्षीय नगरसेवक,नगरसेविका यांना एक सांगु इच्छितो की, पुन्हा एकदा दिड वर्षानंतर महापालिकेच्या निवडणुका आहेत कालावधी अत्यंत खुप कमी झालेला आहे. कमी कालावधीमध्ये हे कोरोना संकट आपल्या डोळयासमोर आहे.आणि या कोरोनासारख्या संकटाला सामोरे जात असताना आपल्या या तीन नगरसेवकांना शहीद व्हावं लागलं आहे. माझी सर्वपक्षीय पदाधिका-यांना विनंती आहे की, मा.महापौर साहेब,आपल्याला पण विनंती आहे की,ज्याठिकाणाहून हे नगरसेवक आपल्याला सोडून गेलेले आहेत त्याठिकाणी आता पुन्हा एकदा पोटनिवडणुक होईल तर ही पोटनिवडणुक न घेता सर्व पक्षाच्या नगरसेवकांनी याठिकाणी येऊन एकत्र बसलो आणि ज्या प्रभागातील नगरसेवक आपल्याला सोडून गेलेले आहेत त्यांच्याच कुटूंबातील एका सदस्याला पुन्हा ५/६ महिन्यासाठी संधी देण्यात यावी. आणि हीच एक मोठी श्रध्दांजली आपण एक समजु शकतो. त्याचप्रमाणे आपल्याला एक विनंती आहे की, कोरोनासारख्या या महामारीमध्ये प्रत्येक नगरसेवक काम करीत आहेत आणि यांना आपण विमा सुरक्षा कवच मध्ये घेतलं पाहिजे अशी विनंती करतो.आणि थांबतो.धन्यवाद

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह विषय खरा तर श्रध्दांजलीचा आहे. आणि भाऊसाहेब ज्यावेळेस एखादया विषयाची सुरुवात करतात त्यांचा प्रामाणिक हेतु असतो की, एखादया विषयाच्या संदर्भामध्ये आपण निषेध व्यक्त केला पाहिजे. त्याचे प्रिक्वॉशन आपल्या शहरामध्ये उमटले गेले पाहिजेत. हाथरसची घटना घडली मला आठवतय भाऊसाहेब, या सभागृहामध्ये आपण बोलतो. ५ तास एखादया मुलीवर जेंव्हा बलात्कार होतो अशा पध्दतीने आपण मला वाटतयं आंध्र प्रदेशामधील घटना होती.त्यावेळेस आपण अशाच पध्दतीची चर्चा केली याठिकाणी आपल्या सर्व महिला भगिनींनी आपले मनोगत व्यक्त केलं. पण सरकार कुठलेही असो मला कधी,कधी ठेवा की,कधी उत्तर प्रदेशमध्ये घटना घडतात तर कधी राजस्थान मध्ये घडतात अशा पध्दतीच्या भागामध्ये आज सुदैवाने आज कोणीही नाही जात पण एक निश्चितपणे सुजाताताईनी पोटतिकडीने आपल्या भावना मांडल्या आहेत की,महिलांच संरक्षण झालं पाहिजे.सर्व महिलांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. मा.आयुक्त साहेब,आपल्याला माझी विनंती आहे की, खरं तर या शहराचे पोलिस आयुक्त सुध्दा चांगले आहेत.यांच्या मागचा अनुभव पाहिला तर खरंच चांगले आहेत. मा.महापौर साहेब,माझी आपल्याला विनंती आहे की, आपल शहर सुरक्षित राहण्यासाठी स्मार्ट

सिटीच्या माध्यमातून आपण कॅमेरे बसवतोय परंतु कोणी तरी बोलता,बोलता सांगितल की, प्रत्येक गार्डन मध्ये जर कॅमेरे बसवले तर निश्चितच त्याचा चांगला उपयोग होऊ शकतो. याचं कारण आहे की, मंगलाताई या ज्याठिकाणी त्याच्या जवळ बर्ड व्हॅली गार्डन आहे त्याच भागामध्ये मी पण राहतो रात्री ९ ते १० वाजता ब-याच मुलं आणि मुली एखादया गार्डनमध्ये जातात.माझ्या डोळयासमोर एका मुलीला म्हणले की,बाळा तु इथं काय करतेस तर ती म्हणाली की,मी माझ्या मित्राला भेटायला आले. मी म्हणलो की,आता रात्रीचे ९.०० वाजले आहेत आणि तु मित्राला भेटायला आलीस तुझ्या जीवाचं काय कमी जास्त झालं तर परिस्थिती किती वाईट होईल. खरंतर या समाजाची मानसिकता बदलण्याची या पुढच्या काळाची गरज आहे. मा.महापौर साहेब,मी आपल्याला विनंती करतो की, माई आपल्या नावामध्ये माई आहे आणि प्रत्येकजण म्हणतो की, सुजाताताईंनी सांगितलं आहे की, पोलिस कमिशनरांच्या समोर सर्व महिला नगरसेविकांची एक मिटींग लागली पाहिजे.माई मला खात्री आहे की,तुम्ही आयुक्त साहेबांच्या बरोबर राहून कृष्ण प्रकाश साहेबांना फोन केला तर ते तुम्हांला कधीही वेळ देतील. यापुढच्या काळामध्ये आपल्या शहरातील महिलांच्या सुरक्षेसाठी जे,जे काही करता येईल त्यासाठी आमच्या सगळयांचा त्याला पाठींबा आहे. त्याला कोणी विरोध करेल अशी परिस्थिती नाही. म्हणजे सगळया पक्षाचे नगरसेवक असतील,पदाधिकारी असतील त्यांनाही असे वाटतं की,आपलं शहर हे महिलांच्यासाठी सुरक्षित असं असलं पाहिजे. मा.महापौर साहेब,मी आपल्याला विनंती करतो की, पोलिस आयुक्तांच्या समोर सर्व महिलांच्या बरोबर भेट घेऊन महिलांच्या सुरक्षेसाठी ज्या,ज्या उपाययोजना करता येईल त्या आपण कराव्यात या सभागृहामध्ये ५/६ माजी महापौर महिला आहेत त्यांनी त्या पदावर काम केलेलं आहे त्यांना माहिती आहे की,एखादया कामाची सुरुवात ही आपण केली पाहिजे. म्हणजे मागच्या वर्षी आपण महिलांच्या सुरक्षेच्या संदर्भामध्ये बोललो होतो पण एखादी गोष्ट नाही झाली. आपण पाठपुरावा करताना आपल्याला माहित आहे की,ही कॉर्पोरेशन आहे म्हणजे सरकारच्या कामामध्ये त्याला रेटा लावल्याशिवाय होत नाही. तेंव्हा मा.महापौर साहेब,आपल्या नेतृत्वामध्ये महिलांच्या सुरक्षेसाठी ज्या,ज्या महिलांनी सुचना केल्या त्या सूचनांची अंमलबजावणी होईल असं काम करावं एवढीच विनंती करतो. आणि सचिनने खुप चांगली सूचना केली आहे मला माहिती आहे की,लक्ष्मण उंडे,दत्ता काका,जावेद शेख असतील हे तीनही नगरसेवक गेले ब-याचवेळा अशी परिस्थिती होती की, कॉर्पोरेशनचे कर्मचारी हे ८ तास काम

करतात आणि नगरसेवक हा समाजासाठी १५/१६ तास काम करतो. आणि सगळया नगरसेवकाची अशी काही परिस्थिती नाही. अनेक माजी नगरसेवकांचा इतिहास बघीतला तर आजही आजी- माजी नगरसेवक रिक्षा चालवतात याची आपल्याला कल्पना आहे. माझी विनंती आहे की,एखादयाने सांगितलं की,मला नको आहे हे परंतु ज्या कुटूंबाची वाईट परिस्थिती आहे त्या कुटूंबाला अशा नगरसेवकाला अशा पध्दतीचं कोरोना विमा कवच दिलं तर मला वाटतयं की, बाकीचे जे काम करतात सुदैवाने आपली कोरोनाची संख्या कमी होत चाललेली आहे. परंतु ज्यांच,ज्यांच अशा पध्दतीने निधन झालेलं आहे. त्यांना आपल्याला काय मदत करता येईल का? अशाही पध्दतीचा विचार करावा. ऍक्च्युएली निवडणुकीमध्ये सगळयांना असं वाटतयं की, अशा पध्दतीच्या निवडणुका आल्यानंतर सगळया पक्षाच्या नेत्यांनी एकत्रित बसुन आपण त्या संदर्भात काय निर्णय घ्यायचा हा त्या त्यावेळच्या परिस्थितीवर अवलंबुन असेल. त्या पध्दतीनं आपण काम करु या एवढंच मी याप्रसंगी आपल्याला सांगतो आणि थांबतो.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आजचा विषय श्रध्दांजली वाहणेसाठी मांडलेला आहे. मी सुध्दा या सभागृहात नगरसेवक लक्ष्मण उंडे,जावेद शेख,माजी नगरसेविका शकुंतला साठे, माजी महापौर रंगनाथदादा फुगे, भिमाताई फुगे यांचे पती पोपटराव फुगे यांचे दु:खद निधन झालेले आहे तसेच आपल्या शहरामध्ये कोरोनाच्या महामारीमुळे ज्यांचे निधन झालेले त्यांना माझ्या प्रभागाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. आणि आयुक्त साहेब, प्रत्येक चौकामध्ये,गार्डनमध्ये कॅमे-यांची खरोखरच गरज आहे कारण ज्या काही घटना घडतात त्या चौकामध्ये जास्त घडतात कारण चौकामध्ये ज्यांना काही कामधंदा नाही अशी मुले बसलेली असतात आणि ते मुलींची आणि मह्लिांची छेड काढीत असतात. कालच पेपरला बातमी वाचलेली आहे की, दिवे घाटामध्ये गाडीमध्ये मुलगी चालली होती तिच्या बरोबर माणसं असताना सुध्दा तिची छेडछाड होत असेल तर आपल्याला सुध्दा बाहेर पडायची भिती वाटायला लागली आहे. महिला कितीही सुशिक्षीत असल्या तरी त्यांच्यावर सुध्दा आत्याचार होत आहेत.आपल्या मुलींना सुध्दा बाहेर पाठवायची भिती वाटत आहे. नशिब आता कॉलेज बंद आहे म्हणुन थोडसं प्रमाण कमी आहे. आणि शाळा,कॉलेज चालू झाल्यानंतर हा विषय वाढणार आहे. त्यांच्यावर कितीही कठोर कारवाई केली तरी हे थांबायला खुप अवघड आहे. आयुक्त साहेब,आता सुजाताताईंनी जो विषय मांडला आहे आपण पोलिस कमिशनर साहेबां बरोबर एक बैठक घेऊन अशा वाईट प्रवृत्तीचे जे लोक

आहेत त्यांच्यावर खरोखरच कठोर कारवाई केली पाहिजे तरच याला आळा बसेल.आणि ज्यांच निधन झालेलं आहे त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करते.

**मा.राहुल कलाटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आज आपण या सभागृहात आपल्या सर्वांचे सहकारी लक्ष्मण तात्या उंडे यांचे तसेच भिमाताई फुगे यांचे मिस्टर पोपटराव फुगे आणि शहरामध्ये गेल्या काही दिवसामध्ये कोरोनामुळे माजी नगरसेवक खरात, खोमणे यांचे दु:खद निधन झाले आहे त्यांना आपण श्रध्दांजली वाहिली आहे. तेंव्हा या सर्व जणांचे निधन झाले आहे त्यांना माझ्या पक्षाच्या वतीने आणि सभागृहाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. आणि संपुर्ण देशामध्ये हाथरसमध्ये जी घटना आहे त्याबाबतीत आपल्या सर्व महिलां सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केलेलं आहे. त्याबद्दलची संवेदनशिलता व्यक्त केली. आयुक्त साहेब,आपल्याला सर्वांनी सांगितलं आहे की, सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे, शिक्षण मंडळात बदल असतील, महिला बालकल्याण मध्ये काही बदल असतील माई आपल्याला माझी विनंती आहे की, या शहरामधील नागरीकांवर संस्कार घडवत असताना शिक्षण मंडळ असेल,महिला व बालकल्याण समिती असेल यांची कुठे तरी जबाबदारी आहे. परंतु मागील ४ वर्ष झाले किंवा त्याच्या आगोदर असेल कारण मी तर प्रत्येक सर्वसाधारण सभेमध्ये सांगत असतो की, या शिक्षण मंडळाच्या ठेकेदाराकडे,महिला बालकल्याणच्या ठेकेदाराकडे यांच्याकडे जरा आपण दुर्लक्ष करुन जरा फोकस या शहरातील लहान,लहान मुलं/मुली असतील यांच्यावर नक्कीच चांगले संस्कार होतील. पास्को सारखे कायदे याबाबतची माहिती सिमाताईंनी सांगितली आहे.पण समाजातील विचित्र मेंन्टॅलिटीची माणसं असतात यांना कुठं तरी थांबवता येत नाही असं मला वाटतं. हाथरस सारख्या घटनेनं तर देश हादरला आहे. निर्भयासारख्या घटनेनं देखील संपुर्ण देश पेटून उठला होता. त्यानंतर सत्तांतर झालं म्हणजे या देशामध्ये काहीही घडू शकतं. त्यानंतर हाथरस सारखी घटना झाली. मला अपेक्षीत होतं की, कंगना राणौत साठी पण खुप डिबेट चालल्या होत्या पण मला वाटत त्याच्यापेक्षा हाथरसच्या घटनेपेक्षा कमी प्रसिध्दी मिळते की काय? कुठं तरी अशी परिस्थिती या शहरात आणि या महाराष्ट्रात दिसते. आपण सर्वांनी महाराष्ट्रातील महिला म्हणुन आपण सर्वांनी निश्चित काळजी घेतली तर ज्या उत्तरप्रदेशमध्ये जी घटना घडली ती भविष्यात आपल्या गावात,शहरात,महाराष्ट्रात घडता कामा नये. अशा प्रकारे आपण सर्वांनी काम केलं पाहिजे.आता एकनाथरावांनी सांगितलं की, पोलिस कमिशनर साहेबांबरोबर एक मिटींग लावा. या महाराष्ट्रात चांगल काम करण्यासाठी

महाराष्ट्र शासनाचेही बारीक लक्ष आहे. आपणही आपल्या शहरात काम करण्यासाठी बारीक,बारीक लक्षं दिलं तर आयुक्त साहेबांना कोणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास सूचविलं आहे,कोणी महिला बालकल्याण समिती सक्षम करा, कोणी शिक्षण समितीच्या माध्यमातून लहान मुलांवर संस्कार करा. या गोष्टी आपण केल्या पाहिजेत. हे सांगण्या मागचं कारण की,प्रत्येकाला आपल्या शहराची काळजी आहे.म्हणजे कुठं तरी पक्षीय राजकारण बाजुला ठेवुन आपण या शहरातील मुलं/मुली यांच्यावर चांगले संस्कार करावेत हे आपल्या डोळयासमोर ठेवुन जर आपण काम केलं तर हाथरस सारख्या घटनेला आपल्याला सामोरं जावं लागणार नाही. निश्चीतच ही संस्कृती आपली नाही आपल्याकडे अशा घटना घडू शकत नाहीत. यापुर्वी आपण २/३ वेळा महिला सुरक्षा या विषयावर चर्चा केलेली होती.पण चर्चा करुन आपण काय केलं फक्त पुढे त्याची अंमलबजावणी आम्हांला दिसली नाही. असो,राजकीय पार्ट थोडा बाजुला ठेवु उद्या हाथरसची मनिषा असेल, आपल्या शहरातील आजी-माजी नगरसेवक असतील यांचे दु:खद निधन झाले आहे त्यांना मी माझ्या कलाटे कुटुंबियाच्या वतीने आणि या सभागृहाच्या वतीने पुन्हा एकदा भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. माई,मी आपल्याला पुन्हा एकदा विनंती करतो की, माई आपण असं एक काम करा की, या शहरातील महिला पिढयांनपिढया लक्षात ठेवतील की,माई सारख्या महिला या शहराला लाभल्याआहेत.आणि त्यांनी जो बेंच मार्क दिला या शहरातील महिला वर्षानुवर्ष काम करतील. अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह प्रथमत:गेल्या तासाभरापासून आपण चर्चा करतो आहोत. आज या आपल्या सभागृहामध्ये असणारे सदस्य माजी सैनिक लक्ष्मणराव उंडे यांचे कोरोनामुळे निधन झालं आहे तसेच आपल्या सहकारी नगरसेविका भिमाताई फुगे यांचे पती पोपटराव फुगे यांचे सुध्दा कोरोनामुळे निधन झालेल आहे. या सर्वांना प्रथम श्रध्दांजली अर्पण करतो. मागच्या वेळेस सुध्दा आपण या सभागृहामध्ये आपल्या सहका-यांना श्रध्दांजली वाहिली आहे. आणि आज या सभागृहामध्ये आपल्या सहका-याला श्रध्दांजली वाहण्याची वेळ आलेली आहे. खरं म्हणजे उंडेनी गेली २० वर्ष सैनिक म्हणुन काम केलं.आणि नगरसेवक म्हणुन दिघी परिसरामध्ये या माजी सैनिकाचे नेतृत्व त्यांनी उभं केलं आणि त्यांच्या माध्यमामधुन या सभागृहामध्ये माजी सैनिकाचे नेतृत्व म्हणुन लक्ष्मणराव उंडे यांची ओळख पहिल्याच सर्वसाधारण सभेला लक्ष्मणराव उंडे या सभागृहात आले त्यावेळेला मिल्ट्रीच्या पेहरावामध्ये

त्यांच्या खिशाला मेडल लावलेला पोशाख पहायला मिळाला. आणि मग आजही त्यांचा  याठिकाणी बसलेला तो पेहराव,त्यांची बसण्याची जी जागा आहे ती सातत्याने कायम आमच्या मनामध्ये राहणार आहे. अशा पध्दतीने ऊंडे साहेबांनी त्यांनी कोरोनाच्या काळामध्ये त्यांच्या प्रभागामध्ये चांगल्या प्रकारे काम केलं, गोरगरीबांसाठी काम केलं आणि त्यांना कोरोनाची लागण झाली बिर्ला हॉस्पिटलमध्ये जवळपास महिनाभर आपल्या मृत्युशी झुंज देत असतांना त्यांचा मृत्यू झाला आणि आज त्यांचा दशक्रिया विधी आहे. त्यांच्या गावाला त्यांचा दशक्रिया पार पडलेला आहे. त्यांना जाऊन आज दहा दिवस झालेले आहेत आणि अशा या सहकार्याला आपल्याला श्रध्दांजली वाहण्याची वेळ आलेली आहे. आता आपल्या सहका-यांनी सांगितलं आहे की, कोरोना पॉझीटीव्हची संख्या कमी होत आहे मृत्युची संख्या सुध्दा मागच्या २/३ महिन्याच्या पेक्षा थोडीशी कमी आहे. परंतु आपला सहकारी नगरसेवक जनतेची सेवा करताना त्यांना कोरोनाची लागण झाली आणि ते आपल्यातून गेलेले आहेत. त्यांना आणि पोपटराव फुगे यांना श्रध्दांजली अर्पण करतो. आणि हे खरं आहे की, मगाशी आमच्या ताईंनी सांगितलं आहे की, हाथरसमधील घटनेमध्ये मनिषाताईवर  जो आत्याचार झाला जी घटना घडली तरी विकृती आहे.आज आपण बघीतलं असेल उत्तरप्रदेश असेल,राजस्थान असेल,महाराष्ट्र असेल,पुणे जिल्हयातील खेड-चाकणचं प्रकरण आपण गेल्या एक ते दिड महिन्यापूर्वी बघीतल आहे. ज्या गावातील आपण घटना बघीतली आहे. राजस्थानमधील घटनाअसेल, आंध्रप्रदेश मधील घटना असेल या सरकार मधील असेल परंतु या घटना होत आहेत आणि या घटनेला पायबंद लावायचा  असेल तर विकृतीला पायबंद लावण्याचं काम तुम्हाला आणि आम्हालां करायचं आहे. कायद्यांमध्ये ताईंनी मगाशी सांगितल आहे की, पोस्कोचा कायदा आला त्यामुळे ब-याच अंशी जरब बसण्याचं काम झालेलं आहे. मी याठिकाणी उल्लेख करणार नाही परंतु जी काही विकृती आहे. हाथरसमधील घटना असेल किंवा वेगवेगळया राज्यामधील महिलांच्या वर होणारे अत्याचार हे विकृतीचे परिणाम आहेत. आणि अशा प्रकारचे विकृती होऊ नयेत म्हणुन त्यांच्यावरती धाक असावा अशा प्रकारची भावना प्रत्येकानी याठिकाणी व्यक्त केलेली  आहे.आणि ती भावना याठिकाणी व्यक्त करीत असताना हाथरस मधील घटना असेल,खैरलांजी मधील घटना असेल किंवा निर्भयामधील घटना असेल आपण याठिकाणी आपण सर्वजण राजकीय कार्यकर्ते आहोत प्रत्येकजण आपआपल्या भागामध्ये याठिकाणी आपण पिंपरी चिंचवड शहराचा विचार करतो प्रत्येक नगरसदस्यांनी याठिकाणी सांगितल आहे की, अशा

प्रकारची विकृती किंवा महिलांवरचे अत्याचार होऊ नये यासाठी आपण काय केलं पाहिजे. ही प्रामुख्याने भुमिका याठिकाणी मांडत असताना प्रथमत: जी हाथरसमध्ये जी घटना झालेली आहे त्याची चौकाशी करण्याचे आदेश सीबीआयला दिलेली आहे. ही चौकशी त्याठिकाणचे सरकार करेल परंतु पोस्कोचा कायदा याठिकाणी आला आणि आशा पध्दतीचा कायदा यावा म्हणुन आपण सुध्दा महानगरपालिकेच्या वतीने तशा संदर्भाचे पत्र आपण आदरणीय पंतप्रधानांना पाठवू परंतु आमच्या नगरसदस्यांनी उल्लेख केला आहे की, आमच्या मुली ज्यावेळेला शाळेमध्ये जातात त्यांची त्याठिकाणी छेडछाड होते तसेच अनेक प्रकारचे गुन्हे सुध्दा या महिलांच्या आणि मुलींच्या बाबतीत सुध्दा या शहरामध्ये झालेले आहेत. आणि म्हणुन सन्मा.महापौर साहेब,आपण ५/६ दिवसापूर्वी आयुक्तांच्या समवेत कमांड कंट्रोलची त्याठिकाणी पहाणी केली. आणि मला असं वाटतं की,स्मार्ट सिटीच्या माध्यमामधुन जवळपास ४५०० कॅमेरे याठिकाणी लावत आहोत.२/३ कॅमेरे प्रायोगिक तत्वावर याठिकाणी लावलेले आहेत. परंतु सन्मा.महापौर साहेब,आपण स्मार्ट सिटीचे संचालक आहात आपण सर्वांनी आयुक्तांच्या बरोबर पहाणी केली आहे. परंतु अजुनही जसं ताईनी उल्लेख की, एखादया चौकामध्ये हा कॅमेरा लागु शकतो परंतु एखादा आतला भाग आहे की,जिथं गुन्हेगारीचं किंवा छेडछाडीचं प्रमाण हे मोठया प्रमाणात असु शकतं. तर मला असं वाटतं की, सन्मा.महापौर आपल्या उपस्थितीमध्ये आपण या स्मार्ट सिटीच्या मध्ये अशा काही अजुन नगरसेवकांच्या मागणीनुसार आपण जर का त्याठिकाणी कॅमे-याची व्यवस्था केली आणि ख-या अर्थानं मोठया चौकामध्ये आपण कमांड सेंट्रलच्या माध्यमातून याच्यावरती पोलिसांच नियंत्रण असणार आहे त्या माध्यमातून आपण याठिकाणी कंट्रोल करु शकतो. परंतु जे काही कॉलनी असेल किंवा एखादा मोहल्ला असेल त्याठिकाणी सुध्दा अशा प्रकारचे गुन्हे किंवा छेडछाड किंवा मर्डर अशा प्रकारचे गुन्हे सुध्दा मुलींच्या बाबतीत होत असतात अशा ठिकाणी सुध्दा त्याठिकाणच्या नगरसेवकांना विचारात घेवुन आपण कॅमे-याची सोय केली पाहिजे. जे कॅमेरे कार्यरत आहेत ते कार्यान्वीत करण्याच्या संदर्भात सुध्दा तातडीने याठिकाणी आपण सर्व नगरसदस्यांच्या बरोबर आपण पोलिस आयुक्तांच्या समवेत सर्व नगरसदस्यांच्या बैठकीमध्ये शहरामध्ये असणा-या मुलींच्या किंवा महिलांच्या तक्रारी असतील आपल्या  पोलिस ठाण्याने याठिकाणी त्याची वर्गवारी करुन लक्ष द्यावं जेणेकरुन आपल्या शहरामध्ये अशा प्रकारच्या घटना होऊ नये मगाशी सगळयांनी उल्लेख केला की,आपण सर्वांनी २/४ तास चर्चा करुन याठिकाणी बोलतो पण त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. या कारवाईच्या

माध्यमामधुन आपण तातडीने आयुक्तांना आदेश देवुन पोलिस आयुक्तांच्या समवेत या सभागृहामध्ये सोशल डिस्टींगचं पालन करुन ज्या,ज्या नगरसदस्यांना ,सर्वपक्षीय नगरसदस्यांना याठिकाणी बोलवता आलं तर त्याठिकाणी त्यांच्या समस्यांच निराकरण करता आलं तर आयुक्तांनी पोलिस आयुक्तांच्या मार्फत करावं अशी मा.महापौर साहेब,मी आपल्याला विनंती करतो. आणि खरं म्हणजे आपण या सभागृहामध्ये आज ब-याच नगरसदस्यांनी याठिकाणी उल्लेख केला शिक्षण समिती असेल किंवा महिला बालकल्याण समिती असेल मुलींच्यासाठी एक विशेष करुन एक नव्याने चांगले कोर्सेस जेणेकरुन कराटेचे कोर्स असतील किंवा असे स्वत: स्वालंबी बनण्यासाठीचे कोर्सेस या पुढच्या काळामध्ये तातडीने या आपल्या महानगरपालिकेच्या माध्यमामधुन आणावेत असं सुध्दा मी सन्मा.महापौरांना विनंती करतो. आणि श्रध्दांजलीची जी सूचना मांडली आहे त्या सर्वांना श्रध्दांजली अर्पण करुन आजची सभा ही मंगळवार दि.१३/१०/२०२० रोजी दुपारी १.४५ पर्यंत तहकुब करावी अशी मी याठिकाणी विनंती करतो.

**मा.संतोष लोंढे** – मा.महापौर साहेब, आताच पक्षनेत्यांनी सभा तहकुबीची सूचना मांडली आहे त्याला अनुमोदन देतो.

**मा.महापौर** – सर्व सन्मा.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन आयुक्तांना मी सर्व सभागृहाच्या वतीने सांगते की, पोलिस कमिशनर बरोबर त्याच बरोबर आपण स्वत: आयुक्त या नात्याने आम्हां सर्वपक्षीय महिला भगिनी त्याचप्रमाणे आपल्या पालिकेमध्ये काही कर्मचारी महिला आहेत त्यांच शिष्टमंडळ यांचे समवेत पोलिस कमिशनर साहेबांना एक निवेदन द्यावं आणि एक मिटींग आयोजित करणेत यावी. त्या मिटींगमध्ये आम्ही आमचे प्रश्न मांडू त्याचबरोबर आपण महिला बालकल्याण समितीच्या माध्यमातून आपण जो काही खर्च करीत असतो तो पण आपल्याला करणं महत्वाचं आहे त्याच बरोबर सिमाताईंनी सांगितलं आहे की,लाठी खेळ हा चांगलाआहे आणि खरंतर लाठी खेळ हा मी सुध्दा आवर्जुन पहात असते. त्याचबरोबर महिलांना कराटे हे प्रशिक्षण दिलं गेलं पाहिजे. हे प्रशिक्षण महिला बाकल्याणला सक्तीचे करावे अशी मी आयुक्तांना विनंती करते. त्याच बरोबर शहरामध्ये असलेल्या शाळा,वेगवेगळया संस्थेच्या ज्या शाळा आहेत त्यामध्ये प्राथमिक असेल,माध्यमिक असेल अशा शाळेला आपण आयुक्त या नात्याने एक सक्ती करावी की,प्रत्येक शाळेतील मुलींना लाठी आणि कराटेचं प्रशिक्षण दिलं गेलं पाहिजे. अशी सक्ती करणं हे गरजेच आहे.त्यामुळे आपल्या मुलीचं संरक्षण

होईल.आणि या संरक्षणामुळे मुलींवर होणा-या आत्याचाराला आळा बसेल. आणि आपण कॅमे-याचं आपण सर्व्हेक्षण केलेलं आहे. कमिशनर साहेब,हा विषय आम्ही प्रत्येक वेळेस या सभागृहामध्ये मांडत असतो.प्रत्येक ठिकठिकाणी कॅमेरे बसविणं फार महत्वाचं आहे. आता वेळ आलेली आहे.आपण विकास करीत असताना ज्यांच्यासाठी विकास करायचा आहे त्यामध्ये जेंन्टस आहेत,लेडीज आहेत यांचा सुध्दा विचार करुन ठिकठिकाणी कॅमेरे बसवले पाहिजेत. त्याच बरोबर अडगळीच्या ठिकाणी सुध्दा कॅमेरे बसले पाहिजेत. त्या अडगळीचा गैरफायदा घेवुन एखादया मुलींवर अत्याचार होतो त्या गुन्हेगाराला शोधण्यासाठी या कॅमे-याचा आपल्याला उपयोग होईल. सिमाताईंनी म्हणले आहे की, स्लम एरियामध्ये सुध्दा अनेक मुलींवर अन्याय आणि आत्याचार होत असतो परंतु तो बाहेर पडत नाही. खुप विनंती केल्यानंतर, एखादा विषय हाताळल्यानंतर कुठं तरी एखादा आपल्याला जबाब मिळतो. अशा स्लम एरियामध्ये देखील कॅमेरे बसले गेले पाहिजे. हा देखील महत्वाचा विषय आहे. ज्याठिकाणी माझ्या महिला भगिनी आहेत आणि मुली माझ्या नातीप्रमाणे आहेत तर त्या स्लम एरियामध्ये देखील कॅमेरे बसवले गेले पाहिजेत. जे नराधम मुलींवर अत्याचार करतात त्यांना कडक शिक्षा झाली पाहिजे की,येथून मागे अशी शिक्षा कधीच झाली नव्हती. त्या शिक्षेला प्रवृत्त करायचं काम आम्हा सर्व महिलांची आपल्याला विनंती आहे की, या शहरामध्ये महिलांना जगायचं असेल आणि आनंद लुटायचा असेल तर माझ्या महिला भगिनींना आणि मुलींना या प्रकाराला बळी कसं पडता येणार नाही त्याला आळा बसला गेला पाहिजे. त्यासाठी आपण सदैव प्रयत्न केले गेले पाहिजे. आणि या नराधमांना चांगली शिक्षा केली गेली पाहिजे ती मी याठिकाणी बोलून दाखवू शकत नाही. पण मला काय म्हणायचं आहे ते तुम्ही सर्वांनी ओळखून घ्या आणि कडक अशी शिक्षा द्या की,त्याची पुन्हा त्याची तशी वासना झाली नाही पाहिजे. त्याच्या बरोबर असणा-याला सुध्दा भिती वाटली पाहिजे. अशा या केसेस २ झाल्या तरी आपल्या या शहरामध्ये संपुर्ण देशामध्ये,राज्यामध्ये आपल्याला हा प्रकार कंट्रोल करता येईल.हाथरस मध्ये जी घटना घडलेली आहे त्यामध्ये त्या मुलीची जीभ कापली,तिचे मणके तोडले गेले आहेत अशा प्रकारचा एवढा अन्याय जर एखादया मुलीवर होत असेल तर आणि तीच मुलगी उद्या आई होणार आणि मुलाला जन्म घालील तरी भारताची पिढी पुढं जन्माला यायची सुध्दा आमच्या सारख्या महिलांना आणि मुलींना भिती वाटली जाईल आणि भारताची पिढी ही घटत जाईल म्हणुन हा विषय अतिशय गंभीर आहे या सभागृहामध्ये या घटनेला वाचा फुटलेलीआहे.

श्रध्दांजली अर्पण केली आहे पण श्रध्दांजली वाहताना आमचं हृदय भरुन येत आहे याची सर्वांनी दखल घेतली गेली पाहिजे. आयुक्त साहेब,मी आपल्याला विनंती करते की, आपण लवकरात लवकर पोलिस आयुक्तांबरोबर सर्वपक्षीय नगरसदस्यांबरोबर एक बैठक आयोजित करावी. आणि त्या मिटींगमध्ये आम्ही प्रत्येक महिला नगरसेविका चर्चा करतील. याठिकाणी श्रध्दांजली अर्पण केलेली आहे आणि आजची सभा मंगळवार दि.१३/१०/२०२० रोजी दुपारी १.४५ पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

**(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – ४९</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दि.६/१०/२०२० (दु.१.४५) ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक – १३.१०.२०२०</u> <u>वेळ – दुपारी १.४५ वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.६/१०/२०२० (दु.१.४५ वा.) ची तहकूब मा. महापालिका सभा मंगळवार दिनांक १३/१०/२०२० रोजी दुपारी १.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | महापौर |
| २) | मा.तुषार रघुनाथ हिंगे | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.राहुल गुलाब जाधव | |
| ५) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| ६) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| ७) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |
| ८) | मा.गायकवाड निर्मला मनोज | |
| ९) | मा.सागर बाळासाहेब गवळी | |
| १०) | मा.गोफणे अनुराधा देविदास | |
| ११) | मा.बारसे प्रियांका प्रविण | |
| १२) | मा.अजित दामोदर गव्हाणे | |
| १३) | मा.लांडगे सारिका संतोष | |

१४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

१७) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१८) मा.सावळे सिमा रविंद्र

१९) मा.लोंढे नम्रता योगेश

२०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२१) मा.गीता सुशिल मंचरकर

२२) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२३) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२४) मा.अनुराधा गणपत गोरखे

२५) मा.केशव हनुमंत घोळवे

२६) मा.अश्विनी भिमा बोबडे

२७) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२८) मा.संजय बबन नेवाळे

२९) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३०) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३१) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३२) मा.घोलप कमल अनिल

३३) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३४) मा.चिखले सचिन तुकाराम

३५) मा.यादव मीनल विशाल

३६) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३७) मा.प्रमोद कुटे

३८) मा.राजू मिसाळ

३९) मा.शैलजा अविनाश मोरे

४०) मा.बाबर शर्मिला राजू

४१) मा.अमित राजेंद्र गावडे

४२) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४३) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४४) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४५) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४६) मा.ढाके नामदेव जनार्दन

४७) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

४८) मा.करुणा शेखर चिंचवडे

४९) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

५०) मा.अपर्णा निलेश डोके

५१) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५२) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५३) मा.कोमल दिपक मेवानी

५४) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५५) मा.शाम गणपतराव लांडे

५६) मा.सुजाता सुनिल पालांडे

५७) मा.योगेश मंगलसेन बहल

५८) मा.कदम निकीता अर्जुन

५९) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६०) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६१) मा.पाडाळे निता विलास

६२) मा.काळे उषा दिलीप

६३) मा.पवार मनिषा प्रमोद

६४) मा.बारणे अर्चना तानाजी

६५) मा.अभिषेक गोविंद बारणे

६६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

६७) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६८) मा.निलेश हिरामण बारणे

६९) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

७०) मा.दर्शले रेखा राजेश

७१) मा.कलाटे राहुल तानाजी

७२) मा.ममता विनायक गायकवाड

७३) मा.कामठे तुषार गजानन

७४) मा.चोंधे आरती सुरेश

७५) मा.कस्पटे संदिप अरुण

७६) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

७७) मा.सविता बाळकृष्ण खुळे

७८) मा.सुनिता हेमंत तापकीर

७९) मा.चंद्रकांत बारकु नखाते

८०) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८१) मा.कुटे निर्मला संजय

८२) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

८३) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

८४) मा.आंगोळकर सागर सुनिल

८५) मा.मुंढे उषा अंकुश

८६) मा.कदम शशिकांत गणपत

८७) मा.लोखंडे चंदा राजू

८८) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

८९) मा.आशा धायगुडे-शेंडगे

९०) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९१) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

९२) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

९३) मा.नवनाथ दत्तू जगताप

९४) मा.संतोष बबन कांबळे

९५) मा.सोनवणे शारदा हिरेन

९६) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

९७) मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

९८) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

९९) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१००) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-महापालिका आयुक्त, मा.संतोष पाटील-मा.अतिरिक्त आयुक्त (१), मा.अजित पवार - मा.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.सुभाष इंगळे, मा.चारटणर- उपआयुक्त, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.निकम, मा.सवणे-सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.लोणकर, मा.बोदडे-सहा.आयुक्त, मा.मुंढे-प्र.शिक्षणाधिकारी, मा.डॉ.साळवे-अति.वैदयकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वायसीएमएच, मा.गायकवाड-जनतासंपर्क अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.गोफणे-आरोग्य अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक, मा. नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, रामविलास पासवान- लोकजनशक्ती पक्षाचे जेष्ठ नेते तथा केंद्रीय अन्न पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री यांचे निधन, अविनाश खर्शीकर – जेष्ठ मराठी चित्रपट, नाटय अभिनेता यांचे निधन, अशोक शिलवंत – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका सुलक्षणा धर यांचे वडील यांचे निधन, सुरेशजी गोरे– खेड विधानसभेचे मा.आमदार यांचे निधन, सुधाकर शिंदे – आयएएस अधिकारी यांचे निधन झाले असल्याने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.महापौर** – ही सभा मंगळवार दि.१३/१०/२०२० रोजी दुपारी २.१५ पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

-------

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – ४९</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दि ६/१०/२०२० (दु.२.००), दि.१३/१०/२०२० (दु.१.४५) ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक – १३.१०.२०२०</u> <u>वेळ – दुपारी २.१५ वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१३/१०/२०२० (दु.१.४५ वा.) ची तहकूब मा. महापालिका सभा मंगळवार दिनांक १३/१०/२०२० रोजी दुपारी २.१५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे — महापौर

२) मा.तुषार रघुनाथ हिंगे — उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.राहुल गुलाब जाधव

५) मा.वसंत प्रभाकर बोराटे

६) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

७) मा.बुर्डे सुवर्णा विकास

८) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

९) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१०) मा.गायकवाड निर्मला मनोज

११) मा.सागर बाळासाहेब गवळी

१२) मा.गोफणे अनुराधा देविदास

१३) मा.बारसे प्रियांका प्रविण

१४) मा.अजित दामोदर गव्हाणे

१५) मा.बोईनवाड यशोदा प्रकाश

१६) मा.लांडगे सारिका संतोष

१७) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१८) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१९) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२०) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२१) मा.सावळे सिमा रविंद्र

२२) मा.लोंढे नम्रता योगेश

२३) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२४) मा.लांडे विक्रांत विलास

२५) मा.गीता सुशिल मंचरकर

२६) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२७) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२८) मा.केशव हनुमंत घोळवे

२९) मा.अश्विनी भिमा बोबडे

३०) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३१) मा.संजय बबन नेवाळे

३२) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३३) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३४) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३५) मा.घोलप कमल अनिल

३६) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३७) मा.चिखले सचिन तुकाराम

३८) मा.यादव मीनल विशाल

३९) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४०) मा.प्रमोद कुटे

४१) मा.राजू मिसाळ

४२) मा.शैलजा अविनाश मोरे

४३) मा.अमित राजेंद्र गावडे

४४) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४५) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४६) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४७) मा.ढाके नामदेव जनार्दन

४८) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

४९) मा.करुणा शेखर चिंचवडे

५०) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

५१) मा.अपर्णा निलेश डोके

५२) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५३) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५४) मा.कोमल दिपक मेवानी

५५) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५६) मा.सुजाता सुनिल पालांडे

५७) मा.योगेश मंगलसेन बहल

५८) मा.कदम निकीता अर्जुन

५९) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६०) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६१) मा.पाडाळे निता विलास

६२) मा.काळे उषा दिलीप

६३) मा.पवार मनिषा प्रमोद

६४) मा.बारणे अर्चना तानाजी

६५) मा.अभिषेक गोविंद बारणे

६६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

६७) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६८) मा.निलेश हिरामण बारणे

६९) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

७०) मा.दर्शले रेखा राजेश

७१) मा.कलाटे राहुल तानाजी

७२) मा.ममता विनायक गायकवाड

७३) मा.कामठे तुषार गजानन

७४) मा.चोंधे आरती सुरेश

७५) मा.कस्पटे संदिप अरुण

७६) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

७७) मा.सविता बाळकृष्ण खुळे

७८) मा.सुनिता हेमंत तापकीर

७९) मा.चंद्रकांत बारकु नखाते

८०) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८१) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

८२) मा.आंगोळकर सागर सुनिल

८३) मा.मुंढे उषा अंकुश

८४) मा.कदम शशिकांत गणपत

८५) मा.लोखंडे चंदा राजू

८६) मा.आशा धायगुडे-शेंडगे

८७) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

८८) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

८९) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

९०) मा.संतोष बबन कांबळे

९१) मा.सोनवणे शारदा हिरेन

९२) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

९३) मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

९४) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

९५) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

९६) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-महापालिका आयुक्त, मा.संतोष पाटील-मा.अतिरिक्त आयुक्त (१), मा.अजित पवार - मा.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.सुभाष इंगळे, मा.चारटणर- उपआयुक्त, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.निकम, मा.सवणे-सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.लोणकर, मा.बोदडे-सहा.आयुक्त, मा.मुंढे-प्र.शिक्षणाधिकारी, मा.डॉ.साळवे-अति.वैदयकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वायसीएमएच, मा.गायकवाड-जनतासंपर्क अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.गोफणे-आरोग्य अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक, मा. नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**विषय क्रमांक १)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देष केल्याप्रमाणे खालील ०५ (पाच) विशेष समित्या नेमणे-

१) **विधी समिती** –
(टिप – विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत)

२) **महिला व बालकल्याण समिती** –
अ) महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करणे.
ब) महिला व बालकल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

३) **शहर सुधारणा समिती -**
(टिप–शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

४) **क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती -**
(टिप – क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

५) **मा.शिक्षण समिती-**
(टिप – शिक्षण समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

(टिप – उपरोक्त क्र.०१ ते ०५ प्रमाणेच्या विशेष समित्यांच्या मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका

अधिनियामाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या आहेत.)

------

**मा.नगरसचिव -** विषय क्रमांक १ - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देष केल्याप्रमाणे खालील ०५ (पाच) विशेष समित्या नेमणे- विशेष समित्यांच्या मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे करावयाच्या आहेत.

१) **विधी समिती**- विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

(विधी समितीवर ९ पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी-७७, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-३६, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना-०९, पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष आघाडी-२०१७ – ०५, पिंपरी चिंचवड महानगरपालिका महाराष्ट्र नवनिर्माण सेना – ०१ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता / विरोधीपक्षनेता / गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणे त्यांच्या वतीने विधी समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनतापार्टी- ०५, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी- ०३, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना- ०१ याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणे त्यांच्यामार्फत विधी समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवून ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वाच्या समोर उघडून

प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.किरण गायकवाड (जनतासंपर्क विभाग) यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे २) मा.वसंत प्रभाकर बोराटे ३) मा.भोंडवे संगिता राजेंद्र ४) मा.सुजाता सुनिल पालांडे ५) मा.चौगुले सीमा दत्तात्रय ६) मा.गोफणे अनुराधा देविदास ७) मा.सुलक्षणा राजू धर ८) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे ९) मा.अमित राजेंद्र गावडे या पालिका सदस्यांच्या विधी समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करणेत आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडून जाहीर करणेत आले.

**मा.नगरसचिव – (२) मा.महिला व बालकल्याण समिती-**

अ) महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

(महिला व बालकल्याण समितीवर २ पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी – ७७, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी- ३६, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना – ०९, पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष आघाडी-२०१७ – ०५, पिंपरी चिंचवड महानगरपालिका महाराष्ट्र नवनिर्माण सेना – ०१ याप्रमाणे असणारे पक्षांचे/ गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/ गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणे त्यांच्या वतीने महिला व बालकल्याण समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी- ०१, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-०१ याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणे त्यांच्यामार्फत महिला व बालकल्याण समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री

करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवून ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वाच्या समोर उघडून प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित किरण गायकवाड (जनतासंपर्क विभाग) यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांचे / गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता / विरोधीपक्षनेता / गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या / गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.गायकवाड निर्मला मनोज २) मा.मंगला अशोक कदम या पालिका सदस्यांच्या महिला व बालकल्याण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करणेत आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडून जाहीर करण्यात आले.

**मा.नगरसचिव – (२) मा.महिला व बालकल्याण समिती-**

ब) महिला व बालकल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

(महिला व बालकल्याण समितीवर ७ महिला सदस्यांचे नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी – ७७, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी- ३६, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना – ०९, पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष आघाडी-२०१७ – ०५, पिंपरी चिंचवड महानगरपालिका महाराष्ट्र नवनिर्माण सेना-०१ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणे त्यांच्यावतीने महिला व बालकल्याण समितीवर नामनिर्देशित करावयाच्या मा.महिला सदस्यांची संख्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनतापार्टी-०४, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी-०२, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना-०१ याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणे त्यांच्यामार्फत महिला व बालकल्याण समितीवर पालिका महिला सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते

पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवून ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडून प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित किरण गायकवाड (जनतासंपर्क विभाग) यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे २) मा.सविता बाळकृष्ण खुळे ३) मा.लोखंडे चंदा राजु ४) मा.राजापुरे माधवी राजेंद्र ५) मा.गीता सुशिल मंचरकर ६) मा.कदम निकीता अर्जुन ७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील या मा.पालिका महिला सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करण्यात आल्याचे मा.महापौर यांजकडून जाहीर करण्यात आले.

**मा.नगरसचिव-** ३) **शहर सुधारणा समिती-**

शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

शहर सुधारणा समितीवर ९ पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी – ७७, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी- ३६, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना – ०९, पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष आघाडी-२०१७ –०५, पिंपरी चिंचवड महानगरपालिका महाराष्ट्र नवनिर्माण सेना–०१ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणे त्यांच्यावतीने शहर सुधारणा समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनतापार्टी-०५, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी-०३, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना-०१ याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणे त्यांच्यामार्फत शहर सुधारणा समितीवर

पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवून ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वाच्या समोर उघडून प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित किरण गायकवाड (जनतासंपर्क विभाग) यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.साधना अंकुश मळेकर २) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे ३) मा.अनुराधा गणपत गोरखे ४) मा.सुनिता हेमंत तापकीर ५) मा.सोनवणे शारदा हिरेन ६) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर ७) मा.संगीता (नानी) प्रभाकर ताम्हाणे ८) मा.खानोलकर प्रज्ञा महेश ९) मा.अँड.भोसले सचिन सुरेश या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडून जाहीर करण्यात आले.

**मा.नगरसचिव- ४) मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती-**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर ९ मा.पालिका सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर ९ पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी-७७, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी-३६, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना – ०९, पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष आघाडी-२०१७-०५, पिंपरी चिंचवड महानगरपालिका महाराष्ट्र नवनिर्माण सेना–०१ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणे त्यांच्यावतीने मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी-०५, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी-०३, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना-०१ याप्रमाणात

असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणे त्यांच्यामार्फत मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवून ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडून प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित किरण गायकवाड (जनतासंपर्क विभाग) यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/ गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.अश्विनी संतोष जाधव २) मा.केशव हनुमंत घोळवे ३) मा.उत्तम प्रकाश केंदळे ४) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे ५) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ ६) मा. डब्बू आसवानी (हिरानंद) ७) मा.अपर्णा निलेश डोके ८) मा.भालेकर प्रविण महादेव ९) मा.दर्शले रेखा राजेश या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडून जाहीर करणेत आले.

**मा.नगरसचिव-** ५) **मा.शिक्षण समिती-**

मा.शिक्षण समितीवर ९ मा.पालिका सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

मा.शिक्षण समितीवर ९ पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी-७७, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी-३६, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना-०९, पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष आघाडी-२०१७-०५, पिंपरी चिंचवड महानगरपालिका महाराष्ट्र नवनिर्माण सेना –०१ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधीपक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन

महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणे त्यांच्या वतीने शिक्षण समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनतापार्टी- ०५, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी- ०३, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना- ०१ याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणे त्यांच्यामार्फत शिक्षण समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवून ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडून प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित किरण गायकवाडे (जनतासंपर्क विभाग) यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.सारीका शिवाजी सस्ते, २) मा.बारसे प्रियंका प्रविण, ३) मा.पवार मनिषा प्रमोद, ४) मा.बारणे माया संतोष, ५) मा.कामठे तुषार गजानन, ६) मा.मोरेश्वर महादू भोंडवे ७) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत, ८) मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर, ९) मा.वाघमारे अश्विनी विक्रम या पालिका सदस्यांच्या शिक्षण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करणेत आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडून जाहीर करणेत आले.

-------

**मा.महापौर-** सर्व समित्यांमध्ये निवड झालेल्या नवनिर्वाचित सदस्यांचे सभागृहाच्या वतीने हार्दीक अभिनंदन करणेत येत आहे.

**-----**

ठराव क्रमांक – ५६८ | विषय क्रमांक - १
दिनांक – १३/१०/२०२० | विभाग – मा.नगरसचिव

## विशेष समित्या

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देष केल्याप्रमाणे खालील १) मा.विधी समिती, २) मा.महिला व बालकल्याण समिती, ३) मा.शहरसुधारणा समिती ४) मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती, ५) शिक्षण समिती या ५ (पाच) विशेष समित्या नेमण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे, तसेच

१) मा.विधी समिती – विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे / नोंदणीकृत पक्षांचे / गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता / विरोधीपक्षनेता / गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या तौलनिक संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे २) मा.वसंत प्रभाकर बोराटे ३) मा.भोंडवे संगिता राजेंद्र ४) मा.सुजाता सुनिल पालांडे ५) मा.चौगुले सीमा दत्तात्रय ६) मा.गोफणे अनुराधा देविदास ७) मा.सुलक्षणा राजू धर ८) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे ९) मा.अमित राजेंद्र गावडे या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

२) मा.महिला व बालकल्याण समिती- अ) महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे / नोंदणीकृत पक्षांचे / गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता / विरोधीपक्षनेता / गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या तौलनिक संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.गायकवाड निर्मला मनोज २) मा.मंगला अशोक कदम या पालिका सदस्यांच्या व ब) मा.महिला व बालकल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश

क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे / नोंदणीकृत पक्षांचे / गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता / विरोधीपक्षनेता / गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या तौलनिक संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे २) मा.सविता बाळकृष्ण खुळे ३) मा.लोखंडे चंदा राजु ४) मा.राजापुरे माधवी राजेंद्र ५) मा.गीता सुशिल मंचरकर ६) मा.कदम निकीता अर्जुन ७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील या पालिका महिला सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे तसेच-

३) मा.शहर सुधारणा समिती- शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे / नोंदणीकृत पक्षांचे / गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता / विरोधीपक्षनेता / गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या तौलनिक संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.साधना अंकुश मळेकर २) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे ३) मा.अनुराधा गणपत गोरखे ४) मा.सुनिता हेमंत तापकीर ५) मा.सोनवणे शारदा हिरेन ६) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर ७) मा.संगीता (नानी) प्रभाकर ताम्हाणे ८) मा.खानोलकर प्रज्ञा महेश ९) मा.अॅड.भोसले सचिन सुरेश या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

४) मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती- मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे / नोंदणीकृत पक्षांचे / गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता / विरोधीपक्षनेता / गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या तौलनिक संख्याबळाच्या प्रमाणात १)

मा.अश्विनी संतोष जाधव २) मा.केशव हनुमंत घोळवे ३) मा.उत्तम प्रकाश केंदळे ४) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे ५) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ ६) मा. डब्बू आसवानी (हिरानंद) ७) मा.अपर्णा निलेश डोके ८) मा.भालेकर प्रविण महादेव ९) मा.दर्शले रेखा राजेश या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

५) मा.शिक्षण समिती- मा.शिक्षण समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/विरोधीपक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या तौलनिक संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.सारीका शिवाजी सस्ते २) मा.बारसे प्रियंका प्रविण, ३) मा.पवार मनिषा प्रमोद, ४) मा.बारणे माया संतोष ५) मा.कामठे तुषार गजानन, ६) मा.मोरेश्वर महादू भोडवे, ७) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत, ८) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर, ९) मा.वाघमारे अश्विनी विक्रम या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

-----

**मा.अ‍ॅड.मोरेश्वर शेडगे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - २

दिनांक – १३/१०/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.राजेंद्र लांडगे मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव –
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४४४ दि.०९/०९/२०२०

श्री.सुनिल तानाजी तांबे, रखवालदार यांचा मुलगा प्रदुम्न सुनिल तांबे वय वर्ष ११ याला थायलेसिमीया हा आजार जन्मत: आहे. सदर आजाराकरिता सीएमसी

हॉस्पिटल, वेल्लोर, तामिळनाडू या ठिकाणी दि.३०/०६/२०१८ ते ११/०८/२०१८ या कालावधीत उपचार घेतले असून त्याकरिता एकूण २७ लाख एवढा खर्च झालेला आहे. सदर २७ लाखांपैकी १२ लाखाची बीले श्री.सुनिल तांबे यांनी प्रतिपूर्तीकामी सादर केली असता त्यापैकी ८ लाखांच्या बीलांची प्रतिपूर्ती मंजूर करणेत आली असून ४ लाखांची बीले नामंजूर करणेत आलेली आहेत. तसेच उर्वरित १५ लाखांची बीले प्रतिपूर्तीकामी सादर केली असता ती नामंजूर करणेत आलेली आहेत. श्री.तांबे यांनी एकूण २७ लाख खर्च केला असून त्यापैकी ८ लाखांच्या बीलांची प्रतिपूर्ती मंजूर झाली आहे व १९ लाखांची बीले नामंजूर करणेत आलेली आहेत. या सर्व बाबी पाहता श्री.तांबे हे आर्थिक संकटात असून त्यांचे मुलाचे वैद्यकीय उपचाराचे खर्चाची बीले मंजूर करणे आवश्यक आहे. तरी श्री.तांबे यांचे मुलाला असणारा दुर्धर आजार पाहता विशेष बाब म्हणून त्यांची उर्वरीत १९ लाखांची वैद्यकीय प्रतिपूर्तीची बीले मंजूर करणेस मान्यता देणे.

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आकुर्डी येथे बांधण्यात येत असलेल्या १०० खाटांच्या रुग्णालयाच्या इमारतीचे कामकाज पुर्ण झालेले आहे. सदर रुग्णालयास कै.ह.भ.प. प्रभाकर मल्हारराव कुटे मेमोरीयल हॉस्पिटल, आकुर्डी असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा. बापू उर्फ शत्रुघ्न काटे-** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.अॅड.मोरेश्वर शेडगे-** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ५६९ विषय क्रमांक - २

दिनांक – १३/१०/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.राजेंद्र लांडगे मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव –

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४४४ दि.०९/०९/२०२०

श्री.सुनिल तानाजी तांबे, रखवालदार यांचा मुलगा प्रदुम्न सुनिल तांबे वय वर्ष ११ याला थायलेसिमीया हा आजार जन्मतः आहे. सदर आजाराकरिता सीएमसी हॉस्पिटल, वेल्लोर, तामिळनाडू या ठिकाणी दि.३०/०६/२०१८ ते ११/०८/२०१८ या कालावधीत उपचार घेतले असून त्याकरिता एकूण २७ लाख एवढा खर्च झालेला

आहे. सदर २७ लाखांपैकी १२ लाखाची बीले श्री.सुनिल तांबे यांनी प्रतिपूर्तीकामी सादर केली असता त्यापैकी ८ लाखांच्या बीलांची प्रतिपूर्ती मंजूर करणेत आली असून ४ लाखांची बीले नामंजूर करणेत आलेली आहेत. तसेच उर्वरित १५ लाखांची बीले प्रतिपूर्तीकामी सादर केली असता ती नामंजूर करणेत आलेली आहेत. श्री.तांबे यांनी एकूण २७ लाख खर्च केला असून त्यापैकी ८ लाखांच्या बीलांची प्रतिपूर्ती मंजूर झाली आहे व १९ लाखांची बीले नामंजूर करणेत आलेली आहेत. या सर्व बाबी पाहता श्री.तांबे हे आर्थिक संकटात असून त्यांचे मुलाचे वैद्यकीय उपचाराचे खर्चाची बीले मंजूर करणे आवश्यक आहे. तरी श्री.तांबे यांचे मुलाला असणारा दुर्धर आजार पाहता विशेष बाब म्हणून त्यांची उर्वरीत १९ लाखांची वैद्यकीय प्रतिपूर्तींची बीले मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आकुर्डी येथे बांधण्यात येत असलेल्या १०० खाटांच्या रुग्णालयाच्या इमारतीचे कामकाज पुर्ण झालेले आहे. सदर रुग्णालयास कै. ह.भ.प. प्रभाकर मल्हारराव कुटे मेमोरीयल हॉस्पिटल, आकुर्डी असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अॅड.मोरेश्वर शेडगे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ३

दिनांक – १३/१०/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.संतोष कांबळे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७४८५ दि.१६/९/२०२०

३) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७५१३ दि.२३/९/२०२०

पिंपरी चिंचवड शहरात कोरोना (कोविड-१९) विषाणूचा प्रादूर्भाव झालेला आहे. सदर विषाणूला प्रतिबंध करण्यासाठी राज्य सरकार तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्तरावर वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जात आहेत. यामध्ये महानगरपालिकेतील अत्यावश्यक सेवेतील कर्मचा-यांसह इतर विविध पदांवरील

कर्मचा-यांच्या नेमणूका करणेत आलेल्या आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कोरोना (कोविड-१९) विषाणूला प्रतिबंध करणेबाबत काम करणा-या सर्वच कर्मचा-यांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. महापालिकेने दि.२४ मार्च २०२० ते १७ मे २०२० व १४ जुलै २०२० ते २३ जुलै २०२० या कालावधीमध्ये ६५ दिवसांचा लॉकडाऊन कालावधी जाहीर करणेत आला होता. सदर कालावधीमध्ये सर्व लोकल रेल्वे सेवा / परिवहन सेवा व इतर दैनंदिन प्रवासी सेवा बंद करणेत आलेल्या होत्या. त्यामुळे अत्यावश्यक सेवेतील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना कामाच्या ठिकाणी ये-जा करण्यास अडचणी निर्माण झाल्या होत्या. तसेच सदरच्या लॉकडाऊनमुळे अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्व दैनंदिन सेवा तसेच हॉटेल, रेस्टोरंट व भोजनालय बंद करण्यात आलेली होती. त्यामुळे सदरहु कर्मचारी यांना भोजनाची व्यवस्था उपलब्ध झाली नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील नियमित सेवेतील तसेच अत्यावश्यक सेवेतील सर्वच अधिकारी / कर्मचारी यांनी जोखीम पत्करून कामावर हजर राहून त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी योग्यरित्या पार पाडली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका कलम ६७ (क) नुसार तातडीच्या परिस्थितीत जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना व खर्च करण्याची तरतूद आहे. कोरोना विषाणूचा (Covid 19) प्रसार व त्यावरील उपाययोजना अंतर्गत महानगरपालिकेतील विविध स्थापन केलेले कक्ष, रूग्णालये, कोविड केअर सेंटरमध्ये महानगरपालिकेतील बहुतांशी सर्वच विभाग व विभागातील अधिकारी / कर्मचारी लॉकडाऊन कालावधीत देखील वेळेचे बंधन न पाळता नेमून दिलेले काम करीत आहेत. सदर कर्मचा-यांना दि.२४ मार्च २०२० ते १७ मे २०२० व १४ जुलै २०२० ते २३ जुलै २०२० या ६५ दिवसाच्या लॉकडाऊन कालावधीमध्ये कोरोना विषयक काम करणारे महानगरपालिका कर्मचारी, मानधनावरील कर्मचारी व ठेकेदाराकडे काम करीत असलेले कर्मचारी यांना प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या प्रमाणात हजर दिवसाप्रमाणे प्रतीदिन र.रु.१५०/- (अक्षरी र.रु.एकशे पन्नास फक्त) प्रोत्साहन भत्ता मंजुर करणे व त्यासाठी प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत यावी.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड शहरात कोरोना (कोविड-१९) विषाणूचा प्रादुर्भाव झालेला आहे. सदर विषाणूला प्रतिबंध करण्यासाठी राज्य सरकार तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्तरावर वेगवेगळया उपाययोजना केल्या जात आहेत. यामध्ये महानगरपालिकेतील

अत्यावश्यक सेवेतील कर्मचा-यांसह इतर विविध पदांवरील कर्मचारी मानधनावरील कर्मचारी तसेच ठेकेदाराकडील काम करीत असलेले कर्मचारी यांना प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या प्रमाणात हजर दिवसाप्रमाणे प्रतीदिन र.रु. १५०/- प्रोत्साहन भत्ता मंजुर करणेचा विषय आहे. सदर विषयामध्ये मनपा कर्मचारी, मानधन कर्मचारी व ठेकेदाराकडील काम करणारे कर्मचारी यांचा समावेश करण्यात आलेला आहे. परंतु मनपातील कोपा (पासा) चे प्रशिक्षणार्थी विद्यार्थीही कोविड सेंटर येथे काम करीत आहेत त्यामुळे त्यांच्या कामाचे स्वरुप व धोका सारखाच असल्यामुळे या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या मानधनात वाढ करुन त्यांनाही प्रोत्साहन भत्ता लागू करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक -५७० विषय क्रमांक - ३
दिनांक – १३/१०/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.संतोष कांबळे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७४८५ दि.१६/९/२०२०
३) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७५१३ दि.२३/९/२०२०

पिंपरी चिंचवड शहरात कोरोना (कोविड-१९) विषाणूचा प्रादूर्भाव झालेला आहे. सदर विषाणूला प्रतिबंध करण्यासाठी राज्य सरकार तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्तरावर वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जात आहेत. यामध्ये महानगरपालिकेतील अत्यावश्यक सेवेतील कर्मचा-यांसह इतर विविध पदांवरील कर्मचा-यांच्या नेमणूका करणेत आलेल्या आहेत.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कोरोना (कोविड-१९) विषाणूला प्रतिबंध करणेबाबत काम करणा-या सर्वच कर्मचा-यांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. महापालिकेने दि.२४ मार्च २०२० ते १७ मे २०२० व १४ जुलै २०२० ते २३ जुलै २०२० या कालावधीमध्ये ६५ दिवसांचा लॉकडाऊन कालावधी जाहीर करणेत आला होता. सदर कालावधीमध्ये सर्व लोकल रेल्वे सेवा/ परिवहन सेवा व इतर दैनंदिन प्रवासी सेवा बंद करणेत आलेल्या होत्या. त्यामुळे अत्यावश्यक सेवेतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कामाच्या ठिकाणी ये-जा करण्यास अडचणी निर्माण झाल्या होत्या. तसेच सदरच्या लॉकडाऊनमुळे

अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्व दैनंदिन सेवा तसेच हॉटेल, रेस्टोरंट व भोजनालय बंद करण्यात आलेली होती. त्यामुळे सदरहु कर्मचारी यांना भोजनाची व्यवस्था उपलब्ध झाली नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील नियमित सेवेतील तसेच अत्यावश्यक सेवेतील सर्वच अधिकारी/कर्मचारी यांनी जोखीम पत्करून कामावर हजर राहून त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी योग्यरित्या पार पाडली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका कलम ६७ (क) नुसार तातडीच्या परिस्थितीत जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना व खर्च करण्याची तरतूद आहे. कोरोना विषाणूचा (Covid 19) प्रसार व त्यावरील उपाययोजना अंतर्गत महानगरपालिकेतील विविध स्थापन केलेले कक्ष, रूग्णालये, कोविड केअर सेंटरमध्ये महानगरपालिकेतील बहुतांशी सर्वच विभाग व विभागातील अधिकारी/कर्मचारी लॉकडाऊन कालावधीत देखील वेळेचे बंधन न पाळता नेमून दिलेले काम करीत आहेत. सदर कर्मचा-यांना दि.२४ मार्च २०२० ते १७ मे २०२० व १४ जुलै २०२० ते २३ जुलै २०२० या ६५ दिवसाच्या लॉकडाऊन कालावधीमध्ये कोरोना विषयक काम करणारे महानगरपालिका कर्मचारी, मानधनावरील कर्मचारी व ठेकेदाराकडे काम करीत असलेले कर्मचारी यांना प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या प्रमाणात हजर दिवसाप्रमाणे प्रतीदिन र.रु.१५०/- (अक्षरी र.रु.एकशे पन्नास फक्त) प्रोत्साहन भत्ता मंजुर करणे व त्यासाठी प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरात कोरोना (कोविड-१९) विषाणूचा प्रादुर्भाव झालेला आहे. सदर विषाणूला प्रतिबंध करण्यासाठी राज्य सरकार तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्तरावर वेगवेगळया उपाययोजना केल्या जात आहेत. यामध्ये महानगरपालिकेतील अत्यावश्यक सेवेतील कर्मचा-यांसह इतर विविध पदांवरील कर्मचारी मानधनावरील कर्मचारी तसेच ठेकेदाराकडील काम करीत असलेले कर्मचारी यांना प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या प्रमाणात हजर दिवसाप्रमाणे प्रतीदिन र.रु. १५०/- प्रोत्साहन भत्ता मंजुर करणेचा विषय आहे. सदर विषयामध्ये मनपा कर्मचारी, मानधन कर्मचारी व ठेकेदाराकडील काम करणारे कर्मचारी यांचा समावेश करण्यात आलेला आहे. परंतु मनपातील कोपा (पासा) चे प्रशिक्षणार्थी विद्यार्थीही कोविड सेंटर येथे काम करीत आहेत त्यामुळे त्यांच्या कामाचे स्वरुप व धोका सारखाच असल्यामुळे या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या मानधनात वाढ करुन त्यांनाही प्रोत्साहन भत्ता लागू करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ४

दिनांक – १३/१०/२०२० विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.माशि/५/कावि/४६५/२०२० दिनांक २३/०९/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालय, काळभोरनगर येथे आय टीच या संस्थेद्वारे इयत्ता ८ वी ते १० वी ची इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करणेबाबतचा प्रस्ताव दि. २३/०१/२०२० च्या पत्रान्वये आयटीच या संस्थेने दिलेला आहे. त्यानुसार आय. टीच संस्था इंग्रजी माध्यमाची ( इयत्ता ८ वी ते १० वी ) शाळा चालविणेची पूर्ण जबाबदारी घेणार आहे. यामध्ये शाळेचे रोजचे संचलन, स्कूल लीडर (मुख्याध्यापक ) निवड, शिक्षक निवड, शिक्षक प्रशिक्षण, शिक्षण पध्दती, प्रगती मूल्यमापन व देणगीदार जोडणी या सर्व गोष्टींचा समावेश आहे. आय टीचनी निवडलेले स्कूल लीडर ( मुख्याध्यापक ) शिक्षक व शाळा चालविण्यासाठी लागणारा इतर खर्च आय टीच संस्था देणगीदार संस्था मार्फत करेल. अशा पध्दतीच्या शाळा चालविण्यासाठी लागणा-या सर्व प्रकारच्या परवानगी (शासन मान्यता, युडायस क्रमांक इ. ) आय. टीच संस्थेला कराव्या लागतील. व सदर इंग्रजी माध्यमिक विद्यालयासाठी सर्व भौतिक सुविधा,आवश्यक वर्ग खोल्या तसेच वीज व पाणी पुरवठा देणे इत्यादी सुविधा महानगरपालिका करेल सदर विद्यालयास शासन मान्यता मिळालेनंतर शाळा सुरु करणेस परवानगी देणे आवश्यक आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालय, काळभोरनगर येथे आय टीच या संस्थेद्वारे इयत्ता ८ वी ते १० वी ची इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करणेबाबतचा प्रस्ताव दि. २३/०१/२०२० च्या पत्रान्वये आयटीच या संस्थेने दिलेला आहे.सदर प्रस्ताव मा. आयुक्त सो. यांनी प्रथम

विद्यालयास मा.शिक्षण उपसंचालक यांची मान्यता घेवून विद्यालय सुरू करावे या अटीवर मान्यता देणेत आलेली आहे.

१) आय टीच हि संस्था इंग्रजी माध्यमिक (इयत्ता ८ वी ते १० वी ) शाळा चालविण्याची पूर्ण जबाबदारी घेणार आहे. यामध्ये शाळेचे रोजचे संचलन, स्कूल लीडर (मुख्याध्यापक ) निवड, शिक्षक निवड, शिक्षक प्रशिक्षण, शिक्षण पध्दती, प्रगती मूल्यमापन व देणगीदार जोडणी या सर्व गोष्टींचा समावेश असेल. टीच फोर इंडियाच्या फेलोज बरोबर बी. एड झालेल्या शिक्षकांची निवड आय. टीच हि संस्था करेल.

२) आय टीच शाळांमध्ये एस. एस. सी. अभ्यासक्रम वापरला जाईल. शिक्षण विभागानी नमूद केल्याप्रमाणे सर्व परीक्षा घेतल्या जातील. त्या व्यतिरिक्त टीच फोर इंडिया चे प्रगती व परिणामकारकता तपासण्यासाठी मूल्यांकन ही केले जाईल.

३) आय. टीच संचलित शाळांमध्ये फक्त महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जाईल. प्रवेश प्रक्रिया लॉटरी पध्दतीने होऊ शकते. कोणाच्याही शिफारशीवर प्रवेश दिला जाणार नाही. प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या केवळ ३५ इतकीच असेल.

४) अशा पध्दतीने घेतलेल्या महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांची माहिती व प्रगती आय टीच हि संस्था शिक्षण विभागाला कळवत राहील.

५) आय टीचनी निवडलेले स्कूल लीडर ( मुख्याध्यापक ) शिक्षक व शाळा चालविण्यासाठी लागणारा इतर खर्च आय टीच संस्था देणगीदार संस्था मार्फत करेल.

**सदर इंग्रजी माध्यमाची शाळा चालविणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका व शिक्षण विभाग यांच्याकडून अपेक्षा व जबाबदारीचे मुद्दे खालील प्रमाणे आहेत.**

१) अशा पध्दतीच्या शाळा चालविण्यासाठी लागणा-या सर्व प्रकारच्या परवानगी आय. टीच संस्थेला कराव्या लागतील.

२) आय. टीच द्वारे संचलित सदर इंग्रजी माध्यमिक विद्यालयासाठी सर्व भौतिक सुविधा, आवश्यक वर्ग खोल्या तसेच वीज व पाणी पुरवठा देणे इत्यादी सुविधा महानगरपालिका करेल.तसेच महापालिकेतील माध्यमिक विद्यालयांप्रमाणे विद्यार्थांना सोयी सुविधा दिल्या जातील.

आय टीच या संस्थेमार्फत पुणे महापालिकेत ६ विद्यालये चालू आहेत, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या क्षेत्रामध्ये अशा प्रकारे इंग्रजी विद्यालय चालू केल्यास विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल. तरी सदर प्रस्तावास मान्यता देणेत यावी.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आयटीच संदर्भात सभागृहाला खुलासा करावा. जेणेकरुन आपण या संस्थेस देत असताना इंग्रजी माध्यमाची शाळा आपण महानगरपालिकेमध्ये चालू करत आहोत परंतु सभागृहाला त्या संदर्भामध्ये संपुर्णपणे माहीती जर मिळाली तर मला अस वाटत योग्य राहील.

**मा.पराग मुंढे (माध्यमिक शिक्षण अधिकारी) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. माध्यमिक विदयालयामध्ये आपल्या १८ शाळा कार्यरत आहेत आणि १८ शाळामध्ये १७ मराठी माध्यम आणि एक उर्दु माध्यमाची शाळा आहे. प्राथमिकमध्ये १०५ शाळा आहेत आणि आकांशा फौंडेशनच्या ५ अशा एकूण ११० शाळा कार्यरत आहेत. तर प्राथमिकमध्ये उर्दु, हिंदी, इंग्रजी आणि मराठी चार माध्यमाच्या शाळा आहेत. आपल्या महापालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज इंग्लीश मेडीअम स्कूल, भोसरी आणि पांढरकरनगरला महात्मा ज्योतीराव फुले इंग्लीश मेडीअम हया आठवी पर्यंत शाळा चालू आहेत आणि आठवी पर्यंत शाळा चालू असल्यानंतर नववी, दहावीच्या मुलांना ॲडमीशन मिळत नाही. आणि आपल्या माध्यमिक विभागाच्या फक्त दोनच माध्यमाच्या शाळा चालू होत्या आणि आकरा शाळा उर्दु आणि मराठी. इंग्लीश माध्यमाची गरज होती म्हणून आयटीच संस्थेनी सर्व्हे केला आणि काळभोरनगरला सहा खोल्या रिकाम्या आहेत आणि म्हणून त्याठिकाणी मध्यवर्ती सुध्दा आहे भोसरीतील मुलांना येण्यासाठी जवळ पडेल आणि पांढरकरनगरला जी शाळा दिली होती प्रेमलोकपार्कमधली त्या मुलांना सुध्दा ॲडमीशन मिळेल. कारण नववी, दहावी मध्ये ॲडमीशन मिळत नाहीत. इंग्लीश माध्यमाची गरज असल्यामुळे आणि मध्यवर्ती ठिकाण साधारणपणे भोसरी ते काळभोरनगर बारा कि.मी.चे अंतर असेल आणि पांढरकरनगर ते काळभोरनगर दोन आडीच कि.मी. असेल. आपण इमारतीची उपलब्धतता आणि मध्यवर्ती ठिकाण म्हणून काळभोरनगरचा पॉईंट निवडला गेला. यामध्ये एनजीओ जे आहेत ते

मॅनेजमेंट, शाळा व्यवस्थापन खर्च, शिक्षकांचा पगार सर्व काही ते करणार आहेत. आपण फक्त त्यांना भैतीक सुविधा पुरविणार आहेत. जसे आपल्या आकांशा फौंडेशनच्या पाच शाळा आता चालू आहेत त्याच पध्दतीने एक इंग्लीश माध्यमाच हायस्कूल सुरु होईल म्हणून हा विषय ठेवण्यात आलेला आहे.

**मा.अजीत गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. आता मुंढे साहेबांनी याठिकाणी खुलासा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. यातला पहीला मुद्दा असा की ही शाळा काळभोरनगरला आहे आणि इथ जो विदयार्थी येणार आहे तो भोसरीवरुन आणि पांढारकरनगर वरुन येणार आहे. त्यांनी सांगीतल भोसरीवरुन बारा कि.मी.अंतर आहे. मुळात या शाळेत शिकणारा विदयार्थी हा अत्यंत गरीब कुटूंबातील असतो. मी माहीती घेतली या विदयार्थ्यांना येण्याजाण्यासाठी आपण काही देणार नाहीत त्यांनी स्वत:च्या खर्चाने त्याठिकाणी यायच आहे. तरी त्या लोकांची बिलकूल परिस्थिती नाही. ते स्वत:च्या खर्चाने त्याठिकाणी येवू शकत नाहीत, त्यांची ती ऐपत नाही. मुळात या संस्थेला दयायच होतंतर भोसरीतली शाळा भोसरीतच केली पाहीजे. पांढरकरनगरची पांढरकरनगरला केली पाहीजे तरच हे शक्य आहे. प्रॅक्टीकली ते तीथ तसच शक्य आहे. परंतु तुम्ही अस का करता हे मला माहीत नाही, तुम्ही म्हणता मध्यवर्ती ठिकाण आहे बारा कि.मी.अंतर आहे म्हणजे काही मध्यवर्ती आहे का. तीकडून दोन कि.मी. आहे आणि इकडून बारा कि.मी. आहे काय चालल आहे. मा.महापौर साहेब, मुळात काळभोरनगरची शाळा अतीशय चांगली शाळा आहे आणि तीथ माझ्या माहीती प्रमाणे एकदम व्यवस्थीतपणे ती शाळा चालू आहे. तीथे कुठल्याही प्रकारच्या खोल्या उपलब्ध नाहीत आणि असल्यातरी त्या शाळेला त्या खोल्या भविष्यकाळा मध्ये लागणार आहेत. करायच असेलतर मुळात पहीली पासून सगळया शाळा इंग्लीश माध्यमाच्या झाल्या पाहीजेत ही काळाजी गरज आहे. आपल्या महापालिकेत येणारा विदयार्थी हा अतीशय गरीब कुटूंबातला असतो. तो नाईलाजाने आपल्या महापालिकेच्या शाळेत शिकायला येतात. कारण त्यांच्या आई-वडीलांची परिस्थिती खाजगी शाळेत टाकण्यासारखी नाही, त्याठिकाणी फि सुध्दा त्यांना पेलवत नाही, झेपत नाही म्हणून नाईलाजाने ते आपल्या शाळेत त्याठिकाणी मराठी मेडीअम मध्ये येतात. परंतु आज आपण जर पाहीलतर प्रत्येक शाळेचा पट हा घसरत चाललेला आहे. मग ती कुठलीही शाळा असो, शहरातील भोसरीची असो वा कुठलीही शाळा असो. प्रत्येक

ठिकाणची पटसंख्या घसरत चालली आहे. त्याच्या मागची कारण आपल्या सगळयांना माहीती आहे. सगळयांना इंग्लीश माध्यमाच्या शाळेत शिकायच आहे कारण भविष्याकाळा मध्ये जर त्यांना नौकरी आणि व्यावसाय करायचा असेलतर त्यांना इंग्लीश येणं ही काळाजी गरज आहे. आज जग इतक एकमेकांच्या जवळ आलेल आहे. आपण प्रामाणिकपणे जर प्रयत्न करणार असूतर माझी अशी अपेक्षा आहे की जशा दोन शाळा इंग्लीश माध्यमाच्या झाल्यात तशा सरसकट सगळया शाळा इंग्लीश माध्यमाच्या पहीलीपासून झाल्या पाहीजेत. या संस्थेला काम देत असताना आपण महापालिका का नाही करत. आपल्या इतर माध्यमीक शाळा आपण करतो. मान्यतेचा विषय असेलतर ही संस्था मान्यता घेणार असेलतर आपण का घेवू शकत नाहीत. मा.महापौर साहेब, माझी अशी या निमीत्ताने विनंती आहे की आपण सगळयाच महापालिकेच्या शाळा या सुरवातीपासून इंग्लीश माध्यमाच्या कराव्यात आणि त्या दहावी पर्यंत कराव्यात. त्यांनी एक वस्तुस्थिती सांगीतली ती खरी आहे की मुल जी पासआऊट होतात सातवी आठवीला त्यांना नंतर दुस-या शाळेत ऍडमीशन घेतताना त्रास होत असतो. एकतर खाजगी शाळेची फि त्यांना ज्या शाळेत ऍडमीशन घ्यायची तीथली झेपत नाही किंवा तीथली जी कपॅसिटी असते, समजा एखादया इंग्लीश मेडीअम स्कुलमध्ये जर ऑलरेडी साठ विदयार्थी त्या वर्गात शिकत असतीलतर नव्याने हे विदयार्थी ज्यावेळेस जातात त्यावेळेस यांना ऍडमीशन घेण्यासाठी फार मोठया अडचणीला सामोरे जाव लागत. सुदैवाने आमच्या भोसरी परिसरामध्ये आज अनेक इंग्लीश माध्यमाच्या शाळा असल्यामुळे कधीतरी करुन आम्ही सगळे मिळून ती मुल ऍकोमोडेट करतो. परंतु ही फॅक्ट आहे की आपल्या या विदयार्थ्यांना आठवीपासून इंग्लीश मेडीअमची स्कुल झाली पाहीजे परंतु ती करत असताना त्या त्या गावामध्ये ती करावी अशाप्रकारची मी या निमीत्ताने अपेक्षा करतो.

**मा.भाऊसाहेब भोईर-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. शिक्षण समितीमध्ये सभासद म्हणून काम केलेलं आहे. मंडळ होत त्यावेळेस कधी धाडस झाल नाही मंडळ मागण्याच. कारण काय अख्ख्या महाराष्ट्रामध्ये आपल मंडळ प्रसिध्द आहे. एकतर पहीली ही गोष्ट की आता समिती झालेली आहे. मनिषा पवार यांनी अध्यक्ष म्हणून काम केलं. हा आयुक्तांकून आलेला प्रस्ताव आहे. शिक्षण मंडळ नसल्यामुळ माध्यमिक आणि प्राथमिक पहील एकत्र कराव असा मी प्रस्ताव दिला

होता आमच्या समितीमध्ये. एकत्रितरीत्या हे येवून तसा त्याचा प्रस्ताव तयार करावा. पण मंडळ अस झालेल आहे की कोणताही विषय मांडला त्या समितीमध्ये तर आयुक्तांना किंवा अति.आयुक्तांना असं वाटत की याच्यात नक्की काहीतरी आहे. म्हणजे धान्यात खडे निघतात म्हणून घरात रेशन भरायचच नाही. कारण की इतक्या वर्षाची घाण साचलेली आहे तर रॅकेट आहे समितीमध्ये रॅकेट. पंधरा-पंधरा, वीस-वीस वर्षे शिक्षक हालत नाहीत, ताकद नाही शिपायाची बदली करायची ताकद नाही. संतोष पाटील यांना फोन केला की बघतो आणि चर्चा करतो. त्यांना काय वाटत काय माहीती आहे. कोणतीही गोष्ट सांगीतली की चर्चा करतो म्हणतात. काम करायच नसेलतर खाते काढून घ्यांना यांच्याकडून. शिक्षण मंडळ म्हणजे एखादया मुलांच आपण भविष्य घडवतो. आठवीच्या मुलांना मराठी मेडीअमच्या बे चे पाडे येत नाहीत आणि इंग्लीश शिकवायला चाललेत. कोणतरी येतं काहीतरी प्रस्ताव देतात, लगेच आणतात. कितीवेळा आम्ही प्रस्ताव दिला, मॅरेथॉन चर्चा केली. मनिषा पवार यांनी शाळेत जावून प्रत्येकांची चौकशी केलेली आहे आमच्याकडे सगळा रिपोर्ट आहे. काहीच कारवाई नाही, फोन केला की मी बघतो आणि चर्चा करतो, काय प्रकार आहे कसली तुम्ही चर्चा करता. पंचवीस पंचवीस वर्षे आम्ही काम करायला वेडे आहेत का. उर्दू शाळेच्या बदली करायची असेल तरना पाच पाच, दहा दहा लाख रुपये घेतात. नगरसेवक बदनाम होतात. रॅकेट आहे रॅकेट. काहीजण त्याचे एजंट आहेत. शिक्षकांच्या अंतर्गत बदल्या करण्यासाठी एक शिपाई तीथे काम करत असतो. लाज वाटते या सभागृहामध्ये माझ्यासारख्या कार्यकर्त्याला शिक्षणमंडळाबद्दल बोलण्याबद्दल. तुम्ही सुरवात करानां, त्यांना पाडे सुध्दा येत नाहीत. पहील मी सांगीतल होतं मुलीसाठी वॉशरुम नाही तीथ. पहील स्ट्रक्चरल ऑडीट करा. बिल्डींग जुन्या झालेल्या आहेत, काहीतरी उपयुक्त सुविधा दया. चार पाच ठेकेदार पोट भरतात त्यांच्यासाठी महानगरपालिका चाललेली आहे ते थोड एक दोन वर्षे थांबवा, सगळा गोंधळ आहे. मी प्रस्ताव दिलेला आहे तीन वर्षाच्यावर शिक्षक ठेवू नका. माझ्या भागामध्ये एक शिक्षक खुप चांगला आहे आणि ते तीथला नगरसेवक म्हणतो किंवा मी म्हणतो त्याची बदली करु नका खुप खुप चांगल शिकवतो. तीथ चांगल शिकवतो दुसरीकडे पण चांगल शिकवणनां. पहील आपण सभागृहान ठरवून घ्या की शिक्षकांच्या मध्ये पडू नका. पुण्यावरुन रोज लोक मुंबईला कामाला जातात आणि आपल्याकडे प्राधिकरणातून निगडीला बदली पाहीजे. थेरगावतून भूमकर चौकात बदली पाहीजे आणि बदली कुठे होते सकाळच्या शाळेतून दुपारच्या शाळेत. का तर याची सेटींग लई जबरदस्त असते.

काही काहींच सेटींग एवढ डेन्जर आहे. एक शिक्षक मला भेटायला आला एवढ सोन घालून, पान खावून तो जमिनीचा एजंट आहे. आहो, आजही आमचे शिक्षक भेटलेना आम्ही पाया पडतो, डोक टेकून. काय चालल शिक्षणमंडळाच काय काम करतात. चर्चा करा, पाटील साहेब आपण दोघच बसूना चर्चा करायला. पक्षनेते विषय तहकूब ठेवा, तो समितीमध्ये येवू दयात. शिक्षण समिती झालेली आहे, मंडळ नाही. तुमच्यातले आमच्या समितीत नसतील ती सुध्दा तज्ञ लोक घ्या. सविस्तर एक मास्टरप्लॅन तयार करा. नसेलतर आम्ही काही तज्ञ नाहीत चांगली लोक बोलवा त्यांना मास्टरप्लॅन तयार करु दयात. तसेही लॉकडावूनमध्ये सहा महीने गेलेत आजूनही दोन महीने जावू दयात. सभागृहात आम्ही बोलतो तुम्ही ऐकता. प्रस्ताव देतो तुम्ही पण नेते तीन वर्षाच्या पुढे शिक्षक ठेवू नका सगळया सभागृहाने मान्य कराव. कोणीही नगरसेवकांनी इन्टरफेअर करु नका. कितीही लाढाचा असलानातर सकाळी संध्याकाळी त्याला जेवायला बोलवा. एकाही शिक्षकाचा मुलगा महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षण घेत नाही. कम्पलसरी कराना बघा कशी पळतात इकड तीकड आणि शिक्षकांबद्दल बोलताना मी आदरानी बोलतो. जनतेच्या टॅक्सवरती शाळा चालते, पगार चालतो. अनुदान सरकार देत नाही, विनाअनुदान तत्वावरती माई आजही ५०० रुपये व १००० रुपयामध्ये शिक्षीका शिक्षण शिकवतात. हे पगार किती घेतात. शिक्षणमंडळात वीस-वीस वर्षे शिपाई आहे वीस-वीस वर्षे. ते ठेकेदार दिवसभर इथे फिरत असतात. विषय तहकूब ठेवा, चेष्ठा चालली बाहेर, हसतात बाहेर. म्हणजे आम्हांला म्हणलना कोणत्या समितीत शिक्षण समितीत म्हणल की, त्या शिक्षण समितीमध्ये व्हय, अशी अवस्था चाललेली आहे माई, गांभीर्याने घ्या. मा.महापौर साहेब, तुम्ही आयुक्त साहेबांना आदेश दया. अधिका-यांना शिक्षणमंडळात सांगल तसं काम करायच नसलनातर त्यांची खाती काढून घ्या. हा काय मालकी हाक्क घेतला का त्यानी. बाई सहीच करत नाहीत. तुम्ही आता हा विषय तहकूब करा. जेवढया इथ महीला आहेत त्यांनी एक एक शाळा दत्तक घ्या आणि मुलींची काय अवस्था ते बघा, मला पण मुलगी आहे. हे जातात दोन-तीन वर्षात बदली होवून आपली स्मशानभूमी इथेच आहे. आपल्याला इथच प्रायश्चित कराव लागणार आहे. माई, विषय तहकूब करा आणि सगळी मिटींग घ्या नेते आम्ही तुमच्या बरोबर आहेत, धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. ख-या अर्थाने

आता भाऊसाहेबांनी भावना याठिकाणी व्यक्त केल्या. तीव्र भावना होत्या, काही तीखट शब्द होते, कानाला लागले, मनालाही लागले परंतु वस्तुस्थिती तशीच आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये इतक्या मोठमोठया इमारती आहेत म्हणजे माझी कासारवाडीची शाळा जर मी पाहीलीतर मी एच.ए.च्या चांगल्या शाळेत शिकलेली आहे. एच.ए.ची इमारत बघीतली की मला माझ्या कासारवाडीची इमारत आठवते आणि इतकी जुळतीमिळती की एका खाजगी शाळेची इमारत व माझ्या महानगरपालिकेच्या शाळेची इमारत जवळपास सारखी येईल. म्हणून कासारवाडीची महानगरपालिकेची शाळा आहे त्याच्यावर प्रचंड प्रेम, प्रचंड जीव. त्याच बरोबर आता आम्ही एक फुगेवाडीमध्ये शाळा बांधली. त्याची बांधणी इतकी सुंदर आहे आयुक्त साहेब की ती शाळा बघीतल्यानंतर ती खाजगी शाळा आहे असंच वाटतं. त्यांचा इन्ट्रेन्स बघीतला, सगळा भाग बघीतला त्यांचा रंग वगैरे एकदम ॲट्रॅक्टीव्ह केलेला आहे. परंतु हे करत असतानाच ज्यावेळेला शाळेच्या आत शाळेचा गाभा, जस मंदीरामध्ये एखादा देव, एखादी मुर्ती असते, त्याठिकाणी विदयार्थी आणि ते शिक्षक हे दोन्ही घटक अत्यंत महत्वाचे अत्यंत जिव्हाळयाचे असतात परंतु जस मी या सभागृहात निवडून आले पहील्या वर्षी माई मी तुम्हांला फॅक्ट सांगते, भाऊसाहेब म्हणाले तसंच सभागृहात आले आणि पहील्या दिवसापासून ब-यापैकी सभागृहात सगळयांना वाटल बरं झाल एक नगरसेवीका आणि ती शिक्षक आहे, आपल कामच झाल आता. पहील्या वर्षी सगळयांचे आर्जच्या आर्ज असे ढिगभर यायचे माझ्याकडे. ताई बदली पाहीजे, ताई बदली पाहीजे. आणि मग दुर्दैवाने सांगाव लागेल आजपर्यंत एकाही शिक्षकांची बदली करा याला इकडे टाका आणि त्याला तीकडे टाका यासाठी आजपर्यंत महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात कधीच पाऊल ठेवला नाही. त्याच कारणच एवढ आहे की आज पिंपरी चिंचवडमधुन पुण्यात नौकरीसाठी जातो, पुण्यातुन मुंबई पर्यंत नोकरीसाठी अनेक लोक याठिकाणी प्रवास करतात परंतु ज्यांना शिक्षण देण्याच दैवत म्हणून आपण मानतो, ते दैवत म्हणून शिक्षण देतात त्या शिक्षकाना मात्र आमच्या पिंपरी चिंचवड शहराच्या व्यासामध्ये जे क्षेत्रफळ आहे त्या क्षेत्रफळात फिरायला सुध्दा त्रास होतो. असं करुन कसं चालेल. जो आता मा.भाऊसाहेबांनी प्रस्ताव मांडला त्यावर खरच गांभीर्याने विचार केला पाहीजे. आणि कोणाचीही मा.महापौरांची शिफारस असो किंवा आयुक्तांची असो किंवा आमची असो कुणाच्याही शिफारशीचा विचार त्याठिकाणी न करता कारण एकाची जरी शिफारस मंजूर झालीतर मग दुस-याची सुरु होते, तीस-याची सुरु होते. मग आमक्याच केल, तमक्याच केल, तमक्याच ऐकल. परंतु

सन्मा.आयुक्त साहेब याच बरोबर आपण सुध्दा ज्या शाळेमध्ये पटसंख्या घसरते, साहेब, मी माग आपल्याला सांगीतल की शाळांना आपण अचानक व्हिजीट करा. सांगा मुलांना की एक कविता म्हणुन दाखवा. तुम्ही ज्येष्ठ लोक बघा माईला एखादी कविता विचारलीतर माई शालेय जीवनातली कविता आता सुध्दा म्हणून दाखवतील परंतु माझ्या शाळेतील मुलांना आज कविता पाठ नाहीत. कारण कुठेतरी त्या करुन घेण्यास शिक्षक वर्ग म्हणून आम्ही कमी पडतो आणि ते करुन घेणार प्रशासन मला वाटत तुमच्याकडून कमी पडत. तुमचा तो धाक, आपुलकीचा धाक प्रेमाचा धाक, तुम्हांला जे काही दाखवता येईल ते दाखवून तुम्ही सांगीतल पाहीजे मला याठिकाणी इतक आऊटपुट दिलच पाहीजे. प्रायव्हेट ज्या काही शाळा आहेत, ग्लोबल इन्टरनॅशनल स्कूल आहे, सिटी इन्टरनॅशनल या ज्या काही शाळा आहेत या लाखो, कोटयावधी रुपये फी घेतात त्यांची अवस्था काय वेगळी आहे. त्यांच्याकडे पंधरा, वीस, पंचवीस हजारावर काम करतात मग आपल्या शाळेमध्ये इतके मोठमोठे पगार देतो, सातवा वेतन आयोग शिक्षकाना लागू आहे त्याठिकाणी आपल्याला रिझल्ट ओरीएन्टेड, रिझल्ट वरतीच पगार, रिझल्ट वरतीच बढती असे काही नियम करुन सभागृहाची मान्यता याला घ्या. कारण ज्या ठिकाणी माझ्या मुलांना गणवेष, पुस्तक, बुट, मोजे सगळ फुकट आहे अशा ठिकाणची पटसंख्या का घसरते आणि दिवसेंदिवस का घसरते याचा सन्मा.आयुक्त आपण या सभागृहात विचार केला पाहीजे. अधिका-यांनी सुध्दा आत्मपरिक्षण केल पाहीजे. जर आपण या महापालिकेत येवून पगार घेतो या पगाराचा रिझल्ट आऊटपुट याठिकाणी काय याचा विचार सुध्दा याठिकाणी केला पाहीजे. आता आपण म्हणतो की आर्थीकदृष्टया दुर्बल असलेले मुल आपल्या महानगरपालिकेच्या शाळेमध्ये शिकतात. अगदी वस्तुस्थिती तशीच आहे परंतु ज्याठिकाणी आकांक्षा फौंडेशनसारखी शाळा माझ्या कासारवाडीत चालते त्याठिकाणी त्या एका झोपडीतला मुलगा आपल्या महापालिकेच्या शाळेत येतो आणि दुस-या झोपडीतला मुलगा हा आपल्या आकांक्षा फौंडेशनच्या शाळेमध्ये येतो. तीथ शिस्त आहे, तीथ वळण लागत, तीथ अभ्यास करुन घेतला जातो, तीथल्या मुलांना सगळ येतं. तीथ त्या आई-वडीलांना एबीसीडीचा ए माहीत नाही अशा ठिकाणची मुलं इंग्रजीमध्ये तुटकमुटक बोलायला शिकतात. मग त्यांना जमत आपल्या शिक्षकांना बलाढय पगार घेत असताना का जमत नाही याची विचारणा आयुक्त साहेब आपण याठिकाणी केली पाहीजे. ज्या शाळेचा पट घसरेल त्या शाळेच्या सगळया गोष्टी बंद करा. त्या शाळेच्या शिक्षकांवरती काय कारवाई करायची त्याच्यावर निर्णय घेतला पाहीजे. साहेब,

आपण सगळया ठिकाणी प्रायव्हेटेशन करायच म्हणतो, पीपीपी तत्वावर दयायच म्हणतो. आज आकांक्षा फौंडेशन सारख्या शाळेमध्ये आम्हांला नगरसेवक म्हणून जाताना सुध्दा विचार करावा लागतो की चला त्यांच आमच सगळ व्यवस्थित चालू आहे त्याठिकाणच्या माझ्या विदयार्थ्याला चांगल शिक्षण मिळत असेल तर आम्ही तीथ इन्टरफेअर का करायचा या दृष्टिकोनातून विचार करावा लागतो. साहेब, याठिकाणी जी आपण पहीली ते आठवी शाळा सुरु केली, साहेब कोणत धोंरण होत त्यावेळेला विचार केला. कोणत्या नियमाने शिक्षण अधिका-यांनी विषय मांडला असेलना की पहीली ते आठवी पर्यंत शाळा सुरु करायची. एकतर करुच नका आणि करायची असेलतर किमान दहावी पर्यंत केली पाहीजे. म्हणजे ज्याप्रमाणे मुलांना प्रवेश घ्यायचा असतो आर्टस, सायन्स, कॉमर्स त्याप्रमाणे मुल प्रवेश घेतील. परंतु कोणत्या अधिका-यांनी केलेली सुपीक कल्पना आहे ही की पहीली ते आठवी पर्यंतच शिक्षण इंग्रजी माध्यमातून दयायच, नंतर कुठ जायच. तुमच्या घरी जायच का आमच्या घरी यायच शिकायला मुलांनी. प्रस्ताव करत असताना आपण का विचार करत नाहीत. आता नवीन प्रस्ताव काय तर तीथल्या मुलांनी इकडे इतक्या लांब बारा कि.मी. यायच. अशक्य गोष्टीतली गोष्ट आहे. कारण ज्या मुलांना शाळेमध्ये एखादा कार्यक्रम घेताना पन्नास रुपये वर्गणी जर मुला-मुलीनी गोळा केलेली असेलतर ती सुध्दा देता येत नाही. कुणाचीतरी त्या मुलाची आई, मावशी कामाला असते ती म्हणते ताई, आज शंभर रुपये दया की, त्या पोरीला शाळेत दयायचे होते त्या पोरां-पोरींचा कसलातरी कार्यक्रम आहे त्या कार्यक्रमासाठी मुलांना पैसे दयायचे आहेत. मग अशा ठिकाणी दरमहा किमान हजार बाराशे रुपये खर्च करुन भोसरीतल्या मुलांना त्याठिकाणी काळभोरनगरला पाठवताय, हे कुठही तात्वीक जुळत नाही आणि आपण शिक्षणाधिकारी म्हणून त्याठिकाणी काम करता. काम करत असताना आपल्याला शोभेल अशाच गोष्टी करा. आयुक्त साहेब, आपण काय विचार करुन हा विषय इथे मांडतो. आम्ही विरोध करणार, काय होणार शिक्षणाचा विषय होता, शाळेचा विषय होता आणि नगरसेवकांनी विरोध केला. विरोध करण्यामागची भूमीका पण समजावून घेतली पाहीजे. प्रस्ताव मांडताना विचार केला का आपण मुलांच्या येण्या-जाण्याची काय सोय करणार आहोत. त्या मुलांच्या बसची व्यवस्था आपण करणार का नंतर काही होत नाही जे होत ते आताच होत असतं. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, अत्यंत वाईट आणि दुर्दैवी घटना या आपल्या शिक्षणमंडळात, आता शिक्षण समिती आलेली आहे. या सगळया गोष्टीवर कुठेतरी आता पांघरुन घालण इथ म्हणजे शिक्षण विभागाच बजेट असल की

आपल्याला सगळयांना माहीती आहे दप्तर आणले जातात, कपडे आणले जातात, फाडले जातात या सगळया गोष्टी आजपर्यंत या शहरानी पाहीलेल्या आहेत. एकच ठेकेदार दहा-दहा वर्षे या पालीकेमध्ये चालतो. गमंत वाटते आम्हांला, एकच ठेकेदार आठ, दहा, बारा, पंधरा, पंचवीस-पंचवीस वर्षे या पालिकेवरती पोट भरतात. त्यांनी पोट भरण्याच दु:ख नाही. का स्पर्धा होत नाहीत, आपण म्हणतो की निकोप स्पर्धा या शहरामध्ये करायला पाहीजेत. टेंडरींग मध्ये आपण ई-टेंडरींग केल आणि काहीही केलतरी कशी शटलमेंट होते. अधिकारी काय करतात याचा सुध्दा सगळयांनी विचार केला पाहीजे, बदनामी आम्ही घ्यायचा काही संबंध नाही. कोण काय करत, कुणाच टेंडर कस बसवायच, फाईलवर काय लिहायच हाय कोर्टात गेल्यानंतर, आपल पिटीशन दाखल केल्यानंतर कस करत बसायच, किती कमी शब्दात आपली भूमीका मांडायची जेणेकरुन त्या ठेकेदाराच भल झाल पाहीजे याचा सुध्दा व्यवस्थित म्हणजे अति.आयुक्त असू देत, आयुक्त असु देत किंवा शिक्षणाधिकारी म्हणून ते कोण संबंधित असतील या सगळयांची प्रॉपर सेटींग त्याठिकाणी झालेली असते. जर आपली भूमीका आपण नीट मांडलीच नाहीतर तुम्ही हारणार नाहीतर काय होणार. हारण्यासाठीच आम्ही हायकोर्टापर्यंत गेलेलो आहेत. मा.महापौर साहेब, हा सगळा खेळ हा कुठतरी थांबला पाहीजे. मला कुणीतरी सांगीतल की पालीकेच्या शाळेत खुप सुंदर शिकवल जातं. तुमच्या मुलांना कुणी इथ टाकत का. परंतु मगाशी म्हणल्याप्रमाणे शिक्षकच त्यांची मुल टाकणार नाहीतर तुम्ही आम्ही लांब राहीलोत. जर जे शिक्षण देणारा म्हणत असेल की मी चांगल शिक्षण देतो म्हणून मी पगार घेण्यास मानकरी असेलतर त्यांनी स्वत:च आत्मपरिक्षण केल पाहीजे. मा.महापौर साहेब, याठिकाणी मी तुम्हांला विनंती करते की आपण हा विषय याठिकाणी तहकूब करावा दापोडीच्या शाळेमध्ये स्काऊट घेतल जात, मागील दहा वर्षे झाले म्हणजे सभागृहान ऐकाव आणि आम्हांला आमच आत्मपरिक्षण कराव वाटत की दहा ते बारा वर्षे तोच स्काऊटचा ड्रेस आहे. आमच्या दापोडीच्या शाळेमध्ये अत्यंत दर्जेदार स्काऊट चालू असतं. त्याठिकाणी त्यांना अनेकवेळा आपल्या महानगरपलिकेमध्ये मागणी केली की आमच्या शाळेत स्काऊट चांगले घेतात तेथील शिक्षीका आहेत त्या चांगल शिकवतात मग का आपण ते स्काऊटचे ड्रेस देवू नयेत. मुलांसाठीच एखादी गोष्ट मागतात म्हणजे हा तीतका विरोधाभास दिसतो की वर्षानुवर्ष एकालाच ठेका दयायचा, एका कडनच कपडे खरेदी करायचे, दुसरीकडे एखादी शाळा, एखादा शिक्षक किंवा काही शिक्षक एकत्रीत मिळून सांगतात की स्काऊट सारखा खेळ जर मुलांना आपण शाळेत घेतलातर मुलांची प्रगती होईल,

मुलांनी तेच ते ड्रेस किती वर्षे वापरायचे. महापालिकेमध्ये आपण सगळेजण कशाला आहोत हे सगळयांनी सांगा. प्रत्येक गोष्टीला अधिकारी ठरवणार, सगळ एकदम तयार होवून ताठ वाढलेल असतं आणि सांगीतल जात हे चांगल आहे खावा थोडस, इथ खीर मांडली ही खावा तुम्ही हे आपल्याला सांगीतल जातं यांची सगळी प्रॉपर फिल्डींग लागल्यानंतर बॉल आपल्याकड टाकला जातं आणि मग आपण नाही उचललातर म्हणायच नगरसेवक सगळे बदनाम आहेत, त्यांच झाल नाही म्हणून ते नाराज आहेत. आयुक्त साहेब, याठिकाणी स्काऊटचा विषय सांगीतला आहे त्याच्यावर निश्चितपणे तुम्ही संबंधितांना सांगताल आणि पुढच्या आठ दिवसामध्ये त्या संदर्भात काय केलं याच मला एखाद पत्र तुमच्याकडन मिळाव अशी अपेक्षा आहे. एवढ बोलून थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. भाऊसाहेबांनी आता विषय मांडला, आपण शिक्षण समितीवर बोलतो. शिक्षण समितीवर बोलताना मला जास्ती काही बोलायच नाही कारण आशाताईनी पण विषय मांडला आहे, भाऊसाहेबांनी पण विषय मांडला आहे. आता शिक्षण अधिका-यांना माझे दोन ते तीन प्रश्न आहेत. माझ्याकडे दोन शाळा आहेत. संततुकाराम नगरमध्ये आण्णाभाऊ साठे शाळा आहे आणि भाजीमंडईत दिनदयाळ उपाध्याय शाळा आहे. पहीली ते सातवी पर्यंतची प्राथमिक शाळा आणि नंतरची माध्यमिक शाळा. मला एक प्रश्न प्रशासनाला करायचा आहे. माझ्या प्राथमिक शाळेमध्ये जर सातवीमध्ये पन्नास विदयार्थी असतीलतर माझ्या दिनदयाळ उपाध्यायला पन्नास पैकी फक्त दहा ते बारा मुलच त्या शाळेमध्ये ॲडमीशन कशी घेतली जातात. मला वाटते ही जी शोकांतीका माझ्या ऐरीयामध्ये आहे तशी मला वाटत प्रत्येक ऐरीयामध्ये ही शोकांतीका असणार आहे. कारण सातवी पर्यंत शिक्षण मोफत झाल्यानंतर जे पालक आहेत त्यांना थोडस वेगळ वाटायला लागत की आठवी, नववी, दहावी शिक्षण हे एखादया प्रायव्हेट शाळेमध्ये दिल पाहीजेतर माझी मुल दहावीला चांगल्या मार्काने पास होतील. त्या शाळेच नाव लागेल आणि मला वाटत चांगल्या शाळेमध्ये, कॉलेजमध्ये ॲडमीशन मिळेल. त्यासाठी आयुक्त साहेब, आम्ही एक उपाययोजना केली होती की सातवी ते दहावीचा रिझल्ट लागतो ज्या दिवशी लिव्हींग सर्टिफिकेट दिल जातं त्यावेळेला त्या शाळेमध्ये जावून मी स्वतः बसले होते आणि त्या पालकांना समजावून सांगीतल होतं की पहीली ते सातवी पर्यंतच शिक्षण मोफत

घेताना प्रत्येक पाल्यावर आपण प्रशासन किती खर्च करतं मग तुम्ही आमच्या दुस-या कॉर्पोरेशनच्या शाळेमध्ये जात असताना आठवी, नववी, दहावी ही शाळा आता आपल्या कार्पोरेशनच्या शाळेत चांगल शिकवल जाणार नाहीत का. मला वाटत  पहील्याचवर्षी आम्हांला थोडस सक्सेस मिळालं आणि तीस मुल आम्ही त्यावेळेला दिनदयाळ शाळेमध्ये आम्ही आठवी, नववीला निवडू शकलो. मला वाटत हे प्रयत्न का केले जात नाहीत, हा पहीला प्रश्न. माझा दुसरा प्रश्न, अजूनही दहा वर्षे आम्हांला कळलेलच नाही की प्रत्येक शाळेच इन्सपेक्शन का होत नाही आणि होत असेलतर ते कुठल्या पध्दतीने केल जातं. प्रत्येक महीन्याला आपले शिक्षणाधिकारी तीकडे जावून फक्त चहा पिऊन येतात का. त्या शाळेचे काही प्रॉब्लेम्स आहेत का त्या शाळेमध्ये मुल का टिकत नाहीत असा विषय कधीतरी यांनी केलेला मला तुम्ही दाखवू शकत असालतर नक्कीच दाखवा. आज पटसंख्या कमी आलीतर आपण शिक्षणाला दोष देतो पण ती पटसंख्या कमी येताना शिक्षणा बरोबर प्रशासन त्या पध्दतीन काम करतय का, वाडयावस्त्यावर जावून काम करतय का. कारण झोपडपट्टीमधला जो काही मॉप असेल तो मला वाटत आपल्या महापालिकेच्या शाळेमध्ये येत असतो. आज थेरगावची एक शाळा बघीतली अतीशय उत्साहा मध्ये शाळा चालवली जाते, मला वाटत सगळयात जास्ती पट तीथे आहे. पण ती का आहे याचा काही अभ्यास आपल्या शिक्षणाधिका-यांनी केला आहे का. मग बाकीच्या शाळा या पध्दतीने बंद का पडतात. मला वाटत आयुक्त साहेब तुम्ही सुध्दा मध्ये कोवीड सेंटर करण्यासाठी पं.दिनदयाळ उपाध्याय या शाळेला तुम्ही भेट दिली होती. त्यावेळेला तुम्ही स्वतःहून म्हणालात की या शाळेला एवढ मोठ ग्राऊंड आहे ही शाळा का चालत नाही, मग याचा अभ्यास कधीतरी प्रशासनान केला आहे का. आज जेव्हा माध्यमिक आणि प्राथमिक आपण या दोन गोष्टी करतो तर मला वाटते खरोखर नामदेव ढाके आमचे सत्तारुढ पक्षनेता आहेत त्यांना माझी सुध्दा सूचना राहील की प्राथमिक आणि माध्यमिक या दोन्ही शाळा एकत्र का आपण चालवत नाहीत. त्यांच्या शाळेच्या दोन-दोन इमारती आपण का केलेल्या आहेत. खाजगी संस्थांच्या शाळा प्राथमिक आणि माध्यमिक अशा असतात पहीली पासून दहावी पर्यंतच्या तशा जर शाळा असतीलतर माध्यमिक शाळांमधले पट हे तेवढयासाठी मला वाटते यामध्ये शंका नसणार. माझ्या शेजारी उषाताई बसल्यात त्यांनी एक छान पटकन भाऊसाहेब बोलताना बोलल्या. काही शाळांमधील शिक्षीका बाजूच्या घरामध्ये जवळपासच्या परिसरामध्ये राहतात त्यातर म्हणे वॉशिंग मशिन मध्ये कपडे लावून येतात. अर्धा तास शिकवतात आणि वॉशिंग मशिन बंद करायला पुन्हा

घरी जातात. जर या पध्दतीन शाळेमध्ये शिक्षण होत असेलतर प्रशासन यामध्ये काय करतय याच एक मोठ कोड आहे आणि मला वाटत हे कोड आपल्याला सोडवाव लागेल. फक्त शिक्षण, शाळांवर पैसा खर्च करुन त्या मुलांची भैतीक क्षमतातर सोडा शारीरीक क्षमता वाढीसाठीतरी आपण काही काम करतो का. आज आपल्या काही शाळांना क्रिडांगण सुध्दा नाहीत. मग त्या मुलांची शारीरीक क्षमता किंवा पीटी ही कुठल्या पध्दतीने तुम्ही घेता. याच्यावर तुम्ही काही उपाययोजना केल्या आहेत का. आज आशाताईनी एक आकांक्षा फौंडेशनच नाव घेतल माझ्या कासारवाडीमधली माझी शाळा आज आकांक्षा फौंडेशन हे तुम्ही प्रायव्हेट एका संस्थेला तुम्ही शाळा कॉर्पोरेशनमधला एक एक वर्ग वाढवत वाढवत तुम्ही जाता आणि कार्पोरेशन मधला शाळांमधला पट तुम्ही त्यांना देण्याच काम मात्र नक्की केल. जी मुल राहतात त्यांना कार्पोरेशनच्या शाळेमध्ये तो पट भरला जातो. कार्पोरेशनच्या शाळा चालवायच्याच नाहीत असं ठरवत असेलतर मला वाटत हे सुध्दा कुठल्या पध्दतीने तुम्ही काम करताय हे पण कळल पाहीजे. आकांक्षा निश्चितच चांगल काम करतय. माझ्या सहकारी ज्या पध्दतीने बोलल्या त्या पध्दतीने आम्हांला त्या शाळेमध्ये जायला पण लागत नाही. पण आम्हांला माहीती आहे की तीथे शाळेतील मुलांची गुणवत्ता चांगलीच होणार आहे. पण त्याच बरोबर, त्याच वर्गाला लागूनच आपल्या कार्पोरेशनच्या शाळेचा क्लास चालू आहे. त्या मधली मुल मात्र मग त्या पध्दतीने का नाही शिकली जात. मग हे कुठल्या पध्दतीने प्रशासन या शिक्षण संस्थामध्ये आपले शाळामध्ये काम करतय याचा खरोखर विचार करण्याची खुप मोठी आता वेळ आहे. कुणी म्हणतय पंचवीस आम्ही दहा वर्षे काम करतोय, दहा वर्षामध्ये आम्ही तेच बघीतलय, आम्ही शिक्षणमंडळ बघीतलय, शिक्षण समित्या बघतो पण त्याचा अधिकार कुठलाही, कुठल्याही पध्दतीने मला नाही वाटत नगरसेवकांचा कूठला ऑब्जरर्व्हेशनचा किंवा त्याच्या सांगण्याचा तुम्हांला परिणाम होत असेल. मा.महापौर माझी विनंती आहे की प्राथमिक आणि माध्यमिक शाळा दोन्ही एकत्रीत करा. शाळेच्या इमारती एकत्रीत करा. एकत्रीत इमारती असतीलतर पहीली ते दहावी पर्यंतची मुल एकाच शाळेत शिकतील. सिमाताई तुम्हांलातरी पटलय का सांगा की कुठली संस्था आली, कुठल्या पध्दतीने सर्व्हे केला आणि तीने हया पध्दतीने काम सुरु केलं याच उत्तर यांच्याकडे आहे का. मुंढे साहेब त्याच तरी उत्तर दया. उदया मी म्हणेन माझ्या संस्थेनी सर्व्हे केला आणि मी माझ्या पध्दतीने जस आपण हे आता काम निवा-याच केलं माझ्या ऐरीयामध्ये. कुठल्या पध्दतीने काम कस प्रशासन देते हे आम्हांलाच काळत नाही.

संस्था लायक कुठल्या पध्दतीने तुम्ही ठरवता याचतरी तुम्ही उत्तर दया. जोपर्यंत प्रशासन याच्यामध्ये व्यवस्थित ठामपणे काम करत नाही तोपर्यंत कुठलीही शाळा त्या पध्दतीने चालणार नाही. शाळेमध्ये जेव्हा तास चालू होतात तेव्हा आपल्या शिक्षण अधिका-यांनी एखादीतरी व्हिजीट दिली आहे का. प्रत्येक शिक्षकाचा मोबाईल तीथे चालू असतो. त्या दिवशी हाथरसचा विषय झाला, हाथरसचा विषय झाल्या बरोबर आम्ही सर्वजण उठून उभे राहीलो. आम्ही महीला उभे राहीलो आमचे सहकारी उभे राहीले पण या अनुषंगान आपण प्रत्येकवेळेला बोलल्या नंतर आपल्या शाळेमधुन मुलीना त्या पध्दतीने शिक्षण देण्याचा आपण कधी प्रयत्न तरी केला आहे का याच तरी उत्तर दया. "उमलत्या कळयानो" सारखा आम्ही एक उपक्रम राबवत होतो, सात वर्षापासूनच्या मुली, तेरा वर्ष मुलींच्या शारीरीक जडणघडणीचा जो प्रश्न असतो त्या पध्दतीने उपक्रम राबवत होतो. का उपक्रम बंद पडले. आज फक्त आम्ही म्हणणार आहेत का की मुलीना सिक्युरीटी दया, मुलीना हे दया पण कुठल्या पध्दतीने माई आपल्याला दयाव लागेल याचा तरी विचार कधी प्रशासनामध्ये केला आहे का. कुठलातरी एखादा प्रोजेक्ट घेवून यायचा आणि तो राबवायचा एवढच त्याना माहीती आहे. त्याच्यामागे काय मिळत एवढच माहीती आहे. कमर्शिअल गोष्टीपेक्षा सोशल गोष्टीमध्ये कधी प्रशासनाचे आपले शिक्षणाधिकारी किंवा आपली जी शिक्षण समितीमध्ये किंवा जी शिक्षणमंडळामध्ये, शिक्षण विभागामध्ये काम करणा-या कोणीतरी विचार केला का. एक विषय शिक्षणमंडळाकडे दिला गेला, मला वाटते एकही विषय आतापर्यंत केव्हाही फलश्रुतीला आणलेला नाही. नगरसेवक जर विषय देतात तर ते पैशासाठी देतात पण तो विषय कॅन्सल करायचे असतीलतर मात्र मग ते लोक काहीतरी त्याच्या मध्ये क्लॉजेस सोडून त्या पध्दतीने काम करत असतात हा कुठला न्याय आहे. आपण शाळेमध्ये गणवेष देतो, शुज देतो, स्कुलबॅग देतो, बुक्स देतो म्हणजे तुम्ही काय देता भौतीक गोष्टी तुम्ही देता. पण त्या भैतीक गोष्टी देताना बाकीच्या गोष्टी तुम्ही देताय का मुलांना. आज तुम्ही ई-लर्नींगचे क्लासेस चालू केलेत, विचाराव साळवेंना आणि ज्योत्साना शिंदेना किती मुल ई-लर्नींगमध्ये शिकलेत. विचारुनतरी बघा त्यांना स्वत:ला माहीती नाही ई-लर्नींगचे म्हणजे काय आहे ते. मोबाईल वापरण म्हणजे ई-लर्नींगचे असेल किंवा एखादया मुलाला मी पण एखादया मुलाला लहान बाळ हाल्ली बघतो मुल रडायला लागल की कुठतरी गाण लावून आपण त्यांना देतो. ई-लर्नींग म्हणजे काय कुठल्या पध्दतीने क्लासेस चालले पाहीजेत, काय केल पाहीजे हे त्यांना तरी माहीती आहे का विचारा. आयुक्त साहेब यामध्ये

लक्ष दयाव. आता शाळांना सुट्टी आहे या शाळांमध्ये तुम्हांला काय इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये बदल करायचे ते व त्याच बरोबर शिक्षण कुठल्या पध्दतीने आपल्या मुलांना दयायचे, पीसीएमसीतल्या तळागाळातील मुलांना शिक्षण देणारी आपली संस्था आहे. वाडया-वस्तीवरच्या मुलांना शिक्षण देणारी आपली संस्था आहे. मी अजूनही अभिमानाने सांगते की आमच्या दिनदयाळ शाळेमध्ये श्रीपाद नावाचा एक मुलगा होता १९९० मध्ये तो शाळेमध्ये पहीला आला. त्याला ९१ टक्के मार्क मिळाले. त्याच बरोबर अजून एक मुलगा होता त्याच नाव मी सांगणार नाही तुम्हांला, त्याला ९० टक्के मार्क मिळाले. पण त्या शाळेचे शिक्षक त्यावेळेला ज्या पध्दतीने होते त्या पध्दतीने ते मुल शिकून त्या पध्दतीने चांगल्या ठिकाणी आज ती उभी राहीलीत. त्यानंतर आम्हांला एकही उदाहरण मिळाल नाही अजुनपर्यंत शाळेमध्ये. शाळेमध्ये आम्हांला विनवण्या कराव्या लागतात की तुमचा रिझल्ट शंभर टक्के आला पाहीजे. ३२ आणि ३३ मुलांमध्ये दहा मुल नापास होतात. ज्यावेळेला त्यांचा गणीताचा तास सुरु होतो आणि त्यांना विचारलना ए स्क्वेअर प्लस बी स्क्वेअर इजीकलटू त्याना ते सुध्दा कळत नाही. १५ ऑगष्ट, २६ जानेवारीला सकाळी शाळेमध्ये जेव्हा आम्ही सगळे नगरसेवक जातो त्यावेळेला एखादा मुलगा सकाळच्या सात वाजताच्या उन्हामध्ये जेव्हा खाली पडतोना त्यावेळेला आम्हांला कळतं की त्यांची शारीरीक क्षमता काय आहे. त्यावेळेला आम्ही म्हणतो त्यांना पोषक आहार दयायला पाहीजे ते दया. पोषक आहार कुठल्या पध्दतीने दिले जातात. आयुक्त साहेब या गोष्टीकडे आपण लक्ष दया. आपल्याला वेळ आहे, पाच महीने गेलेत अजून दोन तीन महीने आपल्याकडे आहेत, अजून शाळा चालू होत नाही. शाळेची रंगरंगोटी, शाळेचे मैदान तयार करण्यापेक्षा त्या मुलांच्या शिक्षणासाठी तुम्हांला चांगल्या पध्दतीने काय फॅसिलीटीज उपलब्ध करुन देता येतात त्याची एक बैठक लावा आणि त्याच्यामध्ये फक्त शिक्षणमंडळाची किंवा शिक्षण समितीचे लोक बोलू नका तर प्रत्येक नगरसेवक बोलवा, प्रत्येक नगरसेवकांचा प्रभाग हा वेगवेगळया पध्दतीचा असतो आणि तीथ त्यांना काम कसं करायच हे माहीती असतं. आतापर्यंत कार्यालयामध्ये काम करणारी शिक्षणाधिकारी आहेत ज्योत्सना शिंदे असतील, मुंढे साहेब असतील त्यांनी या दिड दोन वर्षामध्ये त्यांच्या कारकीर्दीमध्ये कुठल्या पध्दतीच काम करुन शाळांना कुठल्या पध्दतीन उंचीवर नेऊन पोहचविल. मुल कुठल्या पध्दतीने तयार झाली पाहीजेत याचा सुध्दा त्यांनी विचार करायला पाहीजे. एखादया शिक्षीकेचा विषय आलातर तो विषय कुठल्या पध्दतीने हाताळायचा हे त्यांना माहीती आहे पण एखादया मुलांचा विषय

आला, मुलींचा विषय आला त्यांची मानसीकता काय आहे. आयुक्त साहेब आपण एखादा कौन्सिलर नेमला का हो आपल्या शाळामधुन. आज कौन्सिलींग म्हणून आम्ही जातो. आज मुलांमधले जे मानसीक जडणघडणाचे विषय आहेत त्यांच्या मुलांना त्या विषयाचे प्रश्नांची उत्तर शिक्षक देण्यापेक्षा एखादा कौन्सिलर व्यवस्थित नेमलातर शाळांमध्ये जे आता गुन्हेगारीच प्रमाण वाढल, छेडछाडीच प्रमाण वाढलय ते माई कमी होईल. माई, माझी विनंती आहे की आपण प्रत्येक शाळांमध्ये निदान वेगवेगळया दिवशी का होईना आपल्या शिक्षण समितीमधुन कौन्सिलर नेमा. जर कौन्सिलर नेमले नाहीतर ही मुल या पध्दतीने राहणार नाहीत कारण ती मुल फक्त शाळेमध्ये चार ते पाच तासच असतात व पुन्हा आपल्या झोपडपट्टीमध्ये गेलेली असतात. त्यावेळेला आजुबाजूचा जो परिसर आहे त्या परिसरामध्ये ती जास्ती राहतात. मुलावर संस्कार, मुलांची मानसीकता घडवण्याच काम हे पीसीएमसीला करायच असेलतर पीसीएमसीने पहील्यांदा शिक्षणाधिका-यांना मला वाटते ट्रेनिंग दयावे लागेल आणि त्यानंतर हया पध्दतीने कुठेतरी बदल होईल. माझी पुन्हा एकदा विनंती आहे कौन्सिलर नेमावा, प्राथमिक माध्यमिक एकत्रीत आणाव आणि त्या पध्दतीने शिक्षणाचा कारभार चालवावा, एवढच बोलते इथेच थांबते जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. हा विषय जीबी मध्ये आल्यानंतर अजीतभाऊ असतील, आपल्या सभागृहातले सर्वात ज्येष्ठ नेते भाऊसाहेबजी भोईर हे अशाच विषयात बोलतात की त्यांना कुठतरी काहीतरी खोट वाटत आणि ते ज्या पोटतीडकीने याठिकाणी बोललेले आहेत की कशा पध्दतीने आपल्या शिक्षकांचा आणि या बाकीच्यांचा कारभार चालला आहे ते कामे "गोल माल हैं भाई, सब गोल माल है" पुर्ण त्याच पध्दतीचा हा कारभार आपल्या या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळेतून चाललेला आहे. जर पाहीला गेलतर शिंदे मॅडम असतील आणि मुंढे साहेब असतील यांच फक्त आणि फक्त टेंडर आणि याच्यातच जास्त लक्ष असतं. मला त्यांनी सांगाव की कधी शिंदे मॅडमनी कुठल्या शाळेला व्हिजीट दिली किंवा मुंढे साहेबांची कुठल्या शाळेला व्हिजीट दिली. मनिषाताई शिक्षण समितीच्या अध्यक्षा होत्या, समितीच नाव घालवतात तर फक्त हे अधिकारी. कुठलही काम आमच्या सारखा सर्वसामान्य नगरसेवक काम घेवून जातो तर कुठल्याही कामाला फक्त फाटा कसा दयायचा, आता जशा आशाताई पोटतीडकीने बोलल्या की फक्त चर्चा करतो, सुजाताताईनी ज्या पध्दतीन सांगीतल

फक्त आपल्या नगरसेवकांच काम कस हानुन पाडायच हे फक्त यांच्याकडन शिकाव. एकदम विचीत्र हा प्रकार आपल्या याठिकाणी चाललेला आहे. इथ आपल्या सर्व सभागृहातील नेत्यांनी लक्ष घालून, का आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळा या सिम्बॉयसीस किंवा लॉयला सारख्या दर्जेच्या का नाही व्हाव्या. पक्षनेते तुम्ही अशा पध्दतीने विचार करा की आपल्या शाळेमध्ये चला, मी पहीला मुलगा माझा टाकतो. पण त्या दर्जाच्या त्या शाळा झाल्या पाहीजेत पण आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची शाळा म्हणलतर कुणीही ॲडमीशन घ्यायला जात नाही. पिंपरी चिंचवडच्या शाळेचा दर्जा इतका वाढला पाहीजे की पहीला शिंदे मॅडमचा मुलगा तीथे पाहीजे, मुंढे साहेबांचा मुलगा तीथे पाहीजे. यांची मुल पहीली त्या शाळेत टाका मग शाळा कशा चकाचक होतील ते बघा. अधिका-यांची आणि नगरसेवांची शंभर टक्के मुल महापालिकेच्या शाळेत टाकू. मग शाळेचा दर्जा ॲटोमॅटीक उंचावेल. परदेशात शाळा असतात तशा आपल्या शाळा होतील. आयुक्त साहेब हा खरच खुप सिरअस विषय आहे. ज्या तळमळीन सभासद बोललेतना याची दखल घ्या आणि आपला दर्जा कसा जास्त वाढेल याच्याकडे जास्तीचे लक्ष दयाव. अंबरनाथ कांबळे स्थायी समितीचे सभासद आहेत. ऑगष्ट महीन्याच्या मिटींगमध्ये आयुक्त साहेब तुम्ही साक्षीदार आहेत, की एक्सवायझेड काहीतरी विषयावरुन अक्षरशः तुम्हांला शिंदे मॅडमच्या वतीने माफी मागावी लागली. म्हणजे असं जर असेलतर ते कशाला नाहीतर बंद करुन टाकाना, आपल्या सगळया मराठी शाळा एकतर बंदच करुन टाका. ते पैसे दुसरीकडे वर्ग करा. जर शाळा तुम्हांला नियंत्रणात ठेवता येत नसेलतर कशाला पाहीजे शाळा. बंद करुन टाका सगळ म्हणजे आपल्याला ते पैसे दुसरीकडे वापरता येतील नाहीतर त्याचा दर्जा एकतर उंचवावा की आपल्या पिंपरी चिंचवडच नाव कसं उज्वल होईल हे पहा आणि आपल्या शिक्षण समितीतल्या कुठल्याही सदस्यांची रिस्पेक्ट तीथे केली जात नाही. आम्ही नगरसेवकांनी काम नाही सांगायचतर तसं सांगाव आम्ही कुठलच काम नाही सांगत. आमचे फोन घेत नाहीत, काहीही काम सांगीतलेतर काहीही उत्तर देतात. स्पोर्टसाठी सुध्दा काहीतरी ॲक्टीव्हीटीज आपल्या शाळेमध्ये चालू करा. माई, माझी विनंती आहे की हा विषय आता तहकूब ठेवून याच्यावरती तुम्ही चर्चा करा आणि माई तुमच्या नेतृत्वामध्ये असं काहीतरी चांगल झाल पाहीजे याच्यात तुम्ही स्वतः लक्ष घाला, पक्षनेते, इतर नेतेमंडळी असतील यांना विश्वासात घ्या आणि काहीतरी चांगल करा हीच आजच्या प्रसंगी विनंती करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.मिनल यादव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. हा जो विषय आहे तो आमच्या प्रभाग क्र.१४ काळभोरनगर येथील शाळा आहे. आमच्या प्रभागातली शाळा आहे हा सर्व्हे केला आहे तो कसा केला आहे. आमचे प्रभागातील विषय विषयपत्रीकेवर येतो तेव्हा आम्हां नगरसेवकांना समजतो. पुण्याच्या पाच शाळा या संस्थेनी घेतलेल्या आहेत, पुणे काहीही करेन ते आपण केलच पाहीजेल का. किंवा तीथ झाल म्हणजे खुपच छान आहे आणि सर्व व्यवस्थितच आहे असं काही नसतं. प्रत्येक भागाची परिस्थिती वेगळी असते प्रत्येक शाळा वेगवेगळी असते. मोहननगर आणि काळभोरनगरच्या दोन्ही शाळेच स्ट्रक्चर ऑडीट केलेल आहे. दोन्ही शाळेच रिन्यूएशनच काम करण्याची गरज आहे. जर आपण उदया या संस्थेला ही शाळा चालवायला दिली आणि परत जर या शाळेच काम निघाल पुर्ण बिल्डींग डिमॉलीश करुन नवीन बांधायचा प्रस्ताव आहेतर हे तुम्हांला सगळ माहीती असताना तुम्ही या संस्थेला आठवी, नववी, दहावीचे वर्ग चालू करायला सांगीतले. कोणत्या आधारावर सांगीतलेले आहेत. तुम्ही तीथल स्ट्रक्चर बघीतल का, शाळेची कशी परिस्थिती आहे ती बघायला तुम्ही कधी मागील दोन वर्षात आलेला आहात का. मलातर नाही भेटले, या तीन वर्षात आम्ही नगरसेवक असताना आपली एकत्रीत कधी शाळांवर भेट झालेली नाही. तरी आपण हा सर्व्हे कोणत्या बेसीसवर केलेला आहे. आठवी, नववी आणि दहावी आता मराठी मेडीअमच्या शाळांना मुलांची परिस्थिती इतकी वाईट आहे की जसं आता भाऊसाहेबांनी सांगीतल त्यांना पाचवीची गणीत सॉल्व्ह करता येत नाहीततर त्यांना डायरेक्ट आठवीत इंग्लिश मेडीअमला घालून त्यांना काय फेल करायच आहे का. मराठी शिकवायच शिक्षकांना जड जात. जर करायचच असेलतर प्लेग्रूप, एलकेजी, युकेजी हा बेस त्यांचा पक्का कराना तुम्ही डायरेक्ट उडी घालता आठवी, नववी, दहावीला. तुम्ही जरा पॉईंटवर विचार करायला पाहीजे होता की हे तुम्ही कोणत्या बेसीसवर करताय आणि उदया म्हणणार की आठवी, नववी, दहावीला पटसंख्या नाही ही संस्था बंद पडली हे फक्त मग सगळया अशा बाहेरच्या संस्थांना देणार आणि ज्योत्सना मॅडम आणि तुम्ही काय काम करणार हे आम्हांलाही कळू दयातना तुम्ही कोणत्या प्रकारची काम करणार आहेत. असं सगळ बाहेरच्या संस्थांना बोलवायच त्यांच्याकडे एकदाच देवून टाकायच मग आपण का नाही इंग्लिश मेडीअमची परमीशन घेवू शकत. आपल्याला काही अवघड आहे का. एकतर सुजाता ताईनी आता सांगीतल की प्राथमिक आणि माध्यमिक एकत्र करा. प्रायव्हेट स्कुलमध्ये कसं असंत की प्राथमिक, माध्यमिक

वेगळ असतं का, पहीली ते दहावी पर्यंत शाळा असं डायरेक्ट करानां. आता आपल्या महापालिकेच्या शाळेची परिस्थिती अशी आहे की पुर्ण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांचा जेवढा पट आहे ती माझ्या प्रभागातल्या शाळेमध्ये बसुन जाईल. आता ही परिस्थिती आहे प्रत्येक वर्गात दहा ते बारा ही पटसंख्या आहे हे तुम्ही मान्य करता. मग आपण पिंपरी चिंचवडच्या एवढया शाळांना एवढा खर्च करतो, एवढया सुविधा पुरवतो त्या संख्येत ती पटसंख्या त्या शाळेत आहे का. आपली पटसंख्या वाढावी याच्यासाठी काहीतरी करणे गरजेच आहे त्या पध्दतीची काम तुमच्याकडून कुठलीच होत नाहीत. या संस्थेला देण्याचा आमचा विरोध नाही. पण दयायचच असेलतर एलकेजी, युकेजी पासून ज्यांना गरज आहे, बेस लेव्हलपासून तुम्ही शिक्षण पुरवाना. भोसरीच्या मुलांच तुम्ही त्यांना ट्रायव्हेलींग कस करणार आहेत. सामान्य कुटूंबातली, गरीब घरातली ती मुल शिक्षण घ्यायला येणार मग ती भोसरीवरुन इकड कशी येणार. काळभोरनगरला दयायच म्हणलतर मग जवळपासच्या शाळेतील मुल का घेत नाहीत, निगडी, चिंचवडगाव, चिंचवड स्टेशन. जर तुम्हांला या संस्थेला दयायचतर भोसरी मध्येच ती संस्था त्या शाळेमध्ये तीथल्या संबंधित नगरसेवकांशी चर्चा करुन तुम्ही तीथ का त्या सोई उपलब्ध करत नाहीत. एकतर हा चाललेला कारभार भोंगळ चाललेला आहे. कोणाचा कोणाला ताळमेळ नाही, एक विषय आणायचा तुम्ही हो ला हो मान डोलवायची मागून कोणाला तुम्ही सपोर्ट करता काय करता काय, घेणं देणं नाही. कुठल्याही गोष्टीचा विचार करताना संबंधित नगरसेवकानातर काही सांगायची पध्दतच नाही. मुंढे साहेब तुमच काम नव्हत का आमच्या प्रभागातील शाळेचा हा विषय आहे डायरेक्ट विषयपत्रीकेवर विषय आल्यावर आम्हांला समजतो. हे झाल्यानंतर परवा या संस्थेचा माणूस मला भेटून गेला की असं असं चाललेल आहे. अजून तोही ब्लँक आहे की नेमक त्याला काय करायच आहे. आयुक्त साहेब, तुम्ही एवढे मोठमोठे निर्णय घेताना फक्त पुण्यामध्ये दिल म्हणून आपल्या इथेही केलच पाहीजे अशी काही सक्ती नाही. सर्वात प्रथम आपण शिक्षणावर जास्त लक्ष केंद्रीत केल पाहीजे एकतर तुम्ही आपल्या महानगरपालिकेच्या मराठी मेडीअमच्या शाळा आहेत त्यास इंग्लिश मेडीअमची मान्यता घेवून त्या चालू करा. काळाची गरज आहे की मराठी मुलांना यायला पाहीजे त्याच पध्दती काळाची गरज आहे की इंग्लिश सुध्दा मुलांना यायला पाहीजे. त्याच पध्दतीने इंग्लिशची पण काळाची गरज आहे आपण का सुरु करत नाहीत आपण दुस-या संस्थावर किती दिवस डिपेन्ड राहणार आहोत. भलेही आपण फक्त त्या संस्थांना जागा देणार आहोत पण पुढे जावुन त्यांच्या अपेक्षा वाढू

शकतात. पुढे जावुन ते म्हणू शकतात तुम्हीच सगळ बघा. आम्ही चॅरीटीतून नाहीत शिक्षकांचा पगार देवू शकत तुम्हीच दया. अशावेळेस आपण त्यांना म्हणजे पोसायची काम करायची का. आपल्या कुठल्याच शाळेचा पट जास्त नाही. महानगरपालिकेच्या शिक्षकांना पगार काय आहे आणि त्या पध्दतीन विदयार्थ्यांना शिक्षण पुरवल जातं का. आता पालिकेच्या शाळेतील मुलांना काहीही येत नाही. दहावी पास झालेली मुलं आकरावीला एकशे एक टक्के फेल होतात. कारण त्यांना शिकवलच जात नाही एकतर ढकलगाडी चाललेली असते ती दहावीपर्यंत पोहचवायची. पुढे गेली की आहे मग त्यांच नशिब त्यांच्या बरोबर. मग दोष कुणाला देणार की तो महानगरपालिकेच्या शाळेत होताना म्हणून थोडा कच्चा राहीला. एवढा आपण खर्च करुन आपल्या महानगरपालिकेच नाव खराब होतं. याच्यामुळ मी आयुक्त साहेब तुम्हांला विनंती करते की या सर्व गोष्टींचा विचार करावा तरच या संस्थेला पुढे चालवायला दयावी, धन्यंवाद.

**मा.महापौर -** आपले म्हणणे थोडक्यात मांडा.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. सर्व सन्माननीयांनी या विषयावर विचार मांडलेले आहेत. हा विषय माझ्या प्रभागातला आहे. मला पण हा विषय माहीत नव्हता. आयटीच संस्थेनी सर्व्हे केला तो सर्व्हे कुठल्या आधारावर कसा केला हे मला पण माहीती नाही आता मीनल ताईनी सांगीतल की काळभोरनगरची शाळा तीस वर्षाच्या वरती होवून गेलेली आहे आणि स्ट्रक्चर ऑडीटमध्ये तीला डिमॉलीशचा आदेश आहे. मी काल बोलले की आता ही बिल्डींग पाडायची वेळ आली आहे तर ते म्हणाले त्यावेळेस ही शाळा दुसरीकडे हलवू. म्हणजे तुम्ही हेच करणार का, भोसरी वरुन १२ किमी. वरुन मुल इकड शिकायला येणार, त्यांची कशी व्यवस्था हे मी त्यांना विचारल पण, तर ते म्हणाले हो पालक व्यवस्था करणार आहेत, कसे पालक व्यवस्था करणार आहेत काहीही नियोजन नाही, काही नाही आणि तुम्ही हा विषय आणता. ठिक आहे प्रेमलोक पार्कमधले विदयार्थी आणणार आहेत, ठिक आहे प्रेमलोक पार्क माझ्या येथून आडीच कि.मी. आहे तेथून ते मुल चालत येवू शकतील पण भोसरीचा आपण विचार करायला पाहीजे. आमचा या विषयाला विरोध आहे. तुम्हांला माझ्या प्रभागातली शाळा करायची तर एलकेजी पासून करा. भाऊसाहेब, मी एक वर्षे शिक्षण समितीमध्ये होतो. कुठलाही विषय किंवा काहीही चांगल झाल नाही. आम्हांलाच कळल नाही की शिक्षण समितीमध्ये येवून आम्ही काय करतो ते. सुजाताताईनी

विषय मांडला की कौन्सिलर नेमा, मी तर म्हणेन की कौन्सिलर सोडून दया आपल्या शिक्षण समितीमध्ये जे पर्यवेक्षक आहे त्या पर्यवेक्षकाकड दहा-दहा शाळा आहेत. एक पिंपळेसौदागरची तर एक भोसरीची मग तो पर्यवेक्षक काय करणार आहे. हा विचार आयुक्तांनी, संतोष पाटील साहेबांनी केला पाहीजे. पर्यवेक्षकांकडे दहा-दहा शाळा दिल्यानंतर ते कसं करणार आहेत कशा पध्दतीने शाळा चलणार आहेत. म्हणजे तुम्ही कशाचाच विचार न करता डायरेक्ट असे विषय आणुन तुम्ही सभागृहापुढे ठेवता. तुम्ही कशा पध्दतीने भैतीक सुविधा देणार आणि बजाज त्या संस्थेला फंडींग करणार आहे. मग आपल्याला सीएसआरच्या माध्यमातून या शाळा चालवता येणार नाहीत का. तुम्ही सगळयाच गोष्टीजर बाहेरच्या संस्थेला चालवायला दिल्यातर कसं काय होणार. मागे आयुक्त साहेबांकड मी हा विषय मांडला होता की माझ्या प्रभागात अस्तित्व मॉल आहे. आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये एकच महीलांसाठी अस्तित्व मॉल होता. तो चालत होता नव्हता ती गोष्ट वेगळी आहे. तुमच्यामध्ये तेवढे गटस होतेतर तुम्ही सुध्दा तो अस्तित्व मॉल नीट चालवायला पाहीजे होता. तो अस्तित्व मॉल स्मार्टसिटी साठी दिला. आयुक्तांना मी तीथ आडवल होतं की हा अस्तित्व मॉल मी देणार नाही कारण पिंपरी चिंचवडमध्ये हा एकच महीलांसाठी मॉल आहे आणि त्याच्यामध्ये आपण चांगल काहीतरी करु. साहेब मला म्हणाले की ताई तुम्ही मला जागा दाखवा मी तुम्हांला दुस-या ठिकाणी करुन देतो. मी त्यांना माझ्या प्रभागातली जागा दाखवली. जागा दाखवल्यानंतर आहे तीथ स्मार्टसिटीच ऑफिस झाल्यानंतर आता आयुक्त साहेबांनी हात वर केले. माई माझी विनंती आहे की तुम्ही याबाबतीत पक्ष न बघता, काही न बघता या बाबतीत तुम्ही लक्ष घातल पाहीजे. ते सुध्दा त्यांनी तीथ संस्था आणली आहे ती संस्था सुध्दा अशीच आहे की पुण्यातले लघुउदयोजीका ठरलेले त्यांच्याकडन पैसे घेणार तीथ त्यांना गाळे देणार. मग पिंपरी चिंचवड शहरातल्या लघुउदयोजकांच काय. सगळया महीलांना मी विनंती करते की आयुक्त साहेबांनी त्या मिटींगला सर्व महीला सदस्यांना बोलावल होतं. त्या मिटींगला कोणी आलं नव्हतं. मी होते कारण मी हा विषय आणला होता. परंतु जर असंच तुम्ही सगळया संस्थाना देणार असेलतर मग पिंपरी चिंचवड महानगरपालिका तरी कशाला पाहीजे. आयुक्त साहेब आपण काय करणार आहात. मी आपल्याला विनंती करते की हा विषय आपण फेटाळून लावावा. आपण विषय आणताना लोवर केजी पासून आणावा, धन्यवाद.

**मा.काटे स्वाती (माई) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. माझ्या

प्रभागात तीन शाळा येतात. कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी. पण मला एवढच सुचवायच आहे की माझ्या प्रभागातली शाळा हुतात्मा भगतसिंग दापोडीतली ती शाळा आरोग्याची शाळा आहे का महापालिकेची शाळा आहे हेच कळत नाही. कारण आरोग्याच्या लोकांची हजेरी सकाळी ११ वाजता असते, तीथे त्यावेळेला इतका गोंधळ असतो की तुम्ही व्हिजीट करा तुमच्या लक्षात येईल. मागे पंधरा-वीस वर्षापुर्वी तीथ सेप्रेट गेट होतं, वॉचमेन होता ते गेट बंद केले आणि आता हया गेटनी सगळयाची इन्ट्री आहे. आरोग्याची लोक पण, शाळेची लोक पण, पालक पण. त्यासाठी मी तुम्हांला सुचवते की आरोग्याच्या लोकांना वेगळ गेट करुन दिलंतर चांगल होईल कारण त्यांच्या साहीत्याचा इतका पसारा पडलेला असतो की गाडया आडव्यातीडव्या पडलेल्या असतात, झोपडपट्टी ऐरीया असल्यामुळे लहान लहान मुल तीथ शाळेत आलेले असतात. तरी आरोग्याच्यासाठी आपल्याला काय करता येईल का. कारण आरोग्याची लोक सगळी बाहेरच बसलेली असतात, मुलांना शाळेत जाता येता येत नाही. आरोग्याच्या लोकांची ११ वाजताची हजेरी असते तुमच्याही लक्षात येईल की ही आरोग्याची शाळा आहे का महापालिकेची शाळा आहे. एकतर रोडला खुप गर्दी असते. तरी आरोग्याच्या लोकांसाठीची काहीतरी वेगळी व्यवस्था करावी अशी मी आपल्याला विनंती करते आणि माझे दोन शब्द संपविते जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.प्रमोद कुटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. काळभोरनगर येथील आमच्या प्रभागातील जी शाळा आहे ती आयटीच संस्थेला त्यातील काही वर्ग देण्या संदर्भातील विषय आहे हा विषय तहकूब न ठेवता फेटाळून लावावा. कारण त्याठिकाणी असणारी जी शाळा आहे त्याची पटसंख्या खुप चांगली आहे. फार कमी मराठी शाळा आहेत या शहरामध्ये ज्याची पटसंख्या मेन्टेन आहे. माझ्या परिसरामध्ये जशी वसंतदादा पाटील आकुर्डी विदयालय आहे फार जूनी शाळा आहे. त्या शाळेची पटसंख्या एकंदरीत पुर्ण माहीती घेतलीतर पस्तीसच्या वर नाही. मागे आम्ही ब-याचवेळा सरस्वती विदयालय शिक्षणमंडळाच्या माध्यमातून आम्ही खुप वेळा विनंती केलेली आहे. त्या संस्थेमध्ये जवळ जवळ साडेतीन हजार विदयार्थी शिकतात. त्यांना त्यातल्या रिकाम्या असलेल्या सोळा खोल्या देण्यात याव्या. त्याच्याकरीता आयुक्त साहेब आपल्याकडे ब-याचवेळा पाठपुरावा पण केलेला आहे. तरी देखील त्याबद्दल आपण निर्णय घेत नाहीत ही दुर्दैवी बाब आहे. आपल्या महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने देखील त्या संस्थेला त्याठिकाणी नोटीस

दिली आहे की तुम्ही ती शाळा निष्काषीत करा, पाडा. एवढ तीथ स्ट्रक्चर खराब असताना देखील आपण करत नाहीत. आज ठिक आहे तुम्ही एका संस्थेला याठिकाणी देताततर दया पण ही शाळा नका देवू. कारण का की त्या शाळेमध्ये शिकायला येणारे जे विदयार्थी असणार आहेत ते भोसरी परिसरामधले असणार आहेत. तुम्ही भोसरीमधीलच जवळपासची एखादी शाळा दया. आकुर्डी मध्ये जर तुम्हांला पांढरकरवस्तीला दयायच असेलतर त्याठिकाणची जवळची एखादी शाळा दया. आज आपण एकंदरीत काळाची गरज ओळखून पाहीलीतर आज पिंपरी चिंचवड शहरामध्ये ही औदयोगीक नगरी आहे. याठिकाणी कामगार वर्गाची मुल शिकतात. ब-याचशा लोकांच्या शाळा आहेत, ब-याच लोकांनी इन्टरनॅशनल स्कुलचा वापर केलेला आहे. त्याठिकाणची जर फिस जर पाहीलीतर एवढया मोठया प्रमाणावर आहे की सर्वसामान्य माणसाच्या मुलांना इंग्लिश स्कुलमध्ये शिक्षण घेणं फार कठीण जात. आपल्या ज्या शाळा आहेत त्या कशा पध्दतीने इंग्लिश मेडीअमच्या करता येतील. मला चांगल माहीती आहे की आपण सगळे एकत्र दिल्लीला गेलो होतो त्यावेळेस तुम्हीच निर्देश केले होते की तीथ एक्सचेंज प्रोग्रॅम आणि टिचर अपग्रेडेशन प्रोग्रॅम बद्दल तुम्ही तीथल्या संबंधित अधिका-याशी बोलले होते आणि त्या संदर्भात ज्योत्सना शिंदे मॅडमला सांगीतल होत. पण माझ्या माहीती प्रमाणे आजपर्यंत त्याच्यावर कुठलच काही झालेल नाही. खरच तुम्ही थोडस यात लक्ष घाला आणि आपल्या शहराची जी गरज आहे ज्या मुलांची गरज आहे, इंग्लिश मेडीअम शिक्षणाची गरज आहे ती आपण पुर्ण करताल त्या बद्दल मी आपणास विनंती करतो व संबंधित प्रस्ताव आपण फेटाळावा अशी मी आमच्या प्रभागातील सर्व सदस्यांच्या वतीने विनंती करतो.

**मा.राहूल जाधव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर माई आपण सर्व नगरसेवकांचा रोष आणि दु:ख याठिकाणी पाहीलेल आहे. आत्तापर्यंत शिक्षण क्षेत्रामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका कुठेही कमी पडलेली नसताना नक्की कमी पडतय कोण. या विषया संदर्भात बरेच नगरसेवक या सभागृहात बोललेले आहेत. खरतर मला आवर्जुन एक आठवण करुन दयावीसी वाटते की मी जे सांगत होतो ते जर ऐकल असतंतर एवढा उदयोग झालाच नसता. हे सर्व सभागृहाला माहीत आहे की मा.महापौर महोदया आपण याठिकाणी एक ठराव केला होता की शिक्षणाधिकारी ज्योत्सना शिंदे यांना पुन्हा राज्यशासनाकडे पाठवाव. याला साक्षीदार आमच्या भगीनी सिमाताई सुध्दा आहेत, माई तुम्ही सुध्दा आहेत आणि सर्व

सभागृह आहे. ज्यावेळी सोनालीताई गव्हाणे सभापती होत्या त्यानंतर मनिषाताई सभापती होत्या, शर्मीलाताई बाबर सुध्दा होत्या. त्यावेळी माझ्या बरोबर जेव्हा प्रत्येक शाळेची व्हिजीट केली, १०५ शाळेमध्ये गेलो आणि प्राथमिक आणि माध्यमिक अशा १२३ शाळेमध्ये गेलो. त्यावेळेला माझ्या बरोबर माझ्या ब-याच भगीनी त्यावेळेला कमिटीवर काम करणा-या होत्या आणि सांगवी मध्ये आलो त्यावेळेला माई तुम्ही सुध्दा होत्या. अत्यंत बिकट परिस्थिती ही उदयाला घडणा-या पिढीची आहे. जी पिढी आज आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिकत आहे. बरं आपण कुठे कमी पडतो आर्थीक बजेटमध्ये आपण कुठे कमी पडतो का. विदयार्थ्यांना आपल्याला ज्या सुविधा दयायच्या आहेत त्यामध्ये आपण कुठे कमी पडतो का. आपण त्यांना वेळेवर बुट देतो, वेळेवर पुस्तक देतो, वहया देतो. प्राथमिकला १००४ शिक्षक आपल्याकडे आहेत आणि त्याचबरोबर माध्यमिकला १५७ शिक्षक आहेत. आपल्या माध्यमिक शाळा ११८ आहेत आणि प्राथमिक शाळा १०५ आहेत आणि आकांक्षाच्या शाळा एकूण ५ आहेत. या सर्व विषयावर खर्च करण्यासाठी आपण कसलाही विचार न करता आर्थीक बजेटमध्ये तेवढी शिक्षण विभागासाठी बजेटची तरतूद आपण करत असतो. का तर या पिंपरी चिंचवड शहराचा नावलौकीक वाढावा, शैक्षणिक क्षेत्रामध्ये आपले विदयार्थी चांगले शिकावेत आणि या शिक्षण क्षेत्रामध्ये गुणवत्ता वाढावी यासाठी आपण सर्व विषय करत असतो. आज काळभोरनगरच्या शाळेमध्ये आठवी, नववी, दहावी इंग्लिश मेडीअम चालू करण्याच्या विषया संदर्भात चार नंबरच्या विषया संदर्भात आपण सर्वजण चर्चा करत आहोत. भाऊसाहेबांनी २५ वर्षाचा अनुभव याठिकाणी सांगीतला. आशाताई बोलल्या, मिनल ताई बोलल्या, काळभोर ताई बोलल्या, अजितभाऊ बोलले, हर्षल देखील चांगल बोलला, पालांडेताईही बोलल्या, कुटे बोलले बरेच जण बोलले प्रमोद सुध्दा त्या संदर्भात याठिकाणी बोलले. खर सांगा याठिकाणी कोणता नगरसेवक शिक्षण विभागावर त्याठिकाणी खुष आहे की खरच मॅडम आल्यापासून ख-या अर्थाने चांगल काम चालू आहे. ते वाळून गेलेत पराग मुंढे बघा त्यांच्याकड, एका बाजुने नगरसेवकांचा काच, दुस-या बाजुने त्या मॅडमचा काच. आपल्या बरोबर व्हिजीट करताना जरा टवटवी होती, व्यवस्थित तरी दिसत होतं आता बघा तुम्ही. मास्क लावल्यामुळ त्यांच दु:ख कळून येत नाही दु:ख. खरच आपल्याला पिंपरी चिंचवड शहरातील विदयार्थ्यांची गुणवत्ता वाढवायची असेलतर यावर आपण ठोस उपाय माई घेतला पाहीजे. मी प्रयत्न केला सर्व नगरसेवकांनी त्यावेळी प्रयत्न केला, ठिक आहे आम्हांला यश आलं नाही. आता समजा एखादया गोष्टीमुळ नसेल यश

आलं. की समजा मी एक पुरुष महापौर होतो, मॅडम एक लेडीज अधिकारी होत्या त्यामुळे नसेल मला जमलं. परंतु माई आज आपण लेडीज महापौर आहात आणि अधिकारी सुध्दा लेडीज आहेत त्यामुळ आता तुम्हांला ठराव करायला काही हरकत नाही. आपण ठराव करा, एका अधिका-यासाठी आपण शंभर शंभर, दोनशे दोनशे कोटी रुपये फुकट खर्च करु शकत नाहीत. हा संपुर्ण शहरातील कररुपी पैसा आहे. सर्वसामान्य कष्टक-याचा पैसा आहे. त्यामुळे याच्यावर एक ठोस उपाय म्हणून आपण हा ठराव करावा संपुर्ण सभागृह तो ठराव मंजुर करण्यासाठी तुमच्या पाठीशी उभ राहील. नसेलतर आता जरी तुम्ही मतदान घेतलतरी एकही हात खाली रहायचा नाही अशी परिस्थिती या शिक्षण विभागाची आहे. त्यामुळे तुम्हांला कळकळीची विनंती करतो की एक सक्षम आणि चांगला अधिकारी असा आपल्या शिक्षण विभागासाठी आणा की त्यामुळे आपल्या शहरातील विदयार्थ्यांची गुणवत्ता वाढेल आणि प्रत्येक शाळा ही चांगली होईल, त्यामुळे पिंपरी चिंचवड शहराचा नावलौकीक वाढेल. काळभोरनगरच्या शाळेच स्ट्रक्चरल ऑडीट केव्हा झाल होतं, भोसरीची एक शाळा होती. काळभोरनगरच्या एका शाळेमध्ये आमची व्हिजीट होत असताना दहावीचा वर्ग त्याठिकाणी चालू होता, मुंढे साहेब आता डायसवर आहेत, माहिती देतील दहावीचे विदयार्थी त्याठिकाणी काय करत होते. भिंतीला कसा कलर दिलेला होता त्याच बरोबर आम्ही खराळवाडीच्या त्या शाळेमध्ये गेलो त्याठिकाणी सुध्दा काय अवस्था होती त्या शाळेची. असे बरेच विषय त्याठिकाणी आहेत. या सर्व गोष्टीवर तोडगा काढण्यासाठी आपण सक्षम एक चांगला निर्णय घ्यावा ही आपल्याला विनंती करतो आणि बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल आभार मानतो.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. साहेब तुम्हांला सभागृहाचा रोख कळलाच असेल. आताच मी पराग मुंढे साहेबांना विचारल आयटीच चा फुलफॉम काय ? नाही सांगता आल साहेब त्यांना पण. ते म्हणाले की त्यांच पत्र असंच आहे ताई. आयटीच एनजीओ, मी म्हणाल त्याच्यावर फुलफॉम असेलना म्हणजे संस्थेचे नाव काय ? त्यांनी काय काम केललं. ते म्हणाले संस्था २०१५ ला सुरु झाली आणि पुणे महानगरपालिकेत त्यांना काहीतरी पाच सहा शाळा दिल्यात असं तुमच्या प्रस्तावात आहे. मे बी असं असेल की ते चांगल पण असेल. मुद्दा असा आहे की शिक्षणमंडळासाठी आम्ही कोणीच पॉझिटीव्ह नाहीत. शिक्षण घेतल्या

शिवाय माणसाला सुसंस्कृत होता येत नाही आणि त्याचा शैक्षणिक दर्जा उंचावत नाही हे जरी चांगल असलतरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा शिक्षण विभाग इतका भ्रष्टाचाराने बरबटलेला आहे की आम्हांला सुध्दा तीथे काही चांगल दिसत नाही. मगाशी भाऊसाहेब म्हणाले की संतोष पाटील यांना प्रत्येक गोष्टीत चर्चा करायची असते तसच आमच पण झाल आम्ही सुध्दा निगेटीव्ह झालोत. कारण की पॉझिटीव्ह तर काही घडतच नाही. बरं ज्या टॅक्सपिअरच्या भरवशावर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये टॅक्सरुपी जो पैसा जमा होतो त्यातन आमच्या ज्या शाळा चालतात आम्हांला असं वाटत की आमच्या या शहरात आलेला गोरगरीब, कष्टकरी जो वर्ग आहे त्यांची मुलं शिकली पाहीजेत, शिक्षीत झाली पाहीजेत ते कुठतरी चांगल्या ठिकाणी नोकरीला लागले पाहीजेत, व्यावसाय, धंदे केले पाहीजेत. परंतु त्यातल काहीही घडताना आम्हांला दिसत नाही. गेले पंधरा वर्षे झाले या सभागृहात मी आहे. दहावीचा आज आपण रिझल्ट जर पाहीलातर ३० मार्क आपल्या हातातले आहेत त्यातन आपण आपली पाठ थोपटून घेतो. शंभर टक्के निकाल लागला म्हणून आपण आनंदीत होतो, प्रफुल्लीत होतो आपल्याला भारी वाटत. पण खरच साहेब आपण जर गेलात आणि आपण माहीती घेतलीतर आपल्याला सुध्दा कळेल की काय परिस्थिती आहे सर्व शाळेत. आपल्या इथ अति.आयुक्त हांगे साहेब आले होते आणि तुम्हांला चांगला अनुभव आहे. आम्ही स्टॅण्डींगला होतो आम्ही त्यांना सांगीतल होतं की एक आठवडयात, दोन आठवडयात, तीन आठवडयात तुम्ही सगळया शाळांना व्हिजीट करा. मी चेअरमन होती मी सांगीतल की तुम्ही सगळया शाळाना व्हिजीट करायची आणि त्याचा अहवाल तुम्ही आम्हांला सभागृहात दयायचा. दोन तीन आठवडयानंतर आम्ही विचारल, ते म्हणाले मी कशाला जायला पाहीजे माझ्या हाताखालचे लोक जातीलना. मी म्हणल घडयाळ लावायची आणि संध्याकाळी बरोबर ५.४५ मि.नी तुमची ट्रान्स्फर झालेली असेल. तुमची ऑर्डर लोढ होईल आणि तुम्हांला स्टॅण्डबाय ऑर्डर असेल की तुम्ही इतक्या इतक्या तासात या याठिकाणी हजर व्हायच म्हणून. आणि गर्व आहे मला माझा, मी तसंच केलं. खरतर सभागृहात निर्णय झाले पाहीजेत जे अधिकारी काम करत नाहीत आणि ज्यांना कुणाला असं वाटत असेल की ही महानगरपालिका माझ्या मालकीची आहे आणि इथ मी जे म्हणेल तेच होत असेलतर अशा लोकांची स्टॅण्डबाय ऑर्डर काढावी लागते. शिक्षणासारखा अत्यंत महत्वाचा मुद्दा असताना सुध्दा आपण जर का त्याच्यावरती सिरीअस होत नसु, आयटीच या संस्थेला तुम्ही इंग्लिश मेडीअमची शाळा चालू करण्यासाठी दयायची

का? पहीली पासून आठवीपर्यंतची मुलं इंग्लिश मेडीअमला शिकलेली आहेत का? सातवी पर्यंत शिकलेली आहेत आणि आठवीपासून इकडे देणार आहेत मग भोसरीतच का नाही चालू करत. आपल्या कडे कितीतरी शाळेचे आरक्षण आहेत. आता सगळया बिल्डींगची स्ट्रक्चरल ऑडीट करण्याची वेळ आलेली आहे. भीमाताई फुगे आज सभागृहात नाहीत. त्यांच्या शाळेसाठी त्या कितीतरी वेळा सभागृहात बोलल्या असतील की आमची ती शाळा पडायला आली, आयुक्त साहेब ती पाडा एकदा येवून, तुम्ही एकदाही गेलेला नसताल. मग तीथले विदयार्थी त्याच ठिकाणी ठेवायचेतना. तुम्हांला हाळूहाळू आपले शिक्षक पण कमी करायचेत का. साहेब, विषय असा आहे की तुम्ही नर्सरी पासून जर एखादा विषय आणलातर आम्ही समजू शकतो. समजा भोसरीचे विदयार्थी आहेत त्यांना तुम्ही जर सातवी पर्यंत इंग्लिश मेडीअमच शिक्षण दिल असेलतर आम्हांला असं वाटत की त्यांना त्या त्या भागातून जाण्यायेण्याला सोप होईलना. कारण की आर्थीकदृष्टया मागासलेले विदयार्थी या सर्व शाळामध्ये शिकतात. मग त्यांचा यायचा खर्च कोण उचलणार, आपण विचार केला पाहीजे आणि आयटीचची मला माहीत नाही त्यांची गुणवत्ता काय आहे. मे बी तुमच्या दृष्टिकोनातून चांगली असेल कारण की पत्र तुमच आहे. परंतु याच्यामध्ये मुद्दा क्रमांक २ आहे आय टीच शाळांमध्ये एस. एस. सी. अभ्यासक्रम वापरला जाईल. शिक्षण विभागानी नमूद केल्याप्रमाणे सर्व परीक्षा घेतल्या जातील. त्या व्यतिरिक्त टीच फोर इंडिया चे प्रगती व परिणामकारकता तपासण्यासाठी मूल्यांकन ही केले जाईल. कोण करणार आहे मुल्यांकन. शिक्षण समिती का अधिकारी ते कधी करतील मुल्यांकन त्यांना विचारा मुंढे पण इथे आहेत आणि ज्योत्सना शिंदे पण असतील. त्यांना विचारा की त्यांनी आजपर्यंत या महानगरपालिकेच्या हद्दीत असणा-या सर्व शाळांना व्हिजीट तरी केलीत का? शाळांची काय परिस्थिती आहे ते माहीती आहे का? कोण मुल्यांकन करणार आहे? हे मुल्यांकन करताना आयुक्त साहेब तुम्हांला आम्ही वारंवार विनंती करतो की या सगळया प्रायव्हेट संस्था आणण्यापेक्षा यांना जर का आपल्याला परवानगी दयायची असेल, सगळया परवानग्या त्यांनीच घ्यायच्यात, त्यांनीच सगळ बघायच, शिक्षक त्यांनीच निवडायचेत, मुख्याध्यापक त्यांनी निवडायचेत हे सगळ ते करणार आहेततर आपणच का नाही नवीन चालू करत. आपल्याकड इन्फ्रास्ट्रक्चर पण खुप मोठ आहे. आपण तासावरती शिक्षक घेतो तसे इंग्लिश मेडीअमला घ्या आणि हा प्रयोग करुन बघा. ३५ विदयार्थी घेता येतील परंतु कुठल्याही नगरसेवकांपैकी कोणाचीही शिफारस चालणार नाही. आहो, साहेब आम्ही प्रायव्हेट शाळांना केलनां.

प्रायव्हेट शाळांना म्हणजे अगदी सेन्ट अँड्रूस पासून तर बजाज पर्यंत या शाळेत जरी फोन केलाना किंवा शिफारसपत्र नगरसेवकांनी पाठवलेना तर एकतरी विदयार्थी आमचा घेतात आणि आम्हीतर डायरेक्ट अटी शर्तीमध्ये लिहून टाकल की आम्ही कोणाच्याही शिफारशीवर प्रवेश देणार नाहीत. मग त्या त्या भागातला जर नगरसेवक असेलतर मग इथे आरटीई लागू नसणार का त्यांना, की तीन किमी.च्या आतला, दोन किमी.च्या आतला विदयार्थी त्या शाळेचा असला पाहीजे म्हणून तुम्ही तर शर्त घालू शकता. नाही करता येणार तुम्हांला अशाप्रकारची अट. तुम्हांला विचार करावा लागेल या अटीवरती. विदयार्थ्याची संख्या ३५-४० चांगली आहे, ठिक आहे. मुद्दा क्र. ४- अशा पध्दतीने घेतलेल्या महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांची माहिती व प्रगती आय टीच हि संस्था शिक्षण विभागाला कळवत राहील. म्हणजे "आंधळ दळतंय आणि कुत्र पिठ खातंय" याठिकाणी बसलेले ७० टक्के नगरसेवक बिल्डर आहेत. आणि ज्यांना कोणाला इन्फ्रास्ट्रक्चर मिळालतर त्याच्यावरती मानधनावरती शिक्षक घ्यायला काय अक्कल लागते मला सांगा. कुणीही चालवावत हे, मुद्दा आहे जागेचा. मग जागेला आपण काही भाड आकारणार आहोत का. एवढया मोठया जागा अशाप्रकारच्या आपण दयायच्या, का दयायच्या? शंभर टक्के माझ्या महानगरपालिकेतला विदयार्थी इंग्लिश माध्यमातून शिकलाच पाहीजे. त्याच ज्ञान वाढल पाहीजे तो हुशार झालाच पाहीजे. पण शैक्षणिक दर्जाकडे लक्ष आहे कुणाच त्याच्याकडे सगळयांच दुर्लक्ष आहे. तुमच आमच सगळयांच. कारण आम्ही जरी तीकडे गेलोतना आम्ही राजकारणच करतो असं सगळया अधिका-यांच म्हणणं असतं. मुद्दा क्र. ५- आय टीचनी निवडलेले स्कूल लीडर ( मुख्याध्यापक ) शिक्षक व शाळा चालविण्यासाठी लागणारा इतर खर्च आय टीच संस्था देणगीदार संस्था मार्फत करेल. कोणत्या आहेत त्या देणगीदार संस्था, आम्हांला कळल्या पाहीजेत. मुळात आयटीच चा फुलफॉम आम्हांला कळला पाहीजे. २०१५ ला जर का आयटीच ची स्थापना असेल, पुण्यामध्ये काय दिल आम्हांला पुण्यासारख नाही वागायच. त्यांच्या देणगीदार संस्था कोण आहेत आम्हांला कळल्या पाहीजेत. मुळात आयटीच काय आहे हे आम्हांला कळल पाहीजे. त्याचा संस्थापक कोण आहे, एनजीओ असेलतर एनजीओला सुध्दा संस्थापक आहेत ते आम्हांला कळले पाहीजेत. आणि याचा जर का पारदर्शीपणा आपण ठेवलेला नसेलतर विषय आपण तहकूब करा किंवा फेटाळून लावा. मला असं वाटत की या सगळया विषयामध्ये त्या त्या स्थानिक नगरसेवकांच मत घेणं आपण अत्यंत आवश्यक आहे जे की आपण इथ घेतलेल नाही. आम्ही वारंवार सांगतो की त्या विदयार्थ्याचा शैक्षणिक दर्जा कसा

सुधारेल याच्याकडे आपण लक्ष दिल पाहीजे. आपण विदयार्थ्यासाठी पुस्तक ख्ररेदी केले. म्हणजे अगदीच स्टॅण्डींगचा ठराव नसताना सुध्दा काय खरेदी केल म्हणून पेपरला वाचल. खर किती खोट किती हे मला माहीती नाही मला आरोप करायचा नाही. मग एकीकडे ई-लर्नींगच्यासाठी तुम्ही स्मार्टसिटीमध्ये एक प्रयोग करतोय आपण ३०-३५ कोटीचा. मग तुम्हांला असं म्हणायच का ते चांगल करणारी नाहीत. मग ते तरी रद्द करा किंवा अशा प्रायव्हेट संस्थातरी आणा. आणा हे ते ३५ कोटीतरी स्मार्ट सिटीचे वाचतील. आम्ही माहीती घेतली साहेब, तुम्हांला माहीती आहे चांगल्या पध्दतीनं तीथ या बोटावरचा थुका या बोटावर लावायच चालू आहे. साहेब, काय पध्दतीने आपल काम चाललेल आहे, आपण स्वतः विचार केला पाहीजे. आर्टीफिशीअल  इन्टेलीजन्स आम्ही विचारल काय आहेतर, म्हणे शिक्षक कॅमेरात बघणार पोरांचा मुड आज चांगला आहे का वाईट आहे. समजा माझ्या घरी खायला नाही माझा मुड आज वाईट आहे, मला आणुण देणार आहात का. माझ्या पोटाची सोय करणार आहात का. किंवा माझा वडील रात्री दारु पिऊन येवून माझ्या आईला मारेल, मी नाही सांगू शकत, तुम्ही त्याच काही करणार आहेत का. शैक्षणिक दर्जा राबवण्यासाठीचे जे काही तुम्ही उपक्रम राबवता ते जरी चांगले असलेतरी त्यातल आर्थीक गणीत सुध्दा फार मोठ आहे आणि ते महानगरपालिकेला फसव आहे. त्याच्यावरती आपल्याला काय काम करता येईल. आणि जर आयटीच सारख्या संस्थाला तुम्हांला याठिकाणी दयायचच आहेतर मग स्मार्टसिटीच ते काम तुम्हांला रद्द कराव लागेल, जे की तुम्ही करु शकणार नाहीत. म्हणजे एकीकडे हे पण चालू ठेवाच, ते पण चालू ठेवायचं. मागच्या पंचवार्षीमध्ये आयएलएफएसनी आपल्याला फसवलेलं आहे ४० कोटीच काम. त्यावेळेस त्यांनी सुध्दा आम्हांला सांगीतल होतं की काय काय स्वप्न दाखवली होती की तुमचे पोरं असे कॉम्प्युटरवरती बोलतील, आम्ही त्यांना असं असं करणार आहेत. तुम्ही बघा तुमचे पोरं कसे स्मार्ट होतील. मग शिक्षकांना आम्ही असं असं शिकवणार. ना आमचे शिक्षक शिकले, ना आमचे मुलं शिकले. आजही तुम्ही तीथ गेलाततर ती डबडी तशीच पडलेली आहेत. आजही आपण त्या स्मार्ट सिटीमध्ये ज्या आपण टिव्ही घेतल्या साहेब, खुशाल आपण पक्क लेबल लावल स्मार्ट टिव्हीच. टिव्ही जनरल आणि स्मार्ट टिव्ही म्हणून आपण स्टिकर लावल आणि आपण चालून घेतो. स्मार्ट टिव्ही मध्ये आणि नॉर्मल टिव्हीमध्ये खुप फरक असतो साहेब. खुप फरक असतो जमीनआसमानाचा फरक आहे. पैसे आपण स्मार्ट टिव्हीचे दिले आणि नॉर्मल टिव्ही घेतला. तीथ ज्या स्क्रीन घेतलेल्या आहेत त्या नॉर्मल घेतल्या.

आपणच बघा त्यात काय काय केलेल आहे आपण. बोलायला खुप आहे, मी जर त्या विषयाची चिरफाड करायची ठरवलीतर मला वाटत आपल्याला सुध्दा उत्तर देता येणार नाहीत. मा.महापौर साहेब, आपणास विनंती आहे की असे कुठलेही विषय आणण्याच्या आदि सन्मा.सदस्य जे की या महापालिकेत निवडून आलेले आहेत त्या त्या भागाच प्रतिनिधीत्व करतात आणि ज्या शाळांमध्ये मुल तुम्ही टाकणार आहात त्या शाळांच्यासाठीच आपण एकदा त्या नगरसेवकांना विश्वासात घेतल पाहीजे. अगदी नौखी असलेली माझी मिनल तीन सुध्दा सांगीतल की त्या शाळेच स्ट्रक्चरल ऑडीट झालेल आहे ती शाळा पाडायच्या अवस्थेत आलेली आहे मग तुम्ही काय करणार. वैशालीन या सभागृहात दहा वर्षे काढलेली आहेत काही तरी रिस्पेक्ट करा आमच्या सिनॅरीटीचा. आशाताई सारख्या आणि सुजाताताई सारख्या एकदम परखडपणे बोलणा-या किंवा शिक्षीका म्हणून काम करणा-या या नगरसेवीका आहेत. आमच्या राहूल जाधव यांनी इथे खंत व्यक्त केली ते महापौर असताना जे काही घडल त्याला आम्ही सगळेजण साक्षीदार आहोत. मा.महापौर साहेब दुसरा एक प्रकर्षाने मला मुद्दा सांगायचा आहे की शिक्षण मंडळ होत त्यावेळेस आपल्याला राज्यशासनाकडून हा सगळा निधी यायचा, आता यापुढे शासनाकडनच अधिकारी बोलवावे लागतील का. आतातर कमिटी झालीनां. आतातर शंभर टक्के फंडींग आपल आहे. मग कशाला आम्हांला राज्यशासनाचे अधिकारी लागणार. आम्हांला जर लागणार नसतीलतर तुम्ही तातडीने लिहून पाठवल पाहीजे की ज्योत्सना शिंदेना शासनसेवेमध्ये परत बोलवा. शिक्षण समिती होवून सुध्दा चौथ वर्षे आहेनां. मग तुम्ही आता हे तीन वर्षात केव्हाच करायला पाहीजे होतं. जर राज्यशासनाचे आपल्याकडे फंडच नाहीत, शिक्षण मंडळच अस्तित्वात नाही. तुमचे अनेक कॉन्ट्रॅक्टर कोण कोण ते कोर्टामध्ये आहेत. आपल काय हाताची घडी तोंडावर बोट आहे आपण जे जे होईल ते ते बघतो. आणि सोईची भूमीका जी काही चाललेली आहे मग तुम्हांला आम्ही बोललतरी राग येतो. मग आम्ही सत्ताधारी पक्षाचे जरी असलोतरी ज्या चुकीच्या गोष्टी वाटतात त्याच्यावर बोलावच लागतं. कारण आज नाही बोललो उदया बोललोतर आमच्या सुध्दा प्रामाणिकतेवर शंका घेतल्या जातील. तीन वर्षापासून तुम्हांला माहीती आहे की शिक्षणमंडळ नाही तुम्ही तेव्हाच त्या अधिका-याना परत पाठवायला पाहीजे होतं आणि अजूनही तुम्ही त्यांच्याकडन काम करुन घेता. मा.महापौर साहेब, विषय आपण फेटाळणार आहात किंवा तहकूब करणार असाल, जे काही करणार असाल त्या संस्थेची प्रामाणिकता काय त्यांनी किती चांगले काम केलेले आहे, खर आपल्या विदयार्थ्यांना त्याचा

फायदा होणार आहे का. आणि ते जर होणार असेलतर आणि तरच हा विषय मला वाटत आता फेटाळून पुढच्या वेळेस तुम्ही व्यवस्थित आणा. संस्थेच याठिकाणी प्रेझेंटेशन झाल पाहीजे. या संस्थाला जर तुम्ही देणार असालतर तुम्हांला स्मार्ट सिटीतल काम बंद कराव लागेल, हे पण तुम्ही लक्षात ठेवा. एकावेळी तुम्ही दोन्ही ठिकाणी पाय नाही ठेवू शकणार. आपल्या भागात अनेक कंपन्या आहेत त्या सगळया कंपन्यांना विचारा की त्यांच्याकडे सीएसआरचे जे फंड आहेत त्यामध्ये अनेक असे वर्ग जर ते चालू करु शकत असतीलतर आणि अशा शाळेमध्ये आपल जर अपग्रेडेशन होणार असेलतर मला वाटते आम्हांला पण खुप आनंद होईल. आमच्या मुलांना तीथ चांगल शिक्षण मिळेल जेणेकरुन या शर्यतीच्या युगामध्ये ते सुध्दा कुठेतरी धावायला लागतील आणि त्यांच्या सुध्दा यश लवकर हाताशी लागेल याच्याकडे मा.महापौर साहेब आपण लक्ष दिल पाहीजे. परत एकदा आपण सगळयांनी ज्या ज्या सुचना दिलेल्यात त्यांच आपण काटेकोरपणे अंमलबजावणी करुन निश्चितपणे आपण त्याच्यावरती चांगला निर्णय घ्यावा एवढीच विनंती याठिकाणी करते, थांबते जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. खरतर सगळया नगरसेवकांनी या विषयी चर्चा केलेली आहे. सांगायला खरतर अश्चर्य वाटतय ती संस्था येते तीचा सर्व्हे होतो आणि ठराव आज मान्यतेसाठी तुमच्या समोर येतो. याठिकाणी माझ्या प्रभागातील तीन नगरसेवक इथे आहेत. गेली दोन वर्षे झाले आम्ही शिक्षणमंडळात वारंवार येरझा-या मारतो. शहरातील जेवढया शाळा आहेत त्याची पटसंख्या कमी असल्यामुळ त्या मर्ज केल्या. काही शाळा अशा होत्या की ज्यांची पटसंख्या जास्त होती पण त्यांच्याकडे अजीबात आपण लक्ष दिल गेलं नाही. मग ती वर्ग व्यवस्थित पणे भरतात का, विदयार्थ्यांना बसण्यासाठी जागा आहे का याची कोणत्याही प्रकारची दखल तुम्ही घेतली गेलेली नाही. आम्ही वेळोवेळी सांगीतल की आमच्या प्रभागामध्ये दोन शाळा आहेत, कै.मधुकर पवळे शाळा, त्याच प्रमाणे रुपीनगरची शाळा आहे. त्या भागातील विदयार्थ्याची पटसंख्या पाहीलीतर महानगरपालिकेच्या शाळा पैकी सर्वात जास्त असलेली पटसंख्या आमच्या या दोन शाळेमध्ये आहे. या शाळामधील पटसंख्या जास्त असतानी सुध्दा वेळोवेळी आम्ही शिक्षणमंडळाला पत्रव्यवहार केला, मुंढे साहेबांनी तीथे व्हिजीट केली. त्याच्यानंतर सुध्दा आमच्या नंतरचे जेवढे प्रस्ताव आले त्यात सगळया

शाळेंच दोन शिफ्टमध्ये रुपांतर करण्यात आलं. परंतु आमच्या शाळेकडे पुर्णपणे दुर्लक्ष करण्यात आलं. भाऊसाहेबांनी सांगीतल ती खरी वस्तूस्थिती आहे. आपल्या शाळेतील पटसंख्या का कमी होते याच्याकडे आपण जाणीवपुर्वक दुर्लक्ष केलं. शिक्षणमंडळ म्हणल तर खरच वस्तुस्थिती पाहीली गेलीतर तीन चार लोक जे आहेत ते पुर्णपणे शिक्षणमंडळ चालवतात. भाऊसाहेबांनी सांगीतल की जे ठेकेदार इथे सुस्तावलेले आहेत, जे ठेकेदार विदयार्थ्यास वेठीस धरत आहेत, आपल्या महानगरपालिकेला वेठीस धरत आहेत मग ते वेठीस कसे धरतात की आपलेच काही अधिकारी त्यांचे कान भरतात. की जर काही आयुक्तांनी किंवा प्रशासनाने हा ठराव थांबवलातर त्यांना पळवाट सांगणारे आपलेच लोक आहेत. माई, हे जे चाललेलं प्रकरण आहे ते थांबवाव. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब मी तुम्हांला नंम्र विनंती करतो की महानगरपालिकेच्या ज्या दोन शाळा आहेत ज्यांची पटसंख्या आमची मोठया प्रमाणावर आहे त्या दोन शिफ्टमध्ये कराव्या अशी आपणास विनंती करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ऑनलाईन जीबीसाठी उपस्थित असलेले सर्व नगरसेवक, नगरसेविका. गेले तास ते दिड तास झाल आपण शिक्षणमंडळ या विषयावर चर्चा करतो, याच्यावर ब-याच वेळा चर्चा झाली. चर्चा अशी झाली आम्हांलातर वाटल चार वर्षात डबलपट संख्या झाली असेल. आयुक्त साहेब आम्ही दिल्लीला जावून आलो, दिल्लीला जावून आल्यानंतर आपण काय केल, मला वाटत स्मार्ट सिटी फक्त याचीच प्रगती झाल्याचे दिसतं. मी जेव्हा आयटीच संस्थेची माहीती घेतली तेव्हा मला सांगण्यात आल की सातवीपर्यंतच्या आपल्या ज्या इंग्लिश मेडीअमच्या दोन शाळा आहेत त्या आता आठवी, नववी, दहावी पर्यंत आहेत हे आयटीच पुण्यात पाच ते सहा शाळा चालवतात. याच्या अगोदर पण आपण आकांक्षाला पाच शाळा दिल्यात. पण आतातर मुंढे साहेबांनी दहा सांगीतल्या. म्हणजे हे मुलांच्या काळजीकरता चांगल आहे. म्हणजे याच्यात आम्ही तुम्हांला कोणाला दोष देत नाहीत. परंतु हे करत असताना ज्या शहरात, ज्या प्रभागात नगरसेवक आहेत, या सभागृहात भाऊसाहेबांसारखे सिनीअर नगरसेवक आहेत, सिमाताई आहेत मग तुम्ही कुणाला विश्वासात घेतलं. तुम्ही कुठलीही चांगली गोष्ट करत असताना घ्याना तुम्ही चार लोकांना विश्वासात. सर्वानी चर्चा केली म्हणजे भाऊसाहेबांनी तर ज्या पध्दतीने सांगीतल. शिक्षणमंडळ, शिक्षण समिती आयुक्त साहेब याची क्लॅरीटी कधीतरी

आम्हांलातरी येवू दया. आम्हांला शिक्षणमंडळाची समिती झाली पण त्यातला फरक आजही तोच आहे. ताईनी सांगीतल, जाधवांनी सांगीतल की शिक्षणाधिकारी याठिकाणी पाहीजेत का. म्हणजे हे सर्व करत असताना आज तो भोंगळ कारभार आहे. मला सर्व सदस्यांच अभिनंदन करावस वाटत की सगळे पोटतीडकीने बोलले. तीथ त्यांनी पक्ष पाहीला नाही म्हणजे नगरसेवकांनाही कळतय की आपल्याला परत निवडून यायच आहे. आपण सगळ केल होत आणि पक्ष चुकला. म्हणजे कुठेतरी ही वेळ आली चार वर्षे झालेना काहीच बदल दिसत नाही उलट पटसंख्या कमी झाली. मला वाटत एकनाथराव आमच्या बरोबर दिल्लीला होते, आयुक्त साहेब होते तेथून आल्यानंतर आपण हे करु ते करु, शिंदे मॅडम पण होत्या. काय झाल तीकडन आल्यानंतर, काहीच नाही. महापौरांनी व्हिजीट केल्या पण पुढे काय. आपल्या शाळेतील मुलांची गुणवत्ता वाढली, कपॅसिटी वाढली, त्यांचा गुणांक वाढला हे तपासल का. का आपल्या शिक्षकांचा वाढला, आयुक्त साहेब आपली चर्चा सुध्दा झाली होती की आपण इकडेतीकडे एवढा खर्च करण्यापेक्षा शिक्षकांना ट्रेनिंग देवू. माझ्याकडे काल संस्थेमध्ये २४ वर्षाची एक मुलगी संस्कृतसाठी कोल्हापूरवरुन इन्टरव्हीव दयायला बसनी आली आणि बसनी गेली २० हजार पगार आहे, मला आश्चर्य वाटल. इथ आपण याना पोसतोय यांचे पगार काय आहेत ५० हजार ते एक लाख रुपये पगार आहेत. त्यांच्यावर आहे का कुणाचा कंट्रोल. हे शाळेत मुल शिकवतात का शिकवत असतीलतर कशाप्रकारे शिकवतात. आपला एकच कंट्रोल ठेकेदार, शिक्षणमंडळाची शिक्षण समिती झाली तरी ठेकेदार तोच आणि शिक्षणमंडळाने केलेल्या कॉन्ट्रॅक्टवर शिक्षण समिती कोर्टात तरी टिकत नाही. मला वाटत आयुक्त साहेब परवा तुम्ही तो विषय मागे घेतला. कोर्टात तर त्यांनी जिंकला, का जिंकला म्हणजे तुम्ही त्यावेळेस ऑन दि स्पॉट शिंदेमॅडमवर कारवाई करायला पाहीजे होती. स्टॅण्डींगला विषय येण्याच्या अगोदर त्यांनी कस पत्र दिल ठेकेदाराला. तू माल तयार कर त्यांना कळल नाही या गोष्टी त्यांना कळल्या मग मुलांकड का लक्ष जात नाही. शहरातल्या मुलांची काय परिस्थिती आहे. आज सगळेजण पक्षीय भींती बाजूला ठेवून सगळे ओरडतात, कुठेतरी आत्मपरिक्षण करण्याची वेळ तुम्हांला सगळया अधिका-यांना पण आलेली आहे. तुम्ही करता ते चांगल करता आम्ही चांगलच म्हणतो. हे करत असताना या गोष्टीकडे तुम्ही का दुर्लक्ष करता. ठेकेदाराना वरती गेस्ट हाऊस बांधा. दिवसभर इथे फिरतात रात्री इथच झोपतील. कशाला त्या ठेकेदारांनी घरी गेल पाहीजे. सगळया केसेस ते तुमच्या विरुध्द जिंकतात, का जिंकतात. साहेब मी तुम्हांला अजूनही सांगतो जे ऍग्रीमेंट तानाजी शिंदेनी करुन

दिलं त्याच हेअरींग व्हाव तुमच्याकड. त्याच्यावर दिसत कागद बदललेलं. एकही पेपर मॅच होत नाही तरी तुम्ही हेअरींग लावत नाही आणि कोर्ट त्याला ग्राह्य धरतय, काय पध्दत आहे ही. काय करत आपल लिगल डिपार्टमेंट. तुम्ही घेतलेला ठराव, हाय कोर्ट तुमच्यावर ताशेरे ओढत असतीलतर ते तुम्ही गांभीर्याने घेत नाहीत, का घेत नाहीत. हर्षलनी सांगीतल गोलमाल मग हाच गोल माल आहे का. आम्ही नाही कुणी बोलत हे हर्षल ढोरे बोलले गोलमाल हैं. मग हा गोलमाल आहे का. लिगलनी तेच करायच, तुम्ही तेच करायच. ठेकेदारही तोच तीस-तीस, चाळीस-चाळीस वर्षे झाले आपण ठेकेदार पोसतोय. शिक्षणमंडळाची शिक्षण समिती झाली समितीला तेच ठेकेदार. मग हे होत असताना मुल का सुधारत नाहीत. आम्हांला ठेकेदार सुधारताना मुल पण सुधारु दयात. असं म्हणल पाहीजे की पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळेतील मुलं एकदम चांगली आहेत. जसं भाऊसाहेबांनी सांगीतल, शिक्षकांच्या बदल्या, शिपाई तोच तर साहेब कुठतरी प्रशासन म्हणून यावर कंट्रोल पाहीजे. मुंढे साहेब एकटेच पळतय पळतय पळतय, मी तर त्या फाईली सगळया घेतल्यात एकावर त्या मुंढे साहेबांची सही आहे. म्हणजे एका बाजुला तुमचा शिक्षणाधिकारी तुमचा निर्णय होण्याच्या अगोदर जर संबंधित ठेदाराला म्हणतो तु माल तयार करतर काय करणार तुम्ही उदया कोर्टात. तुम्ही अगोदर सभागृहाला ही क्लॅरीटी दया की शिक्षण समितीचे अधिकार काय आणि शिक्षण मंडळाचे अधिकार काय जरा आमच्या तरी ज्ञानात भर पडेल. आम्हीतर पहील्यांदाच आलोत पण याठिकाणी सिनीअर नेते पण आहेत. तुमचे पण सभासद बोलतात, सगळे बोलतात. कुठतरी आपण आत्मपरिक्षण करणार की नाही करणार. पलांडेताईनी पण सांगीतल सगळयांना कमर्शिअलमध्ये घेतल पण ही कमर्शिअल करत असताना तुम्ही चांगले चार सिनीअर लोक घ्यानां, दयांना मुलांना त्यांच्या ताब्यात. तुम्ही तुमच्या शिक्षकांची गुणवत्ता तपासानां. हा शिक्षक मॅथ शिकवतोतर त्याला स्वतःला मॅथ येतं का नाही. तो जर हिस्ट्री शिकवतो तर त्याला स्वतःला हिस्ट्री येते का नाही. एखादा इंग्लिश शिकवतो तर साहेब तुम्ही पण त्याच्याशी इंग्लिश मध्ये बोला तुम्ही त्यांची गुणवत्ता बघानां. आयटीच या चांगल्या विषयाला तुम्ही हात घातला, चांगल्या विषयाला हात घातल्यानंतर पण चर्चा कुठ भरकटली. तुमचा बेसच मजबुत नाहीतर तुम्ही वर काय डोंगर बांधणार आहेत का. काही बांधलतर तो कोसळणारच आहे. जसं ताईनी सांगीतल हे भ्रष्टाचाराच कुरणच आहेनां. एका बाजुला तुम्ही स्मार्ट सिटीत स्क्रीन घेता त्या स्क्रीनवर तुम्ही स्मार्ट म्हणून फक्त स्टिकर लावता. स्मार्ट गोल्ड आणि स्मार्ट टिव्ही याच्यात पण फरक

आहेनां. मग तुम्ही स्मार्ट सिटीत नक्की काय केलं आहे. आपल्या दिल्लीच्या व्हिजीटची मला एकच फलश्रूती दिसते स्मार्ट सिटीतला ठेकेदार. पुढे काय झाल, राहुलजीनी सगळीकड व्हिजीट केल्या रोज पेपरला बातमी. पण व्हिजीट केल्यानंतर त्याचे परिणाम काय झाले. त्यांनी इथ चार वेळा प्रयत्न केला मॅडमला परत पाठवा म्हणून. तुमच्या सिनीअर लोकांनी त्यांना हे करु दिल नाही त्यामुळ त्यांनी त्यांची खदखद बोलून दाखवली. त्यांनी सांगीतल मी पुरुष महापौर होतो आज तुम्ही महीला महापौर आहात म्हणजे जाधवांना म्हणायच काय हे तरी कळू दयात सभागृहाला. महापौर हा पुरुष नसतो आणि महीला नसतो, महापौर हा महापौर असतो. म्हणजे पुरुष महापौर होते म्हणून तुम्ही त्यांना ठराव करु दिला नाही का, नक्की त्यांना म्हणायच काय. परंतु मा.महापौर या सगळया गोष्टींच आत्मपरिक्षण प्रशासना बरोबर आपणही सर्व पुढा-यांना करायला सांगा की नक्की चाललय काय. इन्टरफेअर करताना किती करायचा कारण आज ही चार वर्षाची मुल म्हणजे शहराचे पुढचे भवितव्य आहेत. संस्कार हे मुलांवर झाले पाहीजे. तुमचे आमचे मुल कुणी जात नाहीत त्या शाळेमध्ये. आपले शहर कामगार नगरी आहे, कामगारांचे सुध्दा मुल जात नाहीत. आज तुम्ही डाटा काढा कुणाची मुलं त्या शाळेत आहेत. मला वाटत आमच्या परिसरात पाहीलतर भाडेकरु किंवा ज्यांची कपॅसिटी नाही प्रायव्हेट शाळेत टाकायची अशांची मुल जातात. मग आपण एका बाजुला प्रायव्हेट शाळे एवढया सुविधा देतो. त्यांना चांगले बुट, चांगले ड्रेस हे सगळ देतो. असं असताना आपण त्यांची शैक्षणिक कपॅसिटी, त्यांची शैक्षणिक गुणवत्ता ही का तपासत नाहीत. चार वर्षात आपल्या शाळेच्या किती मुलांची गुणवत्ता तपासली. जी कपॅबल आहेत, जी हुशार आहेत त्यात आमच्यासारखे लोक अनुभव नसताना आपण डिसेंबरला सगळयांना बसवतो. विक मुलगा कोण आहे त्याला शोधा आणि पुढचे तीन महीने त्याला उशिरापर्यंत शाळेत थांबवा त्याचा अभ्यास घ्या आणि तो चांगल्या मुलांच्या पंकतीमध्ये येवून बसला पाहीजे. ए ग्रेडच्या मुलांबरोबर तो मुलगा आला पाहीजे हे तुम्ही कधी केल का. पोटतीडकीने आपण बोलतो रोज रोज बोलून आता चार वर्षे झाले कंटाळा आला आहे. आता कांऊटडावून सुरु झाला आहे. म्हणजे बदल काहीच दिसत नाहीना फक्त विषय समोर आल्यानंतर आपण हे सगळ बोलतो. साहेब तुम्ही स्वतः माफी मागीतली, तुम्ही माफी मागुन कोर्टाचा निकाल काय लागला, तुमच्यावर ताशेरे ओढले गेलेत की तुम्ही एका नगरसेवकांच पत्र दिल म्हणून तुम्ही विषय माघारी घेतला. म्हणजे विषय प्रोझेंट असा करायचा असतो की आम्ही त्या नगरसेवकांच पत्र दिल म्हणून माघारी घेतोय आणि हे आपल लिगल

डिपार्टमेंट. तीसरी केस आहे आजही तुमची तारीख लागत नाही. तो काय म्हणतो मी या ऍग्रीमेंटवर लायबल आहे. ते ऍग्रीमेंटतरी एक्सपर्ट कडून तपासा. त्यात दिसतय कागद बदलले आहेत आम्ही हे पोटतीडकीने सांगतो. दोन-दोन, तीन-तीन वर्षे झाले तरी तुम्ही त्याच्यावर काहीच करत नाहीत. कोर्ट घेईल तो निर्णय, कोर्ट घेईल तो निर्णय. पर्टीक्युलर केसेसमध्ये तुम्हांला पण जज्जचा दर्जा आहे, तुम्ही पण एखादा निकाल लावू शकता. डॉक्युमेंट चेक करा म्हणजे भ्रष्टाचाराच कुरण आहे. पुर्ण शिक्षणमंडळच भ्रष्टाचारात गाडल गेलं. मग त्यात पुढारी आहेत का अधिकारी आहेत हे आम्हांला माहीत नाही. पण आम्हांला एक कळतय की या शहरातील चार वर्षात एकही मुलगा म्हणला नाही की मी संतुष्ठ आहे, मला चांगले संस्कार झाले, मला चांगल शिक्षण या शाळेत मिळालं. तो काय करतो, तांदुळ मिळतो का, ड्रेस कधी मिळणार, पुस्तक कधी मिळणार. साध्या झोपडपट्टीतला एखादा टिचर असतील ते त्या मुलांना शिकवत असतील आणि तीथून तो शिकतो तुमच्या शाळेत तो कशाला येतो साहीत्य घ्यायला? आणि आता तुम्ही हे करता की इंग्लिश मेडीअमची भोसरीतली या दोन शाळा एकत्रीत करुन सेंट्रली करतो. ठिक आहे त्या मुलांच नुकसान झाल नाही पाहीजे याची तुम्ही काळजी घ्या. पहीली पासून सातवी पर्यंत त्याला इंग्लिश मेडीअम मध्ये शिकवलं. मग आठवी, नववी, दहावी तुमच्याकडे इंग्लिश मेडीअमची व्यवस्था नव्हती म्हणून तुम्ही आज अचानक आयटीचला याठिकाणी घेवून आलात. साहेब, ते सीएसआरमधुनच करणारना. मुंढे साहेब तुम्हांला जर कळत होतं की आपली मुलं सातवी आठवीला जाणार आहेत मग आपण का नाही तयारी केली आठवी, नववी, दहावीची. आपण का नाही मान्यता घेतली आठवी, नववी, दहावीची मग तुम्ही का त्यांच्यावर अवलंबून राहीले. मुलगा ज्यावेळेस पाचवी, सहावीला येतो त्याचवेळेस तुमची तयारी पाहीजे होती की पुढ आपल्याला आठवी, नववी, दहावी चालू करायची. असं होणार नाही तुम्ही कितीही सांगा की आता ताईनी एक एक मुद्दे वाचून दाखवले. अजीत गव्हाणेनी सांगीतल भोसरीचा मुलगा इथे येणार नाही, नाही येणार साहेब. तीथच शाळेत जायला आपल्याला त्यांना कधी कधी पाया पडायला लागतं की या बाबानों शाळेत म्हणून. आज महापालिकेची इमेज काय आहे चला शाळेत साहीत्य मिळते, चला शाळेत तांदुळ मिळेल. साहेब, यानी पुढची पिढी घडणार नाही यानं नुकसानच होणार आहे आणि चाललेल नुकसान आहेना याच्यात आपण सगळे पापाचेच भागीदारी असणार. कारण आपण जरी इथ बसून गप्प बसलोना तर काय फरक राहीला त्या सगळया लोकांमध्ये आणि आपल्यामध्ये. मी तळमळ पाहीली साहेब

म्हणजे दोनशे, चारशे कि.मी. वरुन वीस हजारासाठी एखादा सांस्कृत शिक्षक जर येत असेल आणि घरचेही पाठवीत असतीलतर त्यांना त्या पैशाची किमंत आहे. इथ तुम्ही लाख लाख रुपये पगार देवूनही त्या शिक्षकांवर तुमचा कंट्रोल नाही. जगात सगळयात जास्त जर रिस्पेक्ट कुणाला असेलतर प्राध्यापकांना आहे. जा तुम्ही एखादया बाहेरच्या युनिर्व्हसिटीमध्ये म्हणजे तीथला व्हाईस चॅन्सलर जर असेलतर आगदी तुमचा मिनीस्टर पण फिक्का पडेल पण तो रिस्पेक्ट कमवायला तेवढी त्यांनी शंभर वर्षात सेवा दिली, त्यांनी पिढया घडवल्यात, त्यांनी मुल घडवलेत आणि याच्यात जर उदया काही बरं वाईट झालना तर कुणी तुम्हाला आम्हांला याच्यात सोडणार नाही. या मुलांना संस्कार, या मुलांना शिक्षण देणं आपल काम आहे. हे होत असताना तुम्ही सगळेजण याठिकाणी पुढे या. तुम्ही जर शिक्षणमंडळाचा भ्रष्टाचार पाहून गप्प बसलेना तर प्रत्येकजण त्या भ्रष्टाचाराला जवाबदार आहे. एकतर किस्सा असा घडलाय संतोष पाटील यांचा चार्ज तात्पुर्ता दुस-या अधिका-यांकडे गेला, चौदा कोटी एका दिवसात देवून टाकले. रात्री दहाला कपाटातून फाईल शोधून काढली. हे सुध्दा किस्से महापालिकेत घडतातना त्यावेळेस आपण काय करतो. साहेब, तुम्ही शिंदे मॅडमला नोटीस दिली का नाही हे मला सांगा. मी स्वतः तुमच्याकड आलो होतो, ठेकेदाराची फाईल सापडत नव्हती तुम्ही खवळल्यानंतर सापडली. त्याच्यावर नोटींग काय लिहील ते पण तुम्ही वाचल असेल. तुम्ही परवाच शिक्षणमंडळाच सांगा तुम्ही तीथ माघार घेताय. तुमच्या माघारी असं पत्र का दिलं. आमच्याकड भरपुर लोक आली चिंचवडमधन आगरवाल आले, आकुर्डीतून आले. आम्हांलापण कधीतरी त्या ठेक्यामध्ये पार्टीशिपेट होवू दयात, काय पध्दत आहे ही. आता तुम्ही काय सांगणार, कोर्टाचा आदेश. अरे वा, तुमच लिगल डिपार्टमेंट काय करतय. लिगल डिपार्टमेंट कुणाबरोबर कशी मिटींग घेतात, कसे ठेकेदारांना भेटतात साहेब, फोटो पण आमच्याकडे असतात. म्हणजे येथे येवून आरोप करुन, वैतागून स्वतःचा बीपी वाढवणं, स्वतःला त्रास करुन घेण्यापेक्षा गप्प बसलेलं बरं असं कधी कधी वाटत. साहेब तुम्ही या सगळया ठेकेदाराची चौकशी करा शिक्षणमंडळाची. तुम्ही आयटीच सारखी संस्था आणता या मुलांना आपण वा-यावर नाही सोडू शकणार. त्यांना आता शिकवाव लागणार आहे पण मला एकच सांगायच आहे की तुमच्या शिक्षणाधिका-यांनी तुमची मुलं आठवीला जाणार आहेत, आपल्याकड आठवीच इंग्लिश मेडीअम नाही मग आपण स्वतः तयारी का केली नाही याच उत्तर पण साहेब तुम्ही दयाव. मग तुम्ही आदिच ठरवल होतं का पाच वर्षे आदि, की पुण्यात आयटीच आहे तीला बोलवू तीला नंतर

देवून टाकू म्हणजे आपण आपली जबाबदारी झटकलेली बरी, असं नाही चालणार. साहेब, नशिब, आपल्याकड एचएससी बोर्ड आहे. मी तुम्हांला पाच वर्षापुर्वी म्हणल होत की आपण एक चांगल कँपस करु तुम्ही पण त्यावेळेस पॉझिटीव्ह होता. म्हणजे योगायोगाने आताशी ते कुठेतरी कळतय. आपण दिल्लीत पण जावून पाहील, बाहेर पण जावून पाहतो की सरकारी शाळेला जास्त मान दयायचा ती वेळतर आपल्याला येईल असं वाटल होतं परंतु आता पक्षनेते त्याच उत्तर देतीलनां. आम्ही आमच्या खर्चाने गेलो होतो तीथ आम्ही काही पालीकेच्या खर्चान गेलो नाहीत. आम्ही डायरेक्ट तीथ जावून त्या मिटींगला जॉईंट झालो होतो. पुन्हा एकदा माई मला विनंती करायची आहे की सिरीअस होण्याची ही वेळ आहे अजूनही वेळ आपल्या हातातून गेलेली नाही. चार वर्षे म्हणजे फार मोठा पिरीअड नाही पण चार वर्षे म्हणजे चौथीतला मुलगा आठवीत येईल, सातवीचा मुलगा कॉलेजला जाईल. म्हणजे त्या मुलांची आठवी ते बारावी ग्रोथ असतेना ती तीच ग्रोथ असते तीच त्यांच्या पुढच्या आयुष्याची दिशा आहे. तो जर त्याचा कालावधी आपल्याकडन वाया गेलातर आपल्याला कुणी माफ करणार नाही. आयटीचच सर्व सभासदांच मत आहे आपण पुन्हा एकदा त्याची तपासणी करावी ती संस्था कशी आहे काय आहे आणि सीएसआर मधुन करत असतीलतर आपण आपली टिम करु शकतो. उलट तो सीएसआर मागायलातर त्याला कोणी नाही उभ करणार पण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची शाळा चालू आहे, पुणे महानगरपालिकेची शाळा चालू आहे त्याला लगेच पैसे मिळणार. आम्हांला नाही कुणी सीएसआर उभ करत पण आपण सरकारी शाळा चालवतो म्हणल्यानंतर त्यांना लगेच त्याठिकाणी पैसे मिळणार आहेत त्यालाही काहीतरी मिळत असेल म्हणून तो इकडची संस्था चालवतो पण असं असताना आपण का नाही चालवू शकत. माझी आपणा सर्वांना पुन्हा एकदा विनंती आहे मला वाटत तुमच्या व्हिपमध्ये तर मंजूर म्हणलेल आहे परंतु आता माईन सांगीतल आपण तहकूब करणार आहेत. कुठेतरी त्या भागातले लोकप्रतिनिधी या शहरातले लोकप्रतिनिधी, चांगले चांगले एक्सपर्ट यांना विश्वासात घ्या आणि असे महत्वाचे निर्णय घेताना प्रशासनाने पण तारतम्य बाळगाव. तुम्ही लास्ट मुव्हमेंटला असे निर्णय घेता. तुमच्याकडन हा निर्णय दोन तीन वर्षे आदि अपेक्षीत आहे की असा निर्णय घेवून आपण ही मुल पुढ आठवीला जातील आणि आज आपल्याकड बसणार आहेत. आता तुम्ही अचानक नाही म्हणले आणि हीच मुल बाहेरच्या शाळेत जर गेलीतर त्यांना ती फि परवडणार आहे का हा पण सर्व सारासार विचार आयुक्त साहेब तुम्ही करावा. या मुलांच नुकसान होणार नाही त्या

पध्दतीने आयटीचच्या ज्या काही शंका-कुशंका संपुर्ण सभागृहाला आहेत त्यांना त्यांचे उत्तर दया त्यांच समाधान करा नाहीतर तुम्हांला शिक्षण समितीला करता येत असेलतर आपण त्या प्रकारे योग्य तो निर्णय घ्यावा, धन्यवाद.

**मा.तुषार हिंगे**- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आज भाऊसाहेब भोईर यांनी या विषयाला वाचा फोडली आहे खरोखरचं मी आज त्यांच अभिनंदन करतो.आणि ते कायम या शहराच्या जिव्हाळयाचा प्रश्न घेत असतात आणि आम्ही पण सर्व पक्ष म्हणुन कधीच नाही तर जे योग्य आहे त्यांच्याबरोबर आम्ही कायम जात असतो.मी खरंच भाऊसाहेब भोईर यांच आभार मानतो. आपण काळभोरनगरची शाळा देतोय पण त्याठिकाणच्या संबंधित नगरसेवकांना आपण विचारल पाहिजे. आपली तिथली भौगोलिक परिस्थिती काय आहे. मुलं शिक्षणासाठी येणार आहेत का? हे आपण विचारलं नाही. त्याच पध्दतीनं आपण असं सांगताय की, काळभोरनगरच्या शाळेमध्ये जागा शिल्लक आहे म्हणुन आम्ही आयटीसी ला जागा दिली आहे. आताच सचिन चिखलेनी सांगितल आहे की, ब-याच शाळेमध्ये पटसंख्या जास्त आहे. तिथं बसायला जागा नाही. तेंव्हा आपण तिथं पत्राशेड बांधुन विद्यार्थ्यांना बसवतोय. आपण त्याचा पण विचार करावा. त्याच पध्दतीने आपण सर्व शिक्षक आणि स्टाफला आमची आयुक्त साहेबांना विनंती आहे आणि भाऊसाहेब भोईरांनी पण सांगितलं आहे. आणि मा.महापौर साहेब,मी आपल्याला विनंती करतो आणि आपण आयुक्तांना असे आदेश द्यावे की, जे शिक्षक वर्षानुवर्ष एकाच ठिकाणी आहेत त्यांची त्याठिकाणाहून बदली करणेत यावी. आज आपण सर्व गोष्टीसाठी कंन्सलटंटची नेमणुक करतोय. आपण या शिक्षण मंडळासाठी कंन्स्लटंटची नेमणुक करु शकत नाही का? अशा अनेक संस्था आहेत की, ज्या आपल्याबरोबर फुकट काम करायला तयार आहेत. आपण त्यांना का घेत नाही.पण आपण तसं कधीच प्रयत्न केला नाही. आपण त्यांच्याकडं लक्ष द्यावं. राहुलदादांनी सांगितलं आहे की,आपण सीएसआर अंतर्गत आपण हे स्वत: का करु शकत नाही. कोरोनाच्या काळात आपल्याला ब-याच कंपन्यानी आपल्याला मदत केलेली आहे. हे खुप चांगल काम आहे. तसेच या शिक्षणासाठी आपण एक सीएसआर तयार करुन शिक्षण विभाग कसा चांगला होईल हे आपण बघावं अशी मी आपल्याला विनंती करतो. आपलं शहर हे स्मार्ट सिटीकडं चाललं आहे पण शैक्षणिक पात्रता एकदम ढासळत चालली आहे. आपण स्मार्ट सिटीकडे चाललो आहे आणि यामध्ये आपण उद्याचे युवक / विद्यार्थी हेच या शहराचा विकास करणार आहेत. पण तसा आपला शिक्षण

विभाग काम करीत नाही. हे मी आपल्याला सांगु इच्छितो. आयुक्त साहेब, मी क्रीडा सभापती होतो त्यावेळेस मी सभा घेतली होती.त्यामध्ये शिक्षण समिती ही फक्त मुंढे साहेबांवरच चालत असते शिंदे मॅडम या कधीही मिटींग आलेल्या नाहीत. किंवा त्यांनी कुठलीही मदत केलेली नाही. आता राहुल कलाटेनी सांगितलं की, महापौरांनी व्हीजीट केली,मिटींग घेतल्या  पण आयुक्त साहेब,मी आपल्याला सांगु इच्छितो की, प्रशासन आणि राजकीय हे दोन चाक आहेत माझी प्रशासनाला विनंती आहे की, शहरामध्ये ज्या पध्दतीनं विकास चालू आहे त्याच पध्दतीनं शिक्षणाच्या बाबतीत विकास करता येईल याचा विचार करावा. शिक्षण समितीवर नवीन सदस्यांची निवड झालेली आहे. त्या सर्व सदस्यांच मी अभिनंदन करतो. परंतु आपण वृक्ष समितीवर जसं आपण बाहेरचे लोक घेतले आहेत तसं शिक्षण समितीसाठी एक स्वतंत्र कमिटी तयार करावी. आणि ती कमिटी शिक्षण समितीसाठी काम करील. आणि आपलं शिक्षण विभाग चांगल्या उंचीला जाईल. पुण्यामध्ये आयटीसी काम करीत आहे म्हणुन त्यांना आपण याठिकाणी जागा देत आहोत. पण पुण्यामध्ये आबा बागुल यांनी एक चांगली शाळा बघीतली नाही का?  आज त्याठिकाणी ती पण पब्लीक स्कुल आहे. त्याठिकाणी अँडमिशन घेण्यासाठी मोठ मोठया रांगा लागतात तरी सुध्दा तिथं अँडमिशन मिळत नाही. आपण पुण्याचं सगळं अँडप करतो मग हे का केलं नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, आपल्या शाळेचा दर्जा कसा चांगला होईल आणि पटसंख्या कशी जास्त वाढेल याकडे आपण लक्ष द्याल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो.

**मा.राजु मिसाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह भाऊसाहेबांनी या विषयाला सुरुवात केल्यानंतर जवळ जवळ दोन तास या विषयावर सर्व सदस्य पोटतिडकीने बोलतात. प्रत्येकानी आपआपली मते व्यक्त केली आहेत.आयुक्त साहेब,तुमच्या कामाची पध्दत आम्हांला माहिती आहेच. सिमाताईंनी आता स्मार्ट टीव्हीच्या बाबतीत  सांगितले आहे. या विषयावर ज्यावेळेस आम्ही स्थायी समितीमध्ये सदस्य होतो आणि सिमाताई चेअरमन होत्या त्यावेळेस सुध्दा या विषयावर चर्चा केलेली होती. त्या टीव्ही वर आमचे आदरणीय खासदार डॉ. अमोल कोल्हे साहेबांनी सुध्दा या स्मार्ट टी.व्ही.च्या संदर्भात ऑब्जेक्शन घेतलं होतं. आयुक्त साहेब, या शिक्षण मंडळाची जी बिकट अवस्था झालेली आहे ती याठिकाणी सदस्यांनी तुमच्या समोर मांडलेली आहे. साहेब,तुम्हांला त्यावर जातीने लक्ष घालाव लागणार आहे. तुम्ही या शहराच्या विकासावर जसं लक्ष घातलं. हा विषय त्या काळभोरनगरच्या शाळेच्या संदर्भात आज सर्वजण बोलतात. आयुक्त

साहेब, हा विषय त्या प्रभागातील सन्मा.सदस्यांनाच माहिती नाही. ही प्रथा चुकीची आहे आपण त्या सन्मा.सदस्यांना विश्वासात घेऊनच हा विषय सभागृहामध्ये मांडला गेला पाहिजे. ज्यावेळेस मी अजेंडयावर हा विषय पाहिला आणि काळभोरताईंना विचारलं की,ताई तुम्हांला हा विषय माहिती आहे का? त्यांनी सांगितले की, या विषयाच्या बाबतीत मला कोणीही कल्पना दिलेली नाही. ही प्रथा चुकीची आहे. त्यामुळे सर्वपक्षीय सन्मा.सदस्यांचा रोष तुम्ही या सभागृहामध्ये ऐकुण घेतला आहे. आयुक्त साहेब, तुम्ही या स्वत: या शिक्षण मंडळात जाऊन एकदा ऑपरेशन करा. साहेब, तुम्ही जर ठरवलं तर याच्यामध्ये नक्कीच चांगली गोष्ट होऊ शकते. कारण या शिक्षण मंडळावर केमो करण्याची गरज आली आहे. या शिक्षण मंडळावर शासनाने शिंदे मॅडमची नियुक्ती केली परंतु त्यांना शासनाकडे परत पाठविण्यासाठी  माजी महापौर राहुल जाधव यांनी ठराव केला होता त्यांना आपण शासनाकडे परत का पाठविले नाही. त्यांच्यावर कोणाचा वरदहस्त आहे का? कोणत्या नेत्यामुळे हे थोपवलं जात आहे हे तरी आम्हांला कळू द्या. आताच राहूल कलाटेंनी पण सांगितलं आहे की, त्या मॅडम कॉन्ट्रॅक्टरला  सांगतात की, तु काम चालु करं साहेब, तुम्ही त्यांना नोटीस काढली,समज बजावली पुढं काय झाल.त्यांनी तर चुक केली आहे नां त्यांना आपण कुठं तरी शिक्षा करायला पाहिजे होती. माई, राहुलदादांनी जसा ठराव केला होता तसा परत एकदा ठराव करावा आणि त्या मॅडमला परत शासनाकडे पाठवावं. मला एक आनंद आहे की, आज शिक्षण समितीच्या सदस्यांची निवड झालेली आहे. आणि या शिक्षण मंडळावर आपल्या सर्व सदस्यांची दरमहिन्याला एक चर्चा झाली पाहिजे. आणि तसा तुम्हांला अधिकार आहे १ के मध्ये तुम्ही विषय घेऊ शकता. आयुक्त साहेब, तुम्ही त्या मॅडमला आदेश द्यावे की, जर तुमच्या कामामध्ये एक  महिन्यामध्ये काही सुधारणा झाली नाही तर त्या अधिका-यांवर तुमच्याकडनं कारवाई होईल. सिमाताईंनी सांगितले आहे की, शिक्षण मंडळ याऐवजी शिक्षण समिती झाली तर याठिकाणी शासनाच्या अधिका-याची काय गरज आहे. हे आम्हांला कळू द्या आपण त्यांना पाठवू शकतो का? आपले उपमहापौर यांनी सांगितले आहे की, मी क्रीडा समितीचा अध्यक्ष असताना त्यांनी एक पायंडा पाडला आहे की, आपण सर्व शाळांना एकत्र घेऊन त्यांना कोणकोणत्या प्रकारचे कोर्स देवु शकतो. याबाबतीत त्यांनी फार कष्ट घेतले होते. यासंदर्भात अति.आयुक्त अजित पवार साहेबांनी प्रॉपर मदत केलेली होती. परंतु या शिंदे मॅडम कुठे होत्या त्या क्रीडा समितीच्या मिटींगला त्या कधीच आलेल्या नाहीत. आयुक्त साहेब, तुम्ही त्या शिक्षण मंडळाचं एकदा केमो कराच आणि तुम्ही

जर का ठरवलं तर ते तुम्ही करु शकता. आयुक्त साहेब,आम्ही स्टँडीग मध्ये असताना तुम्ही किती कोटीची कामे काढलेली होती याचे आम्ही साक्षीदार आहोत. त्याच्यामध्ये काय होतं माहिती आहे का? आता राज्याचं शासन बदललं त्यामुळे तुम्ही भ्रष्टाचारी झाले ज्यावेळेस तुमचं शासन वरती होतं राज्यात होत त्यावेळेस तुम्ही चांगले होते.ज्यावेळेस राज्याची सत्ता बदलली आहे त्यावेळेस तुम्ही भ्रष्टाचारी झाल्याची बातमी कधी पेपरला ऐकली आहे का? एवढं चांगल काम करुन भ्रष्टाचारी म्हणलं तर एक वेगळा पॉईंट आहे. आयुक्त साहेब,तुम्ही स्वत: या शिक्षण मंडळाची छडी तुमच्या हातात घ्या. शिक्षण मंडळ म्हणजे आपल्या शहरातील जी नवीन पिढी येणारी आहे त्यांच्यासाठी खुप महत्वाचं आहे. तुम्हांला कोणाच्या काही अडचणी येत असतील तर त्या बाजुला ठेवा. तुम्ही यावर चांगला निर्णय घ्या. राहुल दादांनी मगाशी सांगितलं की, मी पुरुष होतो आणि त्या स्त्री होत्या त्यामुळे काही प्रॉब्लेम झाला असेल. आता माई ही शहराची माई आहेत आणि शिक्षण समितीचे अधिकारी पण महिला आहेत तर माई,आपल्याकडनं या शहराच्या अशा अपेक्षा आहेत की, आजपर्यंत या शहरामध्ये जे झालं नाही ते आपण करुन दाखवावं आणि या सभागृहामध्ये प्रत्येकांनी आपआपली मतं गांभीर्याने मांडलेली आहेत माझी आपल्याला विनंती आहे की, दर महिन्याच्या जी.बी.मध्ये या शिक्षण मंडळाच्या विषयावर चर्चा होऊ द्या.काळभोरनगरच्या शाळेचं स्ट्रक्चर ऑडीट झालेलं आहे ती बिल्डींग पडायला आलेली आहे ती शाळा आपण यांना चालवायला देत आहोत. काय कारण आहे. आयुक्त साहेब, या शहरामध्ये शिक्षणाच्या बाबतीतील तज्ञ लोक पुष्कळ आहेत या सर्वांना एकत्र घेऊन त्यांची एक मिटींग कॉल करा. आणि ८ वी,९ वी,१० वी पासून इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यापेक्षा एल.क.जी. पासून सुरु करा. आबा बागुल यांच्या शाळेला आपण व्हीजीट देवु त्याठिकाणी खरोखरच अँडमिशन घेण्यासाठी कॉम्पीटीशन लागते. ही परिस्थिती कधी निर्माण झाली त्याठिकाणची गुणवत्ता, शैक्षणिक दर्जा सुधारल्यामुळे झालेलं आहे. त्यामुळे माई हा विषय आपण फेटाळून लावणेत यावा. आणि या विषयावर सर्व तज्ञ मंडळी,पदाधिकारी एकत्र बसून ज्यावेळी निर्णय घेऊ त्यावेळी विषय आणावा. हे असा काय तरी विषय आणायचा या विषयाची माहिती त्या प्रभागातील सदस्यांना माहिती सुध्दा नाही. त्यांनी काय म्हणुन उत्तर द्यायची.काळभोरनगर,आकुर्डी,रामनगर हा सगळा भाग त्याठिकाणी येतो नां तर त्या भागामध्ये ज्या शाळेचा उपयोग होणार आहे अशा अशा ठिकाणी शाळा आहे. आणि मा.महापौर साहेब, हा विषय आपण फेटाळून लावावा अशी विनंती करतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खरं म्हणजे या विषयावर सभागृहामध्ये २ ते २.३० तास चर्चा झालेली आहे आणि या सभागृहामध्ये असणा-या प्रत्येक सदस्यांच्या भावना त्यांनी लक्षात घेतल्या आणि मी सांगायच्या आत मा.महापौर यांनी सांगितले आहे की,हा विषय तहकुब करणार आहोत. त्यामुळे आपण कोणाच्या दबावाखाली काम करीत नाही. हे मा.महापौर यांनी त्याठिकाणी आपल्याला सिध्द करुन दाखवलं आहे. परंतु सन्मा.महापौर आज एनजीओच्या माध्यमामधुन हा विषय या कार्यपत्रिकेवर आला आहे.मला असं वाटतयं की, मुंढे साहेबांनी सांगितलं आहे की, या संस्थेच्या माध्यमातून सर्व्हेक्षण करण्यात आलं भोसरी आणि प्रेमलोक शाळेमधील विद्यार्थी ८ वी,९ वी,१० वी च्या गरीब विद्यार्थ्यांना ख-या अर्थानं जे इंग्रजी माध्यमाची शाळा शिकवु इच्छितात त्या माध्यमातून या शाळेची निवड केली आहे. परंतु एवढा मोठा विषय आणत असताना मुंढे साहेब माझ्याकडे ४ दिवसापुर्वी आले असताना सुध्दा हा विषय आम्हांला सुध्दा माहिती नव्हता. आम्ही त्या संस्थेला बोलवून घेतलं आणि ही संस्था नेमकं काय करते त्या संदर्भामध्ये माहिती घेतली त्यावेळी असं लक्षात आलं की, या IT Speech या संस्थेच्या माध्यमातुन आपल्या सदस्यांनी पुणे कॉर्पोरेशनचा उल्लेख केला आहे. आणि आपल्या महानगरपालिकेच्या ७ वी पर्यंतच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या विद्यार्थ्यांना कुठं प्रवेश घ्यायचा आणि हा विषय आपल्या मनामध्ये आहे आणि खंत व्यक्त करणारा विषय आहे कारण ही गरीबांचे विद्यार्थी आहेत. गरीबांच्या मुलांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये शिकायला पाहिजे,ते मोठे झाले पाहिजे,चांगल्या मोठया हुद्यावर गेले पाहिजे. अशा प्रकारची भूमिका या प्रस्तावाच्या माध्यमातुन असावी असे मला वाटते. परंतु मुंढे साहेब,ज्यावेळेला आपण हा विषय आणला त्या संस्थेचं आपण सर्व्हेक्षण केलं मला वाटतं जानेवारी महिन्याच्या २३/१/२०२० च्या त्या पत्रावरती आपण सर्व्हेक्षण केलं हे आज जर आपण बघीतलं तर आज जवळपास आपला ९ वा १० वा महिना याठिकाणी चालू झालेला आहे. आणि एवढया ८/९ महिन्याच्या कालावधीमध्ये आपण त्या सन्मा.सदस्यांना भेटण्याची सुध्दा तसदी घेतली नाही.स्थानिक सदस्यांना तुम्ही विश्वासात घेतलं नाही. गटनेत्यांना तुम्ही विश्वासात घेतलं नाही. तुम्ही विषय चांगला आणलेला आहे. मी विषय समजुन घेतलेला आहे. या संदर्भामध्ये आयटी संस्था जी आहे ती १० वी नंतर मुलांनी कुठल्या शाळेमध्ये ॲडमिशन घ्यायचं चांगल्या नामांकित शाळेमध्ये त्यांनी ॲडमिशन घेतलेलं आहे. ९ वी नंतर आलेला मुलगा १० वी ला कुठं ऍडमिशन घेणार ११ वी ,१२ वी मध्ये तो कुठल्या नामांकित कॉलेजमध्ये ॲडमिशन घेणार अशा

पध्दतीचं ट्रॅकींगसुध्दा त्या संस्थेच्या माध्यमामधुन माझ्या समोर त्या संस्थेने प्रेझेंटेशन केलं. एवढा चांगला विषयअसताना तुमच्या या दुर्लक्षामुळे या महापालिकेच्या आपल्या गरीब विद्यार्थ्यांना शिकवण्याचा विषय असताना सुध्दा या सभागृहाचा २ ते २.३० तास वाया गेलेला आहे. आणि म्हणुन सन्मा.महापौर साहेब, या संदर्भामध्ये या आयटी संस्थेच्या माध्यमामधुन मला असं वाटतयं की, या सभागृहाच्या समोर हा विषय याठिकाणी आणावा कारण विषय चांगला आहे. आपल्या गरीब विद्यार्थ्यांना ८ वी,९ वी,१० वी नंतर आपण बाहेर बघीतलं आहे आपल्याकडे सुध्दा सन्मा.नगरसदस्यांच्याकडे इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या अँडमिशनसाठी किती प्रयत्न करतात. शेकडो पत्र आपण त्या संस्थेला अँडमिशनसाठी देतो आणि कुठं तरी एखादं अँडमिशन होतं. आणि म्हणुन या गरीबांच्या विद्यार्थ्यांना सुध्दा चांगल शिक्षण मिळाल पाहिजे. चांगले मोठे झाले पाहिजे त्यांना सुध्दा मेरीट मध्ये आले पाहिजेत अशा प्रकारचे प्रयत्न त्या संस्थेच्या माध्यमातुन केल्याचे माझ्या निदर्शनास त्यांनी आणलं परंतु ज्यावेळेला हा विषय आला त्यावेळेला त्या सन्मा.सदस्यांना त्याच शाळेची जागा का? त्याच ठिकाणची शाळा का? प्रेमलोक पार्क मधील विद्यार्थी आणणार आहेत का? किंवा भोसरीचे विद्यार्थी कसे आणणार आहेत त्यांची व्यवस्था कशी करणार आहोत, त्यांना आपण अर्ध्यावरतीच सोडणार का मागच्या संस्थेचा अनुभव लक्षात घेता ही पण संस्था तशीच करील का असे अनेक प्रश्न याठिकाणी उपस्थित झाले. याला कारण म्हणजे शिक्षण मंडळाच्या अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे याठिकाणी हा विषय आला. एनजीओच्या माध्यमातुन याठिकाणी हा विषय आणलेला आहे. आपण या संस्थेला फक्त भौतिक सुविधा महानगरपालिकेच्या माध्यमातून देणार आहोत. संपुर्ण स्टाफ त्याठिकाणी त्यांनी Speeach For India ची प्रगती मुल्यांकन तपासण्याचं काम त्या संस्थेच्या माध्यमातुन केलेलं आहे. त्या संस्थेच्या माध्यमातुन. Speeach For India बरोबर बी.एड झालेल्या शिक्षकांची त्याठिकाणी नियुक्ती करणार आहेत. अशा बी.एड.झालेल्या शिक्षकांची नियुक्ती आणि कुठलाही भार आपल्या महानगरपालिकेवरती किंवा शिक्षण समितीवर पडलेला नसताना, हा एवढा चांगला विषय असताना सुध्दा निव्वळ यांच्या दुर्लक्षपणामुळे त्यांनी जर का त्याठिकाणच्या स्थानिक नगरसदस्यांना विश्वासात घेतलं असत तर मला असं वाटत याठिकाणी या विषयावर गेली २ ते २.३० तास चर्चेला या सभागृहाचे वाया गेले नसते. सन्मा.महापौरांनी याठिकाणी उल्लेख केला आहे की, शिक्षण समितीच्या माध्यमामधुन, शिक्षणाधिका-यांच्या माध्यमामधुन अनेक शिक्षक वर्षानुवर्षे

त्याठिकाणी ठाण मांडुन आहेत. मी याठिकाणी सर्वप्रथम भाऊसाहेब भोईर यांच अभिनंदन करीन आणि सर्व सभागृहांना याठिकाणी विनंती करतो की, आपण सर्वांनी याठिकाणी पोटतिडकीने विषय मांडलेला आहे. गरीबांचे विद्यार्थी महानगरपालिकेच्या शाळेत शिकत आहेत त्यामुळे त्यांची गुणवत्ता ही वाढलीच पाहिजे. आणि ज्यावेळेला गुणवत्ता वाढलीच पाहिजे एखादया शिक्षकाला वाटतं की आता माझं काय होणार आणि त्याठिकाणी ३,५,१०,२० वर्ष एकाच ठिकाणी ठाण मांडून आहेत एखादया शाळेमध्ये किंवा त्याठिकाणचे प्राध्यापक,प्राचार्य जर त्याठिकाणी ठाण मांडून असतील तर या शिक्षकांची गुणवत्ता वाढविण्यासाठी सुध्दा मी खाजगी कंपनी काम करतो, खरंतर कोणाच्या पगारावरती आपण बोललं नाही पाहिजे. परंतु महानगरपालिकेच्या शिक्षकांचा पगार हा जिल्हा परिषद किंवा महाराष्ट्र शासनाच्या शिक्षकांपेक्षा १२ ते १५ हजार रु.नी जास्त आहे. पण त्यांच मेरीट काय आहे हे आपण बघितलं आहे का? जे शिक्षक ज्या शाळेत शिकवतात त्यांचा पट असेल,त्या शाळेचं मेरीट १० वी नंतरच ते मेरीट कुठं गेलय मी म्हणणार नाही महानगरपालिकेच्या शाळा या पुर्णपणे आहेत. कारण आपण मागील दोन/तीन वर्षामध्ये सर्व शाळांच मुल्यांकन केलेलं आहे. मी बघीतलंय मागच्या वेळेस शाळेमध्ये आलेलं मेरीट आणि आताचे आलेले मेरीट याच्यामध्ये थोडासा बदल झालेला आहे. परंतु याठिकाणी राहुलदादांनी उल्लेख केला आहे की, आपण आणि पक्षनेते सर्व मंडळी त्याठिकाणी गेल्यानंतर राहुलदादांना मी विनंती करणार आहे की,या संदर्भामध्ये सातत्यानं हा काही राजकीय विषय नाही हा आम्ही सुध्दा हा राजकीय विषय घेत नाही कारण गरीबांचे विद्यार्थी याठिकाणी शिक्षण घेत आहेत. परंतु या शिक्षकाच्या माध्यमामधुन खाजगी कंपनीमध्ये मी काम केलेलं आहे आणि ज्यावेळेला युनियन आणि व्यवस्थापन एका ठिकाणी बसतं त्यावेळेला चर्चा केली जाते. ज्यावेळेला कामगारांना पगारवाढ दिली जाते त्यावेळेला त्याला विचारलं जातं तुझा पगारवाढ दिल्यानंतर तु काय परफॉर्मन्स देणार,कंपनीला काय देणार,कंपनीच्या उत्पन्नामध्ये किंवा भरभराटीमध्ये काय देणार अशा पध्दतीची विचारणा त्याठिकाणी केली जाते. सन्मा.महापौर,सन्मा.आयुक्तांना याठिकाणी सांगायचं आहे की, अशा संदर्भामध्ये आपण त्यांना टारगेट देणार आहे की नाही. का? त्यांना आपण फक्त पाटया टाकायचं काम देणार आहे. वर्षानुवर्ष एकाच शाळेमध्ये शिपाई, शिक्षक ठाण मांडुन बसलेले आहेत त्यांच्या तातडीने बदल्या करण्यात याव्यात. आणि या सभागृहाच्या वतीने मी सांगतो सर्व पक्षाच्या वतीने याठिकाणी आपल्या सगळयांच्या मनामध्ये तोच विचार आलेला आहे आणि

सभागृहामधील कुठलाही नगरसदस्य तो माझ्या पक्षाचा असो,राष्ट्रवादीचा असो किंवा शिवसेनेचा असो कुठलाही शिक्षक त्याठिकाणी कामचुकारपणा करीत असेल, पोटतिडकीने त्या विद्यार्थ्यांना शिकवत नसेल तर त्याची तातडीने बदली केली पाहिजे. बदली करताना भोसरीचा शिक्षक निगडीला जायला सुध्दा काचकुच करतो. परंतु खाजगी कंपनीमध्ये १०० ते १५० कि.मी.वरुन कामगार कंपनीत कामाला येतात. कारण ते विचार करतात मला त्या कंपनीने पगार दिलेला आहे. तेंव्हा यांचे आपण का लाड करायचे. या शिक्षकांच्या माध्यमामधुन विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली पाहिजे. गेल्या २/३ वर्षामधील ९० टक्क्याच्या पुढचे परसेंटेज असेल ८० ते ९० टक्केच्या विद्यार्थ्यांना आपण शिष्यवृत्ती देतो. शिष्यवृत्तीच्या माध्यमामधुन या शिष्यवृत्तीची सुध्दा वाढ झालेली आहे. याचा अर्थ याठिकाणी प्रगती सुध्दा झालेली आहे. परंतु समाधानकारक नाही. आणि म्हणुन समाधानकारक करायची असेल तर मला वाटतं सन्मा.महापौर साहेब,आपण आयुक्तांना तसे सांगावं की, जे ठाण मांडुन बसलेले शिक्षक आहेत त्यांच्या तातडीने बदल्या करणेत याव्यात. मगाशी भाऊसाहेबांनी उल्लेख केला आहे की, कोण तो शिपाई कुठल्या शिक्षकांकडनं तो बदल्यांसाठी पैसे घेतो. त्याचं नांव याठिकाणी सांगुन त्याच्यावर तातडीने कारवाई करणेत यावी असे आदेश मा.महापौरानी मा.आयुक्तांनी देण्यात यावे अशी विनंती करतो. शिक्षणाच्या संदर्भामध्ये कुठल्याही शिक्षकाचे लाड याठिकाणी केले जाणार नाही. कारण या शाळेमध्ये महापालिकेच्या परिसरातील गोरगरीब, झोपडपट्टीतील मुले शिक्षण घेत आहेत.आपल्याकडे पटसंख्या कमी होत आहे. मगाशी उल्लेख केला आहे की, शिक्षकांची मुले सुध्दा त्या शाळेमध्ये शिकली पाहिजे. खरं म्हणजे हा प्रयोग सर्व शिक्षकांनी घेऊन पुढं आल पाहिजे. आणि शिक्षकांनी एक आदर्श शिक्षक म्हणुन पुढं येऊन सांगितलं पाहिजे की, मी सुध्दा महानगरपालिकेच्या किंवा जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिकुन याठिकाणी शिक्षक बनलो आहे प्राचार्य बनलो आहे आणि म्हणुन मी सुध्दा माझ्या मुलांना महानगरपालिकेच्या शाळेमध्ये टाकेन आणि ज्यावेळेला माझा विद्यार्थी टाकेन त्यावेळेला इतर विद्यार्थी किंवा नागरीक म्हणतील की, या शाळेमध्ये शिक्षकांचीच मुलं जर याठिकाणी शिकत असतील तर ख-या अर्थानं या शाळेची गुणवत्ता सुध्दा चांगली झालेली आहे. आणि त्या शिक्षकाने स्वत:हून पुढं आलं पाहिजे. अशा पध्दतीचा प्रयत्न याठिकाणी करावा. याठिकाणी गुणवत्तेच्या संदर्भामध्ये बरेच उपक्रम याठिकाणी केला. मी मगाशी उल्लेख केला आहे. खाजगी इंग्रजी शाळेमध्ये अँडमिशन घेण्यासाठी लोक रात्रभर त्या शाळेमध्ये झोपुन राहतात. कारण त्यांना वाटतयं माझा मुलगा कॉन्व्हेंट मध्ये

शिकला पाहिजे. माझा मुलगा शिस्तबध्द झाला पाहिजे. मेरीटच्या संदर्भामध्ये असेल, गुणवत्तेच्या संदर्भामध्ये असेल, वेळप्रसंगी अशा संस्थेच्या माध्यमातुन एनजीओच्या अशा काही संस्था असतील त्यांच्या मार्फत आपण आपल्या शिक्षकांचा परफॉर्मन्स वाढवू या आणि जसं आबा बागुल यांच्या शाळेचा उल्लेख केला आणि हे खरं आहे की,एखादा नगरसेवक त्याठिकाणी ठरवतो तर मलाही असं वाटतं की,आता जवळपास ४० ते ५० नगरसेवक आहेत आजपासून आपण ठरवू या की,मी माझ्या भागातील शाळा दत्तक घेणार एखादया शाळेला त्या एनजीओ बरोबर जोडून घेणार आमच्या शिक्षकांच परफॉर्मन्स वाढविण्यासाठी त्या संस्थेच्या मार्फत कौन्सिलिंग करणार किंबहुना त्यांना त्याठिकाणी ट्रेनिंग देणार त्यासाठी जर काही कमी पडत असेल तर ते सुध्दा देण्याचा आपण प्रयत्न करु. परंतु मागच्या काळामध्ये शिक्षण मंडळामध्ये काय चालत होतं,मंडळाच्या सारख्या बातम्या येत होत्या. आपल्याला त्या खोलात जायचं नाही. कारण राजकीय विषय याठिकाणी आपल्याला करायचा नाही. याठिकाणी शिक्षण मंडळाच्या नंतर शिक्षण समिती आली आणि शिक्षण समितीने काय केल पाहिजे आणि शिक्षण समितीने त्यांच्या शिक्षकांचा दर्जा वाढवण्यासाठी नेमकं काय अपेक्षित आहे या संदर्भामध्ये आपण याठिकाणी चांगला सकारात्मक यादृष्टीने आपण पाहिले पाहिजे. सन्मा.महापौर साहेब, आपण यासंदर्भामध्ये खरं म्हणजे या संस्थेच्या संदर्भामध्ये या सभागृहामध्ये या संस्थेने काय,काय काम केलेलं आहे,येथून पुढे ते काय काम करणार आहेत याचं एक चांगल प्रेझेंटेशन येणा-या सर्वसाधारण सभेमध्ये देवुन यामध्ये आपण असा निष्कर्ष द्यावा की, संस्था चांगली आहे,संस्थेची तळमळ चांगली आहे ते जे काही शिकवणार आहेत त्यामध्ये गरीबांची मुले शिकणार आहेत. अशा प्रकारचे त्यांचे प्रेझेटेशन झाल्यानंतर त्याला मान्यता देण्यात येईल तोपर्यंत हा विषय तहकुब ठेवणेत यावा. अशी मी याठिकाणी विनंती करतो आणि थांबतो धन्यवाद.

**मा.महापौर –** सभागृहाच्या भावना आपण सर्वांनी ऐकलेल्या आहेत आयुक्त साहेबांना सभागृहाच्या वतीनं मी सांगत आहे की, प्रथम प्रत्येक नगरसेवकाच्या वॉर्डमध्ये महापालिकेच्या प्रॉपर्टीची त्यामध्ये दवाखाना असेल,शाळा असेल अशा काही इमारती उभ्या केलेल्या आहेत आणि त्याचा वापर तुम्ही परस्पर करीत असाल तर ते आम्ही खपवून घेणार नाही. त्यामध्ये आम्ही असु किंवा महिला नगरसेवक असु ज्यांना कोणाला त्या इमारतीचा वापर करायचा असेल तर संबंधित अधिका-यांनी त्या वॉर्डमधल्या सर्व नगरसेवकांना प्रथम विश्वासात घ्यावं एखादया संस्थेचा अपमान होईल असे काही वागू नये. त्या संबंधित नगरसेवकाची परवानगी

मिळाल्यानंतरच असे विषय सभागृहात आणावेत. मुळातच IT चाकणच्या कंपनीने कासारवाडी येथे अतिशय उत्तम प्रकारे शाळा चालवित आहे मी स्वत: त्याठिकाणी भेट दिलेली आहे. आशाताई तुम्ही शिक्षीका आहात एखादी संस्था पुढे येऊन महापालिकेच्या मुलांना उच्च दर्जाचं शिक्षण देत असेल तर तुम्ही शिक्षण मंडळ कशाला चालवता. एवढया मोठया बजेटचं कशाला वाटोळं करता हे माझ्या नगरसेवकाच्या वॉर्डमधल्या करदात्यांची प्रॉपर्टी आहे. आणि आम्ही सुध्दा त्या प्रॉपर्टीमध्ये तुम्हांला पगार मिळतो पण आम्ही पगार घेत नाही. तरी पण आम्ही मालक आहोत याचं भान आयुक्त साहेब,तुम्ही आणि अधिका-यांनी ठेवणं गरजेचं आहे. स्मार्ट सिटी करा,मास्टर प्लॅन तयार करा आम्हांला चांगल वाटेल पण या शहरातील गरीबांची मुलं स्मार्ट शिक्षण घेत नसेल तर त्या स्मार्ट सिटीच मला काही घेणं नाही. इतरांच भूषण आपण गात असतो ठिक आहे सध्या कोरोनाची परिस्थिती सगळीकडे आहे. आशिया खंडातील श्रीमंत महानगरपालिका म्हणुन पिंपरी चिंचवड महानगरपालिका आहे. मी १९९२ सालापासून आहे माझ्या बरोबर भाऊसाहेब पण आहेत, राजु सुध्दा आहेत पक्षनेत्यांनी व सर्वांनी पोटतिडकीने विषय मांडलेले आहेत का? तुम्ही बदल्या करुन जाणार पण हे शहर आमचं आहे. आम्ही स्थानिक आहोत आम्हाला याशहराचा विकास करण्यासाठी याठिकाणी आलेलो आहोत. शिक्षण मंडळाबद्यल आम्ही बोलायचं आणि त्याला नकार द्यायचा हा घाणेरडा विचार आमच्या मध्ये नाही. म्हणुन आयुक्त साहेब या विषयाला अतिशय सुंदर असा विषय आहे मुलांच भवितव्य आपल्याला घडवायचं आहे. भोसरीहून काळभोरनगरला येण्यासाठी १२ कि.मी.चे अंतर आहे. ते विद्यार्थी कसे येणार आहेत याचा विचार सर्वांनीच केला पाहिजे. त्यामुळे हा विषय शिक्षण समितीमार्फत आला पाहिजे. जे शिक्षक एकाच शाळेमध्ये ठाण मांडुन बसलेले आहेत त्याठिकाणी मशिन लावली तरी मशिनचं बटण बंद करायचं आणि जायचं. अशा पध्दतीने शिक्षक लोक आपल्या बापाची प्रॉपर्टी आहे असे समजत असतील तर हे आम्ही चालू देणार नाही. या क्षेत्रामध्ये आम्ही कुठंही गय करणार नाही. आयुक्त साहेब,आम्ही तुम्हांला कोरोनामध्ये सर्वांनी साथ दिलेली आहे. हे तुम्हांला मान्य कराव लागल आज तुम्ही विकास थांबवला तरी आम्ही सर्वजण तुमच्या बरोबर आहोत. आणि शिक्षण क्षेत्रामध्ये सुध्दा स्मार्ट करायचं असेल तर तुम्ही ही पहिली धेंड उचला तीन वर्षांनंतर शिक्षकाची बदली होणं गरजेचं आहे. आणि असं काही वेगळं प्रेझेंट काढा की,ज्या वॉर्डमध्ये शाळेचा एक नंबर येईल त्या शाळेतील शिक्षकांना काही बक्षीस ठेवा. एखादा शिपाई शिक्षकांच्या बदलीच्या संदर्भामध्ये एजंटगिरी करीत असेल तर

ते खपवून घेणार नाही म्हणुन प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांची संख्या किती आहे याची माहिती पुढच्या जनरल बॉडीमध्ये दिली पाहिजे. त्याच बरोबर प्राथमिक आणि माध्यमिक शाळेचे विद्यार्थी किती आहेत हे देखील आम्हांला सांगणे गरजेचे आहे. कारण एका पटामध्ये किती विद्यार्थी आहेत याची पण माहिती देणेत यावी. आयुक्त साहेब,आपण या शिक्षण समितीचा अभ्यास करावा आणि हा विषय येथे फेटाळून तो शिक्षण समिती मार्फत जनरल बॉडीच्या मिटींगमध्ये विषय आणावा.मी कमिटीमध्ये सदस्य नसले तरी मी कमिटीला सांगु इच्छिते की, आपण यांचा खुप वर्ष लाड केला आहे आता लाड नाही आदर्श शिक्षकांचा आपण दरवर्षी ५ सप्टेंबरला कौतुक करतो. यावर्षी ते योगायोगाने केलं गेलेलं नाही. आपण आदर्श शिक्षकांच कौतुक करतो पण हे शिक्षक आदर्श मुलांना घडवील त्यावेळेस या आदर्श शिक्षकांचा सत्कार केला जाईल. म्हणुन मी हा विषय याठिकाणी फेटाळते आणि हा विषय शिक्षण समितीमध्ये आणावा आणि त्याठिकाणी रितसर शहरातील मुलांच्या शिक्षणाचा विकास झाला पाहिजे. पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे संबंधित संस्थेने सभागृहामध्ये प्रेझेंटेशन दाखवावे मुंढे साहेब आम्ही तुम्हांला नाही म्हणणार नाही. अशा पध्दतीने मी हा विषय आता सध्या फेटाळण्यात येत आहे.आणि पुढील विषय घेणेत यावा.

**मा.नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ४ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा. तुषार हिंगे** – मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता----

ठराव क्रमांक-५७१ विषय क्रमांक -४

दिनांक १३/१०/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील

जा.क्र.माशि/५/कावि/४६५/२०२० दिनांक २३/०९/२०२०

विषय क्रमांक ४ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकुल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.मोरेश्वर शेडगे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक -५

दिनांक १३/१०/२०२०                                        विभाग- मा.आयुक्त

संदर्भ १) मा.आयुक्त यांचे जा.क्र.मभां/१/कावि/ ६३५/२०२०
दिनांक १७/०९/२०२०

कोरोना (Covid-19)या संसर्गजन्य रोगाचा प्रादुभार्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ दिनांक १४/०३/२०२० पासून लागू करण्यात आलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातही सदर रोगाचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात वाढत असून त्यासाठी मनपाने वायसीएम हॉस्पिटल, भोसरी हॉस्पिटल, जिजामाता हॉस्पिटल तसेच ऍटो क्लस्टर येथे विशेष रुग्णालय उभारले आहे. या खेरीज पीएमआरडीए व महापालिका यांचेवतीने आण्णासाहेब मगर स्टेडीयम येथे जम्बो हॉस्पिटल उभारुन रुग्णांवर उपचार केले जात आहे. तसेच कोविड केअर सेंटर व्दारेही रुग्णांना उपचार केले जात आहेत. दररोज सर्व साधारणपणे ८०० ते ९०० सरासरी पॉझिटिव्ह रुग्ण बाधित होत आहेत. त्यामुळै मनपाच्या खर्चात मोठया प्रमाणात वाढ होत आहे. सदर खर्चासाठी मध्यवर्ती भांडार विभागाकडे “कोरोना निधी” लेखाशिर्ष निर्माण करण्यात आलेले आहे सदर लेखा शिर्षावर वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक अर्थसं.-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३ दिनांक ०४/०५/२०२० व नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण – २०२० /प्र.क्र.७२/न.वि.१६ दिनांक ०८/०५/२०२० अन्वये महापालिकेचा निधी कोविड-१९ मुळे उदभवणारी परिस्थिती हाताळण्यासाठी वैद्यकीय, आरोग्य, व आपत्ती व्यवस्थापन विभागाचा खर्चासाठी प्राधान्याने तरतूदी खर्च कराव्यात असे कळविले आहे. त्यामुळे महापालिकेच्या विविध विभागांनी कोरोना विषाणूच्या संसंर्गामुळे खर्चासाठी निधीची लेखा विभागाकडे मागणी केलेली आहे. कोरोना विषाणूचा संसर्गाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिका अधिनियम कलम ६३ (६) चे प्रयोजनासाठी विशेष स्वतंत्र निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने शासनाकडूनही अनुदान मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तथापि सद्यस्थितीत तातडीने निधी आवश्यक असल्याने सन २०२०-२१च्या अंदाजपत्रकातील भांडवली तरतूदीच्या खालील नमूद केलेल्या कामांमधून तरतूदी “कोरोना निधी” या लेखा शिर्षावर उपलब्ध करता येणे शक्य आहे.

| अनु ,क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | सन २०२०-२१ मुळचा अंदाज | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|
| **लेखाशिर्ष - (८) व्हीजन २००५ (सेवा वाहिनीचे स्थलांतर करणेसल्लागार फी, विद्युत खर्च, जलनिसारण खर्च इ. अनुषंगिक कामे करणे** | | | | | | |
| १ | नविन प्रभाग क्र.२८ येथील रहाटणी मनपा शाळा ते पिंपळे सौदागर स्मशानभूमी पर्यंतच्या रस्त्याचे यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने काँक्रीटीकरण करणे. | २० | ३० | 6,55,00,000 | - | 1,00,00,000 |
| २ | प्रभाग क्र.२६ वाकड येथील कावेरी चौक, सब-वे ते पिंक सिटी कॉर्नरपर्यंत डी.पी. रस्ता सिमेंट काँक्रीटचा करणे. | २१ | ३६ | 9,46,00,000 | - | 1,50,00,000 |
| ३ | प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव येथील सुदर्शननगर, जवळकरनगर, महाराष्ट्र कॉलनी व इतरपरिसरातील रस्ते अद्यावत पध्दतीने विकसीत करणे. | २१ | ३९ | 7,50,00,000 | - | 1,00,00,000 |
| ४ | प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव येथील गुलमोहर कॉलनी व इतर परिसरातील रस्ते अद्यावत पध्दतीने विकसीत करणे. | २१ | ४० | 7,50,00,000 | - | 1,00,00,000 |
| ५ | प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव येथील वैदूवस्ती आनंदनगर, गणेशनगर, इत्यादी भागातील रस्ते अद्यावत पध्दतीने विकसीत करणे. | २१ | ४१ | 8,00,00,000 | - | 1,50,00,000 |
| ६ | पिंपळेगुरव प्रभाग क्र.२९ लक्ष्मीनगर, भालेकरनगर, तुळजाभवानीनगर, भिमाशंकर कॉलनी, गंगोत्रीनगर परिसरातील रस्ते अद्यावत पध्दतीने विकसीत करणे. | २२ | ५१ | 8,00,00,000 | - | 1,00,00,000 |
| | **एकूण** | | | **47,01,00,000** | | **7,00,00,000** |
| **लेखाशिर्ष - (९) रोडपेव्हमेंट मॅनेजमेट सिस्टिम अहवालानुसार रस्ते सुधारणा अंतर्गत कामे करणे** | | | | | | |
| १ | आकुर्डी स.न. १७३ पै. (सि.सं. नं. ४६६१ पै) येथील कोहली वखारजवळील १८.००मी डी.पी. रस्ता विकसित करणे. | २९ | २ | 2,50,00,000 | - | 50,00,000 |
| २ | प्राधिकरण गंगानगर भागातील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करणे. | २९ | ३ | 3,50,00,000 | | 1,00,00,000 |
| ३ | प्राधिकरण भागातील नाल्यांचे सुशोभिकरण करणे. | २९ | ४ | 2,00,00,000 | | 50,00,000 |
| ४ | प्रभागक्र. १० मोरवाडी म्हाडा येथील संपुर्ण रस्ते स्मार्ट वॉर्डच्या धर्तीवर अद्यायावत पध्दतीने सिमेंट कॉंक्रिट करणे. | २९ | ८ | 4,00,00,000 | | 1,00,00,000 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | प्रभागक्र. १६ विकास नगर येथील नाल्या कडील पेट्रोल पंप ते बापदेवनगर १८.०० मी डी.पी रस्ताव इतर रस्ते विकसित करणे. | २९ | १७ | 7,00,00,000 | - | 1,00,00,000 |
| ६ | प्रभागक्र.१७ बिर्ला हॉस्पिटल पासून वाल्हेकर वाडी पर्यंतचा रस्ता दोन्ही बाजूंनी पदपथ तसेच सायकल ट्रॅक करणे. | ३० | २४ | 4,00,00,000 | - | 1,00,00,000 |
| ७ | प्रभाग क्र १८ ताब्यात येणारे डी.पी. रस्ते विकसीत करणे | ३० | २८ | 2,00,00,000 | - | 50,00,000 |
| ८ | काळेवाडी विजयनगर प्रभाग क्र.४६ मधील काळेवाडी येथील मुख्य रस्ता (पिंपरी पुल तेबी.आर.टी.एस. पर्यंतचा) कॉंक्रीटचा करणे. | ३० | ३२ | 1,80,00,000 | - | 1,00,00,000 |
| ९ | प्रभाग क्र.२ जाधववाडी मधील गट नंबर ५३९ विकसीत करणे . | ३१ | ५२ | 2,00,00,000 | - | 1,50,00,000 |
| १० | प्रभागक्रं.२ मधील साई जीवन शाळे शेजारील मैदान विकसीत करणे | ३२ | ५३ | 2,00,00,000 | - | 1,50,00,000 |
| ११ | प्रभागक्र. 2 पुणे नाशिक महामार्ग ते ग.क्र. १०६२ पर्यंतचा १८ मी. DP रस्ता विकसीत करणे | ३२ | ५९ | 4,00,00,000 | - | 1,00,00,000 |
| १२ | प्रभाग क्र.२५ वाकड येथील भुजबळ वस्ती मधून वाकडकर वस्ती मार्गे भुमकरवस्ती येथील हिंजवडीकडे एम.डी.आर.३१ रस्त्याला जोडणारा ३०.०० मी. रूंद डी.पी. रस्ता विकसीत करणे. | ३४ | ९४ | 4,00,00,000 | | 1,00,00,000 |
| १३ | प्रभागक्र.२५ ताथवडे येथील जिवननगरकडून मुंबई-बैंगलोरकडे जाणारा २४.०० मी. रूंद डी.पी.रस्ता विकसीत करणे. | ३४ | १०२ | 4,90,00,000 | - | 1,00,00,000 |
| १४ | प्रभागक्र.२५ ताथवडे येथील शनि मंदीराकडून मारूंजी गावाकडे जाणारा ३०.०० मी. रूंदडी.पी. रस्ता विकसीत करणे. | ३४ | १०४ | 5,00,00,000 | - | 1,00,00,000 |
| १५ | प्रभागक्र.२५ मध्ये आवश्यकतेनुसार रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | ३५ | ११० | 5,00,00,000 | - | 1,50,00,000 |
| १६ | प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर येथील कापसे लॉन जवळील १२.०० मी. रूंद डी.पी. रस्ता अद्यावत पध्दतीने विकसीत करणे. | ३५ | ११८ | 3,05,00,000 | - | 50,00,000 |
| १७ | प्रभागक्र ११ मधील मंजुर विकास योजनेतील ताब्यात आलेले रस्ते विकसीत करणे | ३६ | १३६ | 15,00,00,000 | - | 1,50,00,000 |
| १८ | प्रभाग क्र 3 चिखली येथील राधास्वामी आश्रम येथील २४ मी डी पी रस्ता विकसीत करणे | ३६ | १४० | 9,00,00,000 | - | 1,50,00,000 |
| १९ | फ प्रभागात ठिकठिकाणी सुशौभिकरणाची कामे करणे | ३६ | १४२ | 1,00,00,000 | - | 50,00,000 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २० | प्रभाग क्र.४८ येथील रहाटणी फाटा ते शिवाजी चौकापर्यंतच्या १८.०० मी. रूंद रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. | ३९ | १८८ | 8,27,00,000 | - | 1,00,00,000 |
| २१ | नवीन प्रभाग क्र २७ रहाटणी मधील श्रीनगर , गजानन नगर, रायगड कॉलोनी येथील रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे | ३९ | १९५ | 6,50,00,000 | - | 1,00,00,000 |
| | **एकूण** | | | **96,52,00,000** | | **21,00,00,000** |
| **लेखाशिर्ष - (१४) वाहतुकसुधारणा विषयक कामे करणे व पार्कींग जागा विकसीत करणे.** | | | | | | |
| १ | प्रभागक्र. १६ मध्ये खंडोबामाळ चौक ते म्हाळसाकांत चौक पर्यंत पालखी मार्गाचे कॉक्रीटीकरण करणे | ५१ | ४ | 6,23,00,000 | - | 1,00,00,000 |
| २ | प्राधिकरण ए.डी.सी. परिसरातील रस्ते UTWT पधादतीने विकसित करणे. (नाट्यगृह, PCNTDA Office समोरील रोड, से.क्र. २५ एल.आय.जी. परिसरातील अंतर्गत रस्ते) | ५१ | ५ | 3,00,00,000 | - | 50,00,000 |
| ३ | प्रभागक्र. १४ मधील विवेकनगर, तुळजाईवस्ती भागातील डी.पी. रस्त्यांचे मजबुतीकरण/सुधारणा/ नुतनीकरण/ कॉक्रिटीकरण करणे. | ५१ | ७ | 3,00,00,000 | - | 50,00,000 |
| ४ | पुणे नाशिक महामार्गावरील पांजरपोळ चौक ते पुणे आळंदी पर्यतचा विकास आराखडयातील रस्ता विकसित करणे.( ९० मी. रुंद) | ५२ | ३१ | 13,83,05,000 | - | 2,00,00,000 |
| ५ | बोपखेलयेथे मुळा नदीवर पुल बांधणे. | ५२ | ३४ | 24,20,34,000 | - | 2,00,00,000 |
| ६ | HCMTR च्या राखीव जागा सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेसाठी DMRC च्या सल्ल्यानुसार BRT/मोनोरेल/ट्राम यासाठी विकसीत करणे. (अ) अ) मौजे रहाटणी येथे कोकणे चौक तेकाळेवाडी फाटा चौकापर्यंत उच्चक्षमता द्रुतगती मार्ग (HCMTR) विकसीत करणे. | ५३ | ५२ | 7,60,68,000 | - | 3,00,00,000 |
| ७ | पिंपळेसौदागर येथे पवना नदीवर पुल बांधणे. | ५३ | ५३ | 5,53,22,000 | - | 3,00,00,000 |
| ८ | बी.आर.टी.कॉरीडॉर क्र. ३ वर वाकड येथील पुणे-बेंगलोर महामार्गावरील पुलापासुन हिंजवडी मनपाहद्दीपर्यंत रस्ता रुंदीकरण करणे. | ५४ | ५६ | 10,37,29,000 | - | 3,00,00,000 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | बीआरटी कॉरीडॉर क्र. ३ वर सुदर्शन नगर चौक येथे ग्रेड सेपरेटर (समतल विलगक)बांधणे. | ५४ | ५७ | 13,83,05,000 | - | 2,00,00,000 |
| १० | पिंपरीइंदिरा गांधी रेल्वे उड्डाणपुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे व दुरुस्ती करणे. | ५४ | ६१ | 4,84,07,000 | - | 1,00,00,000 |
| ११ | चिंचवड लिंकरोड बाजूकडील यशोपुरम , संत गार्डन व साई ग्रेस सोसायटी समोरील व एम्पायर ईस्टेट येथे उड्डाण पुलाखाली स्थापत्य विषयक कामे करणे. | ५४ | ६४ | 3,45,77,000 | - | 2,00,00,000 |
| १२ | राजमाता जिजाऊ उड्डाण पुलाखालील सेवा रस्ते Urban Street Design नुसार विकसीत करणे | ५६ | १०२ | 10,37,29,000 | - | 3,00,00,000 |
| १३ | मनपा हद्दीबाहेरील खडकी कॅन्टोन्मेंट क्षेत्रात बोपखेल गावासाठी पोहच रस्ता बांधणे वइतर अनुषंगिक कामे करणे | ५७ | १०३ | 2,76,61,000 | - | 1,00,00,000 |
| १४ | निगडी ते दापोडी या मार्गावरील सेवा रस्त्याचे आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | ५८ | १२३ | 2,42,04,000 | - | 1,00,00,000 |
| | एकूण | | | 1,11,46,41,000 | - | 25,00,00,000 |
| | लेखा शिर्ष क्र.८+९+१४ | | | 2,54,99,41,000 | | **53,00,00,000** |
| १५ | स्मार्ट सिटी (मनपाकडील वर्ग करावयाच्या निधी मधून) | - | - | 1,50,00,00,000 | - | **25,00,00,000** |
| | **एकूण** | | | **4,04,99,41,000** | - | **78,00,00,000** |
| | **लेखाशिर्ष - करोना निधी (मध्यवर्ती भांडार)** | | | **-** | **78 कोटी** | **-** |

सबब, उपरोक्त प्रमाणे मनपाचे स्थापत्य व स्मार्ट सिटी विभागाकडील विविध लेखा शिर्षावरील तरतूद मध्यवर्ती भांडार विभागाकडील कोरोना निधी या लेखा शिर्षावर वर्ग करणेकामी व कोरोना निधी या लेखाशिर्षामधून करावयाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी महानगरपलिका अधिनियम कलम ६३ (६) व ६७ (३) (क) व १०३ नुसार मान्यता देणेत यावी.

**मा.अंबरनाथ कांबळे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा. नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी मी सूचना मांडतो.

**मा. तुषार हिंगे** – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता---

ठराव क्रमांक- ५७२ विषय क्रमांक- ५

दिनांक -१३/१०/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचे जा.क्र.मभां/१/कावि/६३५/२०२०
दिनांक १७/०९/२०२०

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ७२ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.महापौर** – सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

-----

**(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/६/कावि/५३०/२०२०
दिनांक - ६/११/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.